साप्ताहिक
माणूस
शनिवार १९ फेब्रुवारी १९८३
किंमत २ रुपये

# महाराष्ट्राचं राजकारण साखरसम्राट चालवताहेत का ?



नाटक हे सुसंस्कृत माणसाचं स्वप्न आहे ........ चित्तरंजन

मुक्काम अंबाजोगाई–५७

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : छत्तीस 3८

¤

१९ फेब्रुवारी १९८३

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुभाष अवचट


## सप्रेम नमस्कार

¤ दि. १२ फेब्रुवारी ८३ 'माणूस' अंकात म. फुले कृषी विद्यापीठासंबंधी श्री. विनय गुणे यांचा 'राहुरी विद्यापीठ–कुलगुरु हटाव आंदोलन' हा लेख व 'आमचा या आंदोलनाला विरोध आहे' हा माझा लेख छापून आला आहे. विद्यापीठातील या आंदोलनाच्या दोन्ही बाजूंना आपापले विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल सर्वच विद्यार्थी आपले आभारी आहेत.

श्री. विनय गुणे यांच्या लेखातील खालील विधाने वास्तवतेशी फारकत करणारी आहेत.

क्र. १. 'आंदोलनाला विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांना 'कुलगुरु झिंदाबाद'ची आतषबाजी करायला, घोषणा द्यायला प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची मदत झाली.' (पृष्ठ क्र. १०) प्रत्यक्षात मात्र आंदोलनाला आमचा विरोध on our own, स्वयंप्रेरणेने सुरू झाला. तसेच २० जानेवारीची मीटिंग फिसकटल्यावर आंदोलकांनी 'कुलगुरु हटाव' ही अयोग्य घोषणा, २० जानेवारी सायंकाळी सुरू करताच आम्ही विद्यार्थ्यांनी 'कुलगुरु झिंदाबाद' ही घोषणा सुरू केली. (आमची घोषणा २१ जानेवारीला सुरू झाली नाही.)

क्र. २. 'विद्यापीठाच्या दोन्ही शाखा (पदव्युत्तर विभाग व कृषी अभियांत्रिकी विभाग) मिळून तीनशे विद्यार्थ्यांपैकी ३०–४० विद्यार्थी सोडले तर बाकी सर्व कुलगुरूंच्या विरोधात खडे ठाकले आहेत.' प्रत्यक्षात ही आकडेवारी (मध्यवर्ती परिसराच्या महाविद्यालयांमध्ये) पुढीलप्रमाणे आहे–

कुलगुरु विरोधात–

| | |
|---|---|
| ११० | (कृषी अभियांत्रिकी) |
| ६० | (पदव्युत्तर विभाग) |
| १७० | |

'हेच कुलगुरु हवेत' असे म्हणणारे–

| | |
|---|---|
| ७० | (पदव्युत्तर विभाग) |
| एकूण... २४० | |

उर्वरित ६० विद्यार्थी पदव्युत्तर विभागाचे In service candidates म्हणजे विद्यापीठात नोकरीला असणारे, पण M. Sc. साठी विद्यापीठाने पाठविलेले, त्यामुळे त्यांना कोणतीच भूमिका घेता येत नाही.

कृषी विद्यापीठात आजवर विद्यार्थ्यांचे असंख्य संप झाले. हे सर्व संप एकमुखी पाठिंब्याने होत. या वेळेचा संप मात्र विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच एकमुखी ठरला नाही. संपाला विरोध करणाऱ्यांना कोणाचीही मेहरनजर नको, त्यांना विनाकारण संप व त्यामुळे शैक्षणिक नुकसान करण्याची ही प्रथा मोडावयाची आहे.

क्र. ३. 'विद्यापीठातील आंदोलनाला पुणे, धुळे, कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांनीही पाठिंबा जाहीर केला आहे.'

हे विधान अपुऱ्या माहितीवर आधारित आहे. कोल्हापूर येथील कृषी महाविद्यालयाने या आंदोलनाला एकमुखी विरोध केला आहे. पुण्यामधील महाविद्यालयात निम्म्याहून अधिक विद्यार्थी या आंदोलनाला विरोध करताना आढळून येतील. धुळे येथील महाविद्यालय 'कुलगुरु हटाव' मागणीसाठी बंद नाही ह्या महाविद्यालयांतर्गत प्रश्नासाठी बंद आहे.

क्र. ४. 'होस्टेल सोडण्याच्या आदेशानंतर कुलगुरु गटाच्या विद्यार्थ्यांची सोय 'मुळा डॅम'च्या रेस्ट हाउसवर करण्यात आली.'

वरील विधान चूक आहे. आमच्या गटातील सर्वच विद्यार्थ्यांनी प्रशासनाचा निर्णय मानून दि. २९ जानेवारीला सायंकाळी होस्टेलमधील खोल्या खाली करून दिल्या.

गेल्या आठवड्यात आमच्या गटाने कुलपती (राज्यपाल, महाराष्ट्र राज्य), प्रतिकुलपती (कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांना निवेदने सादर केली आहेत. शिक्षणाला पोषक अशा शिस्तीच्या वातावरणात पदव्युत्तर महाविद्यालय सुरू होण्याची व अन्य महाविद्यालयात वातावरण शांत होण्याची आम्ही असंख्य विद्यार्थी वाट बघत आहोत.

१२ फेब्रुवारी, ८३ **श्रीकांत करमरकर, पुणे**

¤ ५–२ च्या अंकातला निशिकांत भालेरावचा लेख वाचल्यावर तिघांनी अदुगर का नकार दिला त्येचा खुलाशा झाला; पन आपन का छापला त्ये कळले नाही.

आसल्ये शब्द आम्ही नामातरवादी वापरनार नाही.

७ फेब्रुवारी — सचीन वगडूजी कांबळे
औरंगाबाद

▫ ५-२-८३ रोजी प्रसिद्ध केलेली निशिकांत भालेरावलिखित 'दैनंदिनी' वाचून बेचैन झालो. म्हणून हे पत्र लिहीत आहे एक आठवण झाली की, 'गाल्सवर्दी 'चे 'जस्टिस' नाटक विन्स्टन चर्चिलने पाहिले आणि त्याने बंदिशाळेच्या बाबतीत सुधारणा करणारे कायदे केले. ही माणुसकी आपल्याकडे मंत्रिमंडळे दाखवतील काय? गाल्सवर्दीचे नाटक १९१० सालचे आहे. आपण आज ब्यायशी सालात आहोत! अधिक काय लिहावे? 'बेधडक 'पणे लिहिल्याबद्दल व आपण प्रसिद्ध केल्याबद्दल धन्यवाद!

१२ फेब्रुवारी १९८३ — स. गं मालशे
मुंबई

## मुंबई वार्ता

# हे रोपटं वाढेल का?

कोणी काही म्हणो; पण इयत्ता आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकातले धडे 'टॉक ऑफ द टाउन' आहेत. कोणतंही मासिक, नियतकालिक उघडून पहा, या धड्यांशिवाय कोणाचं पान उलटत नाही. धडे रद्द करावेत की करू नयेत, यामागे राजकारण जरूर आहे; पण अजूनही आपले लोक, मग ते बहुसंख्य असोत की अल्पसंख्य, सवर्ण असोत की दलित, केवळ धार्मिक भावनानी एकत्रित येतात ही दुःखाची बाब आहे. या धार्मिक भावनाच्या अफूच्या गोळीचं व्यसन काही सुटत नाही.

हे विचार आताच सुचायचं कारण 'विज्ञानसाहित्य' या विषयावरच्या चर्चासत्राचं उद्घाटन करताना मे. पु. रेग्यानी मांडलेले विचार. रेग्याचं म्हणणं असं की, समाजजीवनाचं प्रतिबिंब तत्कालीन साहित्यावर पडत असतं ग्रीकाच्या पुराणातनं ग्रीकाच्या धार्मिक जाणिवांची कल्पना येते. ग्रीक साहित्य हे समकालीन समाजजीवनाचा आरसा होत. आता आपल्याबाबत बोलायचं झालं तर मराठीमध्ये किंवा एकूणच भारतीय भाषामध्ये विज्ञानसाहित्य इतक कमी आहे, याचं कारण आपल्या समाजातच विज्ञाननिष्ठा कमी आहे, वैज्ञानिक वृत्ती कमी आहे. अजूनही धार्मिक पुस्तकाचीच इथे चलती आहे. विज्ञानसाहित्य विपुल प्रमाणात निर्माण व्हाव, वैज्ञानिक लेखन करणाऱ्या लेखकाना चालना मिळावी या बाबतीत कसलाही ठाम विचार न करता विज्ञानसाहित्यावरच चर्चासत्र खास समीक्षकी खाक्यानं सुरू झालं आणि संपलं. अर्थात चर्चासत्राचे यजमान डॉ. व. दि. कुलकर्णी याना श्रेय द्यायला पाहिजे ते अशासाठी की, या विषयावर त्यानी चर्चा घडवून आणली.

त्या निमित्तानं उपस्थित झालेले काही मुद्दे साहित्याच्या अभ्यासकांना इंटरेस्टिंग वाटतील. विज्ञानसाहित्य कोणतं आणि अद्भुतकथा कोणत्या, याच्या सीमारेषा ठरवण्याकरता कोणते निकष वापरायचे? अद्भुतकथेमध्ये घडणाऱ्या कल्पनारम्य गूढ घटनाचे चढ-उतार असतात. विज्ञानकथेमध्येही विस्मयकारक घटना घडतात. त्याला गूढतेची डूब असू शकते. रहस्याची चढती कमान असू शकते; पण तरीही केवळ अद्भुतकथा, केवळ भयकथा या समान गुणांवर विज्ञानकथा ठरू शकत नाही. कारण रहस्याची उकल अघटितामागची कारणपरंपरा, कोणत्याही वैज्ञानिक सिद्धान्तावर आधारलेली नसते मनोरजन इतपतच तिचं काम असत. विज्ञानकथा ही विज्ञाननिष्ठेशी बाधिलकी मानत असते आणि ही बाधिलकी हाच सर्वांत महत्त्वाचा निकष आहे. या बाधिलकीशी ठाम राहूनच ती कथा विज्ञानकथा ठरू शकेल. वैज्ञानिक संकल्पना जनमानसात रुजवण हे विज्ञानसाहित्याचं काम आहे असं जे डॉक्टर नारळीकरानी आपल्या परिषदेत वाचल्या गेलेल्या निबधात म्हटलं, त्याचा सरळ अर्थ असा की, वैज्ञानिक कल्पना लोकापर्यंत पोचवण्याचं साहित्य हे केवळ साधन आहे.

अर्थातच इतकी ठाम बाधिलकी समीक्षकांना पटणारी नव्हती आणि नारळीकरांच्या या निबधावर प्रतिक्रिया म्हणून अनिल डागे या साहित्यिकानं, विज्ञानसाहित्याची वेगळी चूल माडायला नको, त्याला साहित्याचेच निकष लावले पाहिजेत असं आग्रहपूर्वक विधान केलं आणि या त्याच्या विधानाशी सहमत होणारे पुष्कळ समीक्षक भेटतील!

पण निरंजन घाटयानी सादर केलेला मराठी विज्ञानसाहित्याचा इतिहास पाहता विज्ञानसाहित्याकडे कोणी जिव्हाळ्यानं बघितलेलं दिसत नाही. घाटयांनी या साहित्याचे तीन महत्त्वाचे टप्पे कोणते हे सागतानाच मुळी अस म्हटल की, विज्ञानसाहित्य हे नामाभिधान तिसऱ्या टप्प्यापासून सुरू होतं. १९५०-५५ च्या सुमाराला हे साहित्य बालकथा म्हणून गणलं जायचं. कारण त्याचे लेखक भा. रा. भागवत होते! त्यानतर जेव्हा नारायण धारप लिहायला लागले, तेव्हा त्याच कथा फक्त भयकथा म्हणून गणल्या जाऊ लागल्या आणि जेव्हा जयत नारळीकर लिहू लागले तेव्हाच कुठे तिला विज्ञानकथा म्हणण्यात येऊ लागल.

### वैज्ञानिकतेचा स्फोट!

घाटयाच्या मते पुण्याच्या अतरकरांच्या दोन मासिकानी-हस आणि नवल यानी या साहित्यप्रकाराला इतके दिवस तगवून धरलं. मराठीशी तुलना करता पाश्चात्य साहित्यविश्वात विज्ञानसाहित्याच भाडार अधिक समृद्ध आहे. त्यामागे दीडशे वर्षांची परपरा आहे नारळीकराच्या मते ज्यूलसवर्नची 'ऐशी दिवसात पृथ्वीप्रदक्षिणा' ही साहसपूर्ण कादंबरी ही एका भौगोलिक किंवा खरं म्हणजे खगोलशास्त्रीय विज्ञानातल्या एका साध्या तत्त्वावर आधारलेली पृथ्वी आपल्या आसाभोवती चोवीस तासात चक्कर मारताना ३६० अशांचा कोन पुरा करते याचा अर्थ असा की, दर ३५ रेखाशाला एका-एका तासाचा फरक पडत जातो आणि ज्यूलसवर्नचा नायक ऐंशी दिवसाऐवजी ७९ दिवसांतच ही सफर पूर्ण करतो. आता कथानकातली ही वैज्ञानिक खुबी अगदी शेवटी उजेडात येते. विज्ञानकथा ही अशा प्रकारे वैज्ञानिक असूनही रंजक आहे. अशा कथा पाश्चात्य कथाची वाण नाही.

इतक्या सरस विज्ञानकथा निर्माण होण्यामागे एक सामाजिक सत्य कारणीभूत आहे. अगदी रेनेसांसच्या काळापासून वैज्ञानिकता ही त्या भूमीत अधिक रुजली, फुलून

आली आणि दुसऱ्या महायुद्धाच्या सुमाराला विशेषत: अणुबॉम्बच्या निर्मितीनंतर वैज्ञानिकतेचा तर स्फोटच झाला. इलेक्ट्रॉनिक्सचं युग अवतरलं. त्यातून स्थिरस्थावर झालेल्या अमेरिकन कॉंग्रेसनं अक्षरश: अब्जावधी डॉलर्स ओतून अवकाशशास्त्रसशोधनात हनुमानझेप घेतली. जीवशास्त्रीय, भूगर्भशास्त्रीय ज्ञानाचं रसायन खदखदत ठेवलं. याच वेळेला अनेक प्रकारची विद्युत आणि मग इलेक्ट्रॉनिक उपकरणं घरगुती वापरासाठी उपलब्ध झाली. १९५५च्या सुमाराला कॅम्पबेलनं विज्ञानसाहित्याच्या निर्मितीला भरपूर मदत केली. विज्ञानकथा नेमकी कशी असावी ? ती शक्याशक्यतेच्या, संभवनीयतेच्या भक्कम पायावर उभी असली पाहिजे. त्यातलं वैज्ञानिक सत्यही वाचकाच्या मनाला भिडलं पाहिजे. त्यातल्या व्यक्तिरेखा रसरशीत, जिवंत वाटल्या पाहिजेत. वैज्ञानिकाना ही कसरत जमेलच असं नाही. त्याकरता कॅम्पबेलनं त्यांना उत्कृष्ट साहित्यिकांची मदत उपलब्ध करून दिली. या कथालेखनातले बारकावे सांगणारी वर्कशॉप्स योजली. या प्रयत्नानंच खगोलशास्त्रातल्या शक्यतांवर आधारलेल्या उत्तमोत्तम कादंबऱ्या निर्माण झाल्या फ्रेड हॉयेल यांनी १९५६साली लिहिलेल्य 'कृष्णमेघ' या कादंबरीत अंतराळातील रेणूंचा सजीव मेघ सूर्यमालेत आल्यावर काय घडेल याचं चित्र रंगवलंय, तर आर्थर क्लार्क यांच्या 'सन २००१ : अंतरिक्ष–पुराण' यामध्ये अंतराळ–वसाहतीचं चांगलं चित्रण आहे. या जोडीला जॉर्ज ऑरवेलचं '१९८४', एच. जी. वेल्सच्या कादंबऱ्या इत्यादींनीही हे विज्ञानसाहित्य समृद्ध बनवलं आहे.

इतक्या प्रमाणावर वैज्ञानिक साहित्य निर्माण होणं आपल्याकडे सध्या तरी शक्य वाटत नाही. कारण आपली गरजच इतकी प्रचंड आहे. विशेषत: ग्रंथयात्रेतून जाणवलेली बालसाहित्याची टंचाई लक्षात घ्यायला हवी. मे. पु. रेगेंनी अगदी सुरुवातीलाच विज्ञानसाहित्याचा वाचकवर्ग म्हणून तीन वर्ग दाखवले. नवसाक्षर, अर्धशिक्षित समाजात वैज्ञानिकतेचं बीज रुजवणं महत्त्वाचं आहे. दुसरा वर्ग शाळकरी मुलांचा. वयाच्या १०–१२ व्या वर्षापासून सृष्टीबद्दल, भोवतालच्या माणसाबद्दल कमालीची जिज्ञासा वाटायला लागते आणि वर्गातून शिकवलं जाणारं तासा–दोन तासातलं आखून दिलेलं विज्ञान पुरं पडत नाही आणि तिसरा वर्ग सर्वसामान्य वाचकाचा–ज्याला वैज्ञानिक भराऱ्यांची उत्सुकता असते. सजग कुतूहल असतं. रेग्यांच्या मते या वाचकाची भूक भागविणारं साहित्य निर्माण व्हायला हवं.

## आणि हे पूर्वग्रह

नारळीकरांच्या मते विज्ञानकथेइतकंच वैज्ञानिक स्वरूपाच्या लेखानाही महत्त्व आहे. विज्ञानसाहित्यावरच्या चर्चेतून हा विषय बाद असल्यामुळे त्यावर खास चर्चा होऊ शकली नाही विज्ञानकथा लिहिताना येणाऱ्या काही समस्यांचा नारळीकरांनी उल्लेख केला. वास्तववादी आणि सुसंगत अशा कथानकात व्यक्तिरेखा सजीव कराव्या लागतातच; पण वैज्ञानिक कल्पनेचं चांगलं विवरण करावं लागतं. त्यातल्या रहस्याची उकल एखाद्या पात्राच्या तोंडी संवादरूपानं घालावी लागते वैज्ञानिक परिभाषेतले शब्द वापरले तरीही कथा अधिकाधिक क्लिष्ट, अनाकलनीय होत जाण्याची शक्यता असते; पण परिभाषेचा उपयोग टाळला तर ती पुरेशी वैज्ञानिक ठरणार नाही. यावरचा एक तोडगा म्हणून, प्रस्थापित कादंबरीकारांनी विज्ञानकथानकांवर कादंबऱ्या लिहाव्यात.

पण हे सध्या तरी संभवनीयतेच्याच नव्हे तर शक्यतेच्याही पलीकडचं आहे. प्रस्थापित कथा-कादंबऱ्यांमधून अगदी प्रस्थापित वैज्ञानिक मूल्यांचीही पायमल्ली केलेली असते किंवा त्याच्या ऑथेंटिसिटीची–सच्चेपणाची खास क्षिती बाळगलेली नसते. उदाहरणच घ्यायचं झालं तर जयवंत दळवींच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका कादंबरीत रंगवलेल्या मतिमंद मुलाचं चित्र हे असंच भडक आणि वैद्यकीय सत्याना ठोकरणारं आहे, तर विजय तेंडुलकरांच्या पटकथेवर आधारित 'गहराई' चित्रपटामध्ये अंधःश्रद्धेचा उदो-उदो केलेला आहे.

विज्ञानसाहित्यावरच्या चर्चेत या आणि अशासारख्या गोष्टींचा उल्लेख आला असता तर ही चर्चा अधिक व्यवहार्य पातळीवर झाली असती. ही चर्चा ऐकून असाही एक गैरसमज होण्याची शक्यता होती की, विज्ञानसाहित्यामधलं विज्ञान म्हणजे फक्त खगोलशास्त्रच !

अशा त्रुटी जरी जाणवल्या आणि एकूण चर्चा समीक्षकी विवेचनात्मक झाली, तरी काही वैज्ञानिक, वाचक, साहित्यिक यांना या निमित्तानं एकत्र आणण्याचं, बोलतं करण्याचं महत्त्वाचं काम या चर्चासत्रानं केलं.

मराठी विज्ञानसाहित्याचं रोपटं इवलंसं' त्याचं बहरलेलं पान म्हणजे नारळीकरांची 'यक्षाची देणगी.' पण त्याची साहित्य म्हणून तुलना करायची, ती भरदार, डेरेदार साहित्यवृक्षाशी आणि म्हणायचं या रोपट्याला काही सावलीच नाही. वैज्ञानिक कथा या विज्ञान कल्पना म्हणून चांगल्या असतीलही कदाचित; पण साहित्य म्हणून त्या निकृष्ट दर्जाच्या आहेत अशा अव्यक्तपूर्वग्रहानं या रोपट्याची वाढ खुंटवायची आहे का ?

या संदर्भात घाटेंनी केलेल्या काही सूचना व्यवहार्य आहेत. चांगल्या विज्ञानकथांची भाषान्तरं करवून घ्यावीत. सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या संपादकाचं हे काम होऊ शकेल. विज्ञानकथा, साहित्य यांच्या स्पर्धा शाळा–कॉलेजातून घेतल्या जाव्या. विज्ञान–लेखकांना देशातल्या वैज्ञानिक अनुसंधानांना भेट देण्याची संधी मिळवून द्यावी. मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक संस्थांवरील माहितीपट दाखवावेत. वैज्ञानिक चित्रपटमहोत्सव घडवायचा प्रयत्न करावा. वैज्ञानिक आणि साहित्यिक हे एकमेकांना सहाय्यभूत होतील अशा भेटीगाठी, परिसंवाद, विज्ञानपरिषदानी घडवावेत. विज्ञानसाहित्यात, एकूण साहित्यसंभाराची रसरशीत, अर्थपूर्ण शाखा होण्याची क्षमता आहे, आणि अशी संधी मिळाली, तर ती तशी होईलही.

—ललिता बर्वे

१७ फेब्रुवारी १९८३ : वासुदेव बळवंतांच्या शंभराव्या पुण्यतिथीनिमित्ताने

# सशस्त्र क्रांतीचा प्रेषित–वासुदेव बळवंत फडके

प्रा. ह. म. घोडके

भारत इतिहासलेखनाच्या बाबतीत कमालीचा दुर्दैवी आहे प्राचीन आणि मध्ययुगात इतिहासलेखनाच्या जाणिवा नव्हत्या व आधुनिक काळात इग्रजांसारख्या राज्यकर्त्यांनी त्याच्या काही विशिष्ट स्वार्थासाठी भारताच्या इतिहासाला बरेचसे विकृत केले. स्वातंत्र्योत्तर काळात तरी ह्या अपप्रवृत्ती थाबतील असे वाटले होते; पण तेथेही दुर्दैव आडवे आले ! सत्ताधारी पक्षाला स्वातंत्र्याचे सर्वच्या सर्व श्रेय उपटण्याची इतकी घाई झाली की, त्यांनी भारताच्या इतिहासातील अनेक वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष तरी केले किंवा तो इतिहास सोयिस्कररीत्या दडपण्याचा तरी प्रयत्न केला. स्वातंत्र्यचळवळीचा चार खडात लिहिलेला ताराचंदकृत एक सरकारी इतिहास आहे. त्या इतिहासाने भारतातील सशस्त्र क्रातिकारकाच्या तेजस्वी चळवळीविषयी चार ओळीदेखील दिलेल्या नाहीत! आरंभी हे काम श्री. रमेशचंद्र मुजुमदारांसारख्या स्वतंत्र बाण्याच्या एका जाणकार इतिहासकाराला दिले होते; पण त्यांनी सशस्त्र क्रांतीच्या पर्वाला जे महत्त्व दिले, त्यामुळे सरकारपक्ष रुष्ट झाला व त्यांनी ते काम त्यांच्या हातून काढून घेतले. ह्या दुर्दैवी घटनांचे स्मरण होण्याचे कारण असे की, सशस्त्र क्रातीच्या चळवळीचा जनक श्री. वासुदेव बळवंत फडके ह्याच्या शंभराव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने सरकार काही करील असे वाटले होते; पण त्या आघाडीवर सामसूम दिसते. सरकार ज्या गोष्टीला उत्तेजन देईल, त्याच गोष्टीना महत्त्व द्यावयाचे, असे लोकानीही ठरवलेले आहेच. त्यामुळे लोकांकडूनही फडक्याच्या पुण्यतिथीविषयी फारसा उत्साह व्यक्त होताना दिसत नाही.

पाश्चात्य देशात अशा महात्म्यांच्या जीवनाविषयी सतत संशोधन होत असते. भगतसिंग आणि सुभाषचद्र बोस ह्याच्या विचारसरणीचे, कार्याचे योग्य ते मूल्यमापन व्हावे आणि त्याद्वारे त्यांचे कार्य देशवासियांना सतत प्रेरणादायी ठरावे, ह्यासाठी पंजाबात आणि बंगालमध्ये प्रगत अध्ययनकेंद्रे आहेत. महाराष्ट्राने फुले, आगरकर, टिळक वगैरेंसाठी अशा संस्था का स्थापन करू नयेत ?

वासुदेव बळवंत फडक्यानी सशस्त्र क्रातीच्या धगधगत्या पर्वाला आरंभ केला त्यांची चळवळ जरी महाराष्ट्रापुरतीच मर्यादित राहिलेली असली तरी ती देशाच्या इतिहासात इतकी अपूर्व होती की, पंजाबी, बंगाली क्रातिकारकानी त्याच्यापासून प्रेरणा घेऊन हा क्रांतिकारकांचा पंथ देशात जन्मास घातला. महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांसारखे नेते फडक्याच्या आखाड्यात शस्त्राचे आणि राष्ट्रवादाचे शिक्षण घेत असत. न्या. रानड्याचा आणि फडक्याचा गूढ संबंध होता त्यामुळे न्या. रानड्यावर सरकारची अवकृपा होऊन त्याची बदली झाली. महाराष्ट्रामध्ये सुशिक्षितांचा फारसा पाठिंबा नसताना फडक्यांनी अशिक्षिताच्या मदतीने सरकारला काही काळ जेरीस आणले. वासुदेव बळवंताचा उठाव ही १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतरची दुसरी महत्त्वाची घटना मानली जाते. १८५७ चे बड रक्तात बुडवून टाकल्यानतर भारतातील लोक पुन्हा डोके वर काढणार नाहीत, असे वाटून ब्रिटिश राजवट निश्चित झाली. त्या राजवटीविरुद्ध दंड ठोकून फडके उभे राहिले ! १८५७ नतर फडके हे भारतातील पहिले राजकीय हुतात्मा ठरले. ब्रिटिश सत्तेला गनिमी काव्याने सतावणारा योद्धा म्हणूनही त्याचे नाव इतिहासात अजरामर राहील ! ब्रिटिश पारतंत्र्याच्या काळात गणराज्यपद्धतीचे ध्येय भारतीयांसमोर ठेवणारा फडके हा पहिला द्रष्टा आहे. त्याच्या चळवळीने स्तंभित झालेले लोक त्याला 'दुसरा शिवाजी' म्हणत, 'महाराज' ह्या नावाने त्याला पुकारीत; पण फडके स्वत:ला पेशव्यांचे पंतप्रधान (पतप्रधानाचा पंतप्रधान ?) मानीत असत !

जेमतेम शिक्षण घेतलेला आणि मनाने पेशवाईच्या काळात वावरणाऱ्या फडक्याना एक 'हिंदु गणराज्य' स्थापन करावयाचे होते. महाराष्ट्र–भूवर अवतरलेल्या हिंदुपदपादशाहीला इंग्रजानी संपविले, ही गोष्ट न आवडून त्यांना त्या हिंदु राष्ट्राचे पुनरुत्थान करावयाचे होते. हिंदु धर्म आणि हिंदु सस्कृतीला पाश्चात्याच्या लोकसत्ताक राज्यपद्धतीचे अधिष्ठान देऊन एक 'हिंदु गणराज्य' नामक शासनप्रकार फडक्यांना अभिप्रेत होता.

१८१८ मध्ये इंग्रजांनी मराठ्याचे राज्य बुडविले. त्यामुळे इंग्रजी सत्तेविरुद्ध मराठी प्रदेशातसुद्धा असतोष होता; पण तो राग व्यक्त करण्यास कोणी पुढे येत नव्हते. ब्रिटिश दडपशाहीची भीती एवढी प्रचंड होती की, सरकारविरुद्ध कसलीही कृती करण्याची कुणाची प्राज्ञा नव्हती. ह्या मूक असंतोषाला, विद्रोही भावनेला वासुदेवाने वाट मोकळी करून दिली आणि एक अद्‌भुतरम्य व अभूतपूर्व असे एक बड महाराष्ट्रात निर्माण झाले.

महाराष्ट्रात सशस्त्र क्रातीचा जो पंथ सुमारे ७५ वर्षे कार्य करीत होता, त्याच्या अग्रभागी चित्पावन युवक का होते ? ह्याचे जाणकारांनी अवश्य संशोधन करावे. पेशवाईत ह्या मडळीनी अनेक राजकीय, सामाजिक आणि आर्थिक लाभ उठवले म्हणून ह्या मंडळीची तळपायाची आग मस्तकाला भिडली होती काय ? की सामाजिक, धार्मिक प्रबोधनामध्ये ही जमात अग्रभागी होती, म्हणून चित्पावन युवक सशस्त्र क्रातीचे अग्रदूत ठरले ? फडके, सावरकर, चापेकर, सेनापती बापट ही एकजात सर्व क्रातिकारक मंडळी चित्पावन होती. नव्या राजवटीने केलेले अन्याय बाकी जमाती शांतपणे सहन करीत

पृष्ठ ३२ वर

# नवी विटी पण जुनेच राज्य !

फिरोझ रानडे

'अरेरे...' श्यामने त्या दिवसाच्या दैनिकातली काही छायाचित्रं पहात कळवळा सोडला.

'आता...अरेरे...करायला काय झाले?' राधाने जरा नाराजीतच प्रश्न विचारला.

त्या दिवशी दादाच्या नेतृत्वाखाली नव्या मंत्रिमंडळाची रचना होऊन त्याचा शपथविधी झाला होता. कित्येक महिने भिजत पडलेले घोंगडे आता चांगले Dry-clean होऊन घडी वगैरे घातले गेले होते. त्या घोंगड्याबद्दल रकानेच्या रकाने भरून माहिती आली होती. दादा-मंत्रिमंडळात किती नवे चेहरे आहेत, जुने किती चेहरे टिकले आहेत त्याबद्दल होते. शपथविधी कसा शिस्तबद्ध वातावरणात झाला ह्याचे कौतुक होते. जणु काही मंत्र्यांचा शपथविधी शिस्तबद्ध होणे ही आता कौतुकाची बाब झाली होती.

गेले वर्षभर मुख्यमंत्री स्वत. हसत होते, दुसऱ्यांना हसवत होते. हे करता करता त्यांनी स्वतःचे तर हसे करून घेतले होतेच; पण साऱ्या महाराष्ट्राचे पण हसू होऊ लागले होते!

साऱ्या हिंदुस्थानात चागले व उत्तम प्रशासन म्हणून नाव कमावलेले मुंबईचे व महाराष्ट्राचे सरकार आता एक अस्थिर व हास्यास्पद सरकार म्हणून ओळखले जाऊ लागले होते.

ते अस्थिरतेचे व हास्यास्पदतेचे ढग आता पूर्णपणे निवळले होते. प्रथम खूप ढगाळ हवा, त्यानंतर चागला पाऊस पडून गेल्यावर चागले ऊन पडले म्हणजे कसे छान छान वाटते! तसे आता दादा मुख्यमंत्री झाल्यापासून छान-छान वाटायला लागले होते.

दादा मुख्यमंत्री झाल्याबद्दल महाराष्ट्रातल्या सगळ्या ताईंना आनंद होणे अगदी सहाजिकच होते. त्यात राधा-ताईंचा पण समावेश होता हे वेगळे का सांगायला पाहिजे? पण राधाच्या आनंदाला इंग्रजीत ज्याला Dimention म्हणतात तसे आणखी एक 'डायमेनशन्' होते.

दादा दिसायला व वागायला वगैरे तर दादासारखे म्हणजे मोठ्या भावासारखे आहेत; पण राधाला फक्त त्याच्या 'दादा'-पणाबद्दल म्हणजे मोठ्या भाऊपणाबद्दल आदर नव्हता. ते एक आदर्श पती आहेत असे तिचे मत होते. जेव्हा जेव्हा दादाचा विषय निघत असे त्या त्या वेळी राधा 'नवरा असावा तर असा' असे दादाचे कौतुक करणारे व श्यामला बोचणारे मत प्रगट करत असे.

आजचे सगळे वर्तमानपत्र शपथविधीच्या माहितीने, त्यात घेतलेल्या छायाचित्रांनी व इतर माहितीनी भरलेले होते. त्याचबरोबर काही असमाधानी लोकाबाबतही तुरळक माहिती होती; पण ती म्हणजे चद्रावरचा डागच जणु! त्यामुळे चद्राचे तेज व आल्हाद कमी न होता उलट तो वाढलाच होता असे कोणीही म्हणाला असता.

तेव्हा अशा मंगल व आल्हाददायक प्रसंगीसुद्धा श्यामने 'अरेरे' चा कळवळा सोडावा ह्याचा राधाला फार राग आला होता व त्या रागातच ती श्यामला म्हणाली होती, 'आता अरेरे करायला काय झाले?'

राधा एवढेच बोलून थाबली नाही. ती पुढे म्हणाली, 'मराठी माणसे अशीच नतद्रष्ट! आता इतक्या वर्षांने चांगले मुख्यमंत्री झालेत, त्याच्या मंत्र्याचा शिस्तबद्ध शपथविधी झाला आहे तर आता अरेरे करायला काय झाले? मराठी माणसांना चागले काही झालेले पहावत नाही हेच खरे!' जुन्या नाटकात स्वगत बोलण्याची पद्धत होती त्या पद्धतीत राधा बोलत होती. तिच्या म्हणण्यातली मराठी माणसे म्हणजे सगळी मराठी जनता नसून फक्त मराठी श्याम हाच होता.

राधाचे रागातले स्वगत ऐकताच श्याम अचंबला. 'अग पण ..मी कशाकरता अरेरे म्हटले ते ऐकून तर घे!'

'आता आपले म्हणणे बदलू नका. दादाच्या नेतृत्वाखाली गुण्यागोविंदाने आलेले मत्रिमंडळ पाहून तुमच्या पोटात दुखू लागले आहे व त्याचाच तो 'अरेरे' होता. आता उगाच आपले बोलणे बदलू नका!'

राधा म्हणत होती त्यात ह्या वेळी जरी तथ्य नसले तरी नेहमीच्या वेळी होते हे श्यामने पण कबूल केले असते. श्यामची आपली ती policyच होती.

तो काय करावयाचा की तो कोणत्याही विषयावर आपले मत द्यावयाचा व नंतर राधाचा कल पाहून मग आपण असे म्हटले नव्हते, तसे म्हटले होते वगैरे म्हणून आपले बोलणे बदलावयाचा! कारण विषय काही असो वा त्यावर मत काही असो उगाच त्याकरता राधाला का दुखवा? असे तो मनाशी म्हणत असे व त्याप्रमाणे वागत असे.

पण ह्या वेळी तसे नव्हते. त्याने 'अरेरे' म्हटले होते ते दादाच्या नेतृत्वाला नव्हते; गुण्यागोविंदाने आलेल्या मंत्रिमंडळाला नव्हते व शपथविधी शिस्तीने पार पडला त्याला तर नव्हतेच नव्हते म्हणून राधाने त्याच्या बोलणे बदलण्याच्या सवयीवर झोड उठवलेली पाहून तो चकितच झाला त्या चकितावस्थेमुळे त्याला काय बोलावे ते सुचेना तो काही बोलत नाही हे पाहून राधा म्हणाली,

'आता का गप्प राहिलात? दादाच्या मत्रिमंडळात सगळ्या प्रदेशाच्या, सर्व जातीजमातीच्या लोकाना घेतले आहे. मुख्य म्हणजे चांगल्या चार स्त्रियांना मत्री केले आहे ते खुसखुसले असेल ना?' राधा आधीच बोलण्यात अट्टल त्यातून स्त्री-स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे तिच्या जागे झालेल्या मनाला पुरुषाची पुरुष-वृत्ती ठायी-ठायी दिसत असे.

'नाही ग ताई!' श्याम हवालदिलपणे बोलू लागला, 'मी मध्यवर्ती सरकारचा नोकर. येथल्या मंत्रिमंडळाचा व माझा काय संबंध? तेथे चार बायका मंत्री झाल्या काय, सगळ्या बायकाच मंत्री झाल्या काय वा सगळे मंत्री बायकासारखे वागले काय, मला काय फरक पडतो?' हवादिलपणातही

श्यामचा खडूसपणा कमी झाला नव्हता.

सुदैवाने शेवटच्या वाक्यातली खोच राधाच्या लक्षात आली नाही. ते बघून श्यामला हायसे वाटले. तो म्हणाला, 'राधा, जरा इकडे ये. पहा हे छायाचित्र, पूर्वीच्या तीन मंत्र्यांचे!'

राधा चाणाक्ष होती. श्यामच्या फार जवळ न जाता तिने लांबूनच त्याच्या हातातून वर्तमानपत्र खेचून घेतले व श्यामने सांगितलेले छायाचित्र पाहून म्हणाली, 'अय्या खरेच की!' आणि श्यामच्या 'अरेरे'शी सहमत होत म्हणाली, 'अरेरे! ह्यांच्यावर अशी वेळ यावी ना?'

छायाचित्र होतेच तसे. पूर्वीच्या मंत्रिमंडळात असलेले पण आता मंत्रिपद गमावलेले तिघेजण पायी पायी राजभवनाच्या शपथविधीच्या कार्यक्रमाहून परत येत होते. त्या तिघात एक उमदा तरुण होता.

श्यामचा व राधाचा 'अरेरे' मुख्यत्वे त्या उमद्या तरुणासच उद्देशून होता. त्या छायाचित्राखाली लिहिले होते, 'मंत्रिपद गेले आणि त्याचबरोबर लाल दिव्याच्या मोटारीसुद्धा...सोमवारी मुंबईत झालेल्या शपथविधीला त्यांना पायी जावे लागले...' वगैरे.

ह्या उमद्या तरुणाने मागल्या मंत्रिमंडळात फारच चांगले नाव कमावले होते. तो I A S, I F S वगैरे परीक्षांत उत्तीर्ण झाला होता. त्यानंतर त्याने मेडिकलच्या परीक्षा दिल्या होत्या व आता कायद्याच्या परीक्षा दिल्या होत्या की, देणार होता म्हणे.

सरकारी कामानिमित्त श्यामला महाराष्ट्र सरकारच्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी भेटावयाचा प्रसंग येत असे. त्या भेटीत ह्या तरुण, बुद्धिमान व तडफदार मंत्र्याबद्दल नेहमी विषय निघत असे.

त्या तरुण मंत्र्याची स्वच्छ विचार करण्याच्या पद्धतीबद्दल, तेथल्या तेथे चटकन व योग्य निर्णय घेण्याबद्दल ते महाराष्ट्र सरकारातले अधिकारी त्याची फार वाहवा करत. आता ह्या नव्या मंत्रिमंडळात त्याला घेतले जाऊ नये ह्याचे सगळ्यानाच वाईट वाटले होते. त्या सगळ्यात राधा–श्याम पण होते.

त्या तडफदार मंत्र्याचे कौतुक ऐकताना श्यामच्या मनात नेहमी येत असे की, राजकारणात माणसाने इतक्या तरुणपणी इतके वर चढणे योग्य नाही. दिवाळीतल्या बाणासारखा झरदिशी वर जाणारा तेव्हढ्याच झरदिशी खाली पण येणार!

'हे मात्र खरे हं, दादानी ह्या माणसाला आपल्या मंत्रिमंडळात जरूर घ्यावयास पाहिजे होते. अरेरे!' राधा ते छायाचित्र व त्याच्याखालचा मजकूर वाचत म्हणाली.

'बघ ना. सगळ्या वर्गाच्या, सगळ्या विभागाच्या लोकाना आपण प्रतिनिधित्व दिले आहे असे दादा म्हणतात. त्यांच्या मंत्रिमंडळात मागासवर्गातले आहेत, स्त्रिया आहेत, मुसलमान आहेत. त्यात जागा नाही फक्त बुद्धिमान, तडफदार तरुणाला! तो कोणत्याही गटात बसू नये ना?' श्याम हळहळत म्हणाला, 'सगळ्यांना प्रतिनिधित्व आहे; पण बुद्धिमान लोकाच्या गटाला मात्र नाही!'

'अहो, हे महाराष्ट्र सरकारचे किंवा भारताच्या सरकारचे नाही. मला वाटतं, लोकशाहीमध्ये असेच होते. लोकशाहीतल्या पुढाऱ्यांना बुद्धिमान लोकांचे प्रतिनिधी नकोच असतात!'

श्यामने राधाकडे चमकून पाहिले. किती साध्या शब्दात तिने एक मोठे तत्त्व सांगितले होते! श्याम मनाशी विचार करू लागला. 'राधा म्हणते त्यात पुष्कळ तथ्य आहे म्हणावयाचे. म्हणूनच आपण आर. के. पाटील, बर्वे वा चिंतामणराव देशमुखांचा घ्यावा तसा उपयोग राष्ट्राच्या बांधणीत करून घेऊ शकलो नाही, नाही?' राजकारणात काय हवे असते? तर जुजबी बुद्धिमत्ता व इंग्रजीत ज्याला manupulation म्हणतात ती करण्याची ताकत.

म्हणजे थोडक्यात काय की, विटी नवी असली तरी जुनेच राज्य आले म्हणावयाचे! □

# मतशक्तीचे हादरे
# इंदिरा काँग्रेसचा आधारच ढासळला!

वा. दा. रानडे

आंध्रप्रदेश, कर्नाटक, त्रिपुरा या तीन राज्यांतील विधानसभा निवडणुका आणि दिल्लीतील महापालिका व महानगरपरिषदेच्या निवडणुकांत मतपेटीच्या सामर्थ्याचे पुनः एकदा दर्शन घडले. आंध्रप्रदेश व कर्नाटक हे कॉंग्रेस (आय) चे अभेद्य बालेकिल्ले मानले जात होते. १९७५ चे जनता लाटेतसुद्धा या किल्ल्यानीच इंदिरा गांधींना व त्यांच्या पक्षाला वाटले होते या दोन राज्यात स्वातंत्र्यानंतर एकदाही कॉंग्रेस सत्तेवरून हटली नव्हती. केंद्रात पुनः सत्तेवर येण्यास इंदिरा गांधीना या दोन राज्यातून मोठा आधार मिळाला होता. कर्नाटकातील चिकमंगळूरमधून त्या लोकसभेवर निवडून आल्या होत्या आणि तेव्हापासून त्यांची दिल्लीची वाटचाल सुरू झाली होती. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधीच्या पक्षाने पुनः केंद्रातील सत्ता मिळविली खरी; पण एवढ्या मोठ्या यशाची त्यांना स्वतःलाही कल्पना नव्हती आणि रायबरेली या आपल्या नेहमीच्या मतदारसंघातून आपण निवडून येऊच अशी त्यांना खात्री वाटत नव्हती, म्हणून रायबरेलीच्या जोडीला आंध्रप्रदेशातल्या मेडक मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढविली आणि विजयी झाल्यावर रायबरेलीच्या जागेचा राजिनामा देऊन मेडकची जागाच त्यांनी आपल्याकडे ठेवली. त्यामागे दक्षिणेतील राज्ये हाच आपला खात्रीचा आधार. उत्तरेत आज यश मिळाले तरी उद्या ते टिकेलच असे नाही, ही भावना होती; पण आंध्रप्रदेश व कर्नाटकातील पराभवाने दक्षिणेतील त्यांचा हा आधारच ढासळला. आता १९८५ च्या लोकसभा निवडणुका आपण कशा जिंकणार ही चिंता या पराभवातून त्यांच्यापुढे उभी राहिली. अर्थात बाह्यतः त्यांनी तसे भासू दिलेले नाही.

आंध्रप्रदेश व कर्नाटकातील पराभव म्हणजे त्या राज्यांमधील पक्षनेतृत्वाचा पराभव आहे. तो इंदिरा गांधींचा पराभव नव्हे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव कायम आहे अशी प्रतिक्रिया इंदिरा कॉंग्रेसच्या नेत्यांनी या पराभवावर व्यक्त केली; पण हे खरे मूल्यमापन नव्हे. इंदिरा गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव हेच आपले मोठे बळ आहे असे इंदिरा कॉंग्रेसचे नेते मानीत होते ते बळ आता पूर्वीसारखे राहिलेले नाही हे या निवडणुकांनी दाखवून दिले. इंदिरा गांधींनी या निवडणुका जिंकण्यासाठी आपली सर्व शक्ती खर्च केली होती. तीन आठवडे त्या राजधानीबाहेर होत्या. जास्तीत जास्त मतदारसंघातून त्यांनी दौरा काढला होता; पण मतदारांना त्या वळवू शकल्या नाहीत हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव कमी झाल्याचेच स्पष्ट निदर्शक होते. इंदिरा कॉंग्रेसच्या नेत्यांना तसे बोलणे त्यांना सोयीचे नसल्याने ते बोलत नाहीत; पण मनातून ते हादरले आहेत.

दोन्ही राज्यांतील भ्रष्टाचारी राजवट, अकार्यक्षम कारभार, पक्षातील बंडखोरी आणि ही सारी परिस्थिती सुधारण्यात गेल्या तीन वर्षांत इंदिरा गांधींना आलेले अपयश याविरुद्ध जनमताचा हा कौल होता. जे सरकार चालवू शकतात, त्यांनाच निवडून द्या अशी घोषणा देऊन तीन वर्षांपूर्वी इंदिरा गांधी निवडून आल्या होत्या आणि मतदारांनी या दोन राज्यात इंदिरा कॉंग्रेसला सत्तेवरून हटवून त्यांचेच शब्द खरे केले!

आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांत इंदिरा कॉंग्रेसचा पराभव झाला असला तरी त्याच्या स्वरूपात फरक आहे. आंध्रप्रदेशात चित्रपटअभिनेते एन्. टी. रामाराव यांच्या तेलगूदेशमपक्षाने २९४ पैकी २०२ जागा जिंकून १९७२ मधील कॉंग्रेसच्या यशाएवढे यश मिळविले. १९७२ मध्ये कॉंग्रेसने एवढ्याच जागा मिळविल्या होत्या आणि आंध्रप्रदेशातील आतापर्यंतच्या सर्व विधानसभा–निवडणुकात तो जागांचा उच्चांक होता. अवघ्या नऊ महिन्यांपूर्वी स्थापन झालेल्या तेलगूदेशमपक्षाने त्या यशाची बरोबरी केली. इंदिरा कॉंग्रेसला अवघ्या ६० जागा मिळाल्या व आतापर्यंतच्या निवडणुकीतील सर्वांत खालची पातळी तिने गाठली.

आंध्रराज्याची स्थापना १९५३ मध्ये झाली. त्यापूर्वी तो मद्रासराज्याचा भाग होता. १९५६ मध्ये सर्वच राज्यांची पुनर्घटना झाल्यावर हैद्राबादमध्ये तेलंगणभाग आंध्रमध्ये समाविष्ट होऊन आंध्रप्रदेश अस्तित्वात आला १९५७ मध्ये फक्त तेलगण भागातच निवडणुका झाल्या. त्यामुळे १९५२ व १९५७ च्या निवडणुका येथे विचारात घेतलेल्या नाहीत; पण १९६२ पासूनच्या पाच विधानसभा निवडणुकात कॉंग्रेसला मिळालेल्या जागा आणि शेकडा मते यात कसा फरक पडत गेला याची कल्पना खाली दिलेल्या तक्त्यावरून येईल.

### आंध्रप्रदेश विधानसभा निवडणुका
( १९६२ ते १९८३ )

**कॉंग्रेसच्या जागा व शेकडा मते**

| | जागा | शे. मते |
|---|---|---|
| १९६२ | १७६ | ४७.२५ |
| १९६७ | १६५ | ४५.४२ |
| १९७२ | २०२ | ५२ २९ |
| १९७८ | १७५ | ३९ २४ |
| १९८३ | ६० . | ३३.५ |

यातील १९७२ चे आकडे पहिल्या फुटीनंतरच्या इंदिरा कॉंग्रेसचे व १९७८ व १९८३ चे आकडे दुसऱ्या फुटीनंतरच्या इंदिरा कॉंग्रेसचे आहेत. १९७२ मध्ये कॉंग्रेसने जागांच्या दृष्टीने जसा उच्चांक गाठला तसा मतांच्या दृष्टीनेही गाठला होता; पण त्यानंतर जागांप्रमाणे तिच्या मतात ही घट होत गेली आणि १९७२ नंतर अकरा वर्षांत ही घट जवळजवळ १९ टक्के होती.

रामाराव चित्रपटअभिनेते म्हणून लोकप्रिय असल्याने त्यांच्या सभांना गर्दी होते; पण लोक मते इंदिरा कॉंग्रेसलाच देतील असे सांगून इंदिरासमर्थक रामाराव आणि त्यांचा तेलगूदेशमपक्ष यांचे महत्त्व कमी लेखत होते. त्या पक्षाने व त्यांच्या नेत्याने जनमताची केवढी मोठी पकड घेतली आहे याची इंदिरा कॉंग्रेसच्या नेत्यांना कल्पना आली नाही असे म्हणण्यापेक्षा त्यांना कल्पना आली होती पण इंदिरा गांधींचा रोष व अप्रियता कशाला ओढवून घ्या म्हणून वस्तुस्थिती त्यांनी इंदिरा गांधींपासून दडवून ठेवली. इंदिरा गांधींनी निवडणुका लौकर घोषित केल्या म्हणून एवढ्या तरी जागा त्यांच्या पक्षाला मिळाल्या. निवडणुका आणखी एक आठवडा उशीरा झाल्या असत्या आणि रामाराव यांना तेलगणमध्ये प्रचाराला एक आठवडा मिळाला असता तर आमच्या ६० जागा ६ वर आल्या असत्या असे इंदिराकॉंग्रेसच्याच एका कार्यकर्त्याने 'इंडिया टुडे' च्या वार्ताहराजवळ कबूल केले.

इंदिरा गांधींच्या कार्यपद्धतीमुळे तेलगूजनतेचा स्वाभिमान दुखावला गेला होता. आपल्या लहरीप्रमाणे दोन वर्षांत चार वेळा त्यांनी मुख्यमंत्री आणि पाच वेळा प्रदेशकॉंग्रेसचे अध्यक्ष बदलले. रामाराव यांनी आपल्या प्रचारदौऱ्यात यावर कडक टीका करून यापुढे आम्ही हे चालू देणार नाही असे सांगून तेलगू जनतेच्या स्वाभिमानास आवाहन केले. आपला स्वाभिमान जपणारा नेता रामाराव यांच्या रूपाने लोकांना मिळाला आणि त्यांनी तेलगूदेशमला मोठ्या बहुमताने निवडून दिले. तेलगूदेशमने २०२ जागा जिंकून कॉंग्रेसच्या १९७२ मधील उच्चांकाची बरोबरी केली खरी; पण त्या वेळी कॉंग्रेसला ५२ २९ टक्के मते मिळाली होती. तेलगूदेशमला या वेळी ४७.५ टक्के मते मिळाली आहेत सर्वांत जास्त मते त्या पक्षाने मिळवली असली तरी ती ५० टक्क्यांपेक्षा कमीच आहेत.

तेलगू जनतेने इंदिरा कॉंग्रेसला पर्याय म्हणून तेलगूदेशम पक्षच निवडला, राष्ट्रीय पातळीवरचे इतर विरोधी पक्ष निवडले नाहीत याचे कारण तेथे प्रभावी विरोधी पक्षच नाही. १९५२ च्या पहिल्या निवडणुकीच्या वेळी आंध्र व तेलंगणमध्ये कम्युनिस्ट व डाव्या पक्षांचा प्रभाव होता. आंध्रमध्ये त्या वेळी कम्युनिस्टांनी ४१ म्हणजे कॉंग्रेसपेक्षा एक जागा अधिक मिळविली होती आणि तेलगणभागात कम्युनिस्ट नेतृत्वाखालील पुरोगामी लोकशाही आघाडीला ३७ जागा मिळाल्या होत्या. १९५५ मध्ये फक्त आंध्रभागात झालेल्या निवडणुकात कम्युनिस्टांच्या जागा १५ पर्यंत घटल्या; पण त्यांनी मते ३१.१३ मिळविली. १९५२ पेक्षा त्यांच्या मतात ११ टक्के वाढ झाली. १९५७ मध्ये फक्त तेलगण भागातील निवडणुकात कम्युनिस्ट नेतृत्वाखालील पीपल्स डेमोक्रॅटिक फ्रंटने २२ जागा व २५.१९ टक्के मते मिळविली. आंध्र व तेलंगण एकत्र

येऊन स्थापन झालेल्या आंध्रप्रदेशाची पहिली निवडणूक १९६२ मध्ये झाली तीत कम्युनिस्टांनी ५१ जागा व १९.५३ टक्के मते मिळविली. त्यानंतरच्या निवडणुकात मात्र जागा व मते दोन्ही दृष्टीनी कम्युनिस्टाचे बळ घटले असल्याचे दिसते. कम्युनिस्ट पक्षात फूट हे याचे एक कारण असले तरी तेवढेच कारण म्हणता येणार नाही १९६७ पासूनच्या चार निवडणुकांत कम्युनिस्टांना जागा अनुक्रमे ११, ७, ६ व ४ आणि मते ७.५२, ५.९८, २.४८ व २.७९ टक्के अशी मिळाली. यावरून कम्युनिस्टांच्या जागात तर चार निवडणुकात सतत घट होत गेलीच आणि मते १९७८ पेक्षा किंचित वाढली असली तरी १९७२ च्या तुलनेने ती निम्म्यापेक्षाही अधिक घटली आहेत. मार्क्सवादी पक्षाला याच चार निवडणुकांत अनुक्रमे ९, १, ८ व ५ जागा आणि मते ७.७८, ३.१८, २.७१, व २ ०१ टक्के अशी मिळाली आहेत. दोन्ही कम्युनिस्ट पक्षानी या वेळी प्रथमच एकत्र येऊन निवडणुका लढविल्या होत्या; पण त्यामुळे त्यांचे बळ वाढले तर नाहीच, उलट कमी झाले आंध्र व तेलंगणात १९५२ मध्ये कम्युनिस्टाचा प्रभाव असता केरळ व पश्चिम बगालप्रमाणे तेथे कम्युनिस्टाचे बळ का वाढले नाही याचा शोध दोन्ही कम्युनिस्ट पक्षानी अंतर्मुख होऊन आणि खऱ्या अर्थाने आत्मटीका करून घ्यावयास हवा.

भाजपचे बळ पूर्वीच्या जनसंघापेक्षा किंचित वाढले आहे. १९६७ व १९७२ च्या निवडणुकात जनसंघाला अनुक्रमे ३ व ० जागा आणि मते २.११ व १.८६ टक्के मिळाली होती. १९८३ मध्ये १९६७ एवढ्याच ३ जागा मिळाल्या. मते मात्र २.७९ टक्के म्हणजे १९६७ पेक्षा किंचित वाढली. जनतापक्षाला १९७८ मध्ये ६० जागा व २८.७४ टक्के मते मिळाली होती, तर या वेळी त्या पक्षास फक्त १ जागा आणि ०.९४ टक्के म्हणजे एक टक्क्यापेक्षाही कमी मते मिळाली. शेजारच्या कर्नाटकात जनतापक्ष सत्तारूढ झाला; पण आंध्रप्रदेशात तो जनतेपासून किती दुरावला आहे हेच या आकडयांवरून दिसून येते. कॉंग्रेस (एस) ला एकही जागा मिळाली नाही व मते ०.५२ टक्के पडली.

विजयी अपक्ष उमेदवाराची संख्या व मतांचे प्रमाण १९६७ व १९७२ च्या तुलनेने १९७८ व १९८३ मध्ये बरेच घटले आहे. १९६७ मध्ये ६८ व १९७२ मध्ये ५६ उमेदवार निवडून आले होते. त्यांना मते अनुक्रमे २६.४२ व ३२ ०८ टक्के मिळाली. १९७८ च्या निवडणुकात १५ व १९८३ मध्ये २३ अपक्ष उमेदवार विजयी झाले. त्याना मते अनुक्रमे ९.२९ व १०.६४ टक्के मिळाली. या वेळी विजयी अपक्ष उमेदवारांची संख्या १९७८ पेक्षा थोडी वाढली याचे कारण इंदिरा कॉंग्रेसने तिकिटे नाकारलेले काही बडखोर अपक्ष म्हणून उभे राहिले व निवडून आले; पण एकूण अपक्ष उमेदवार पूर्वीच्या तुलनेने कमी निवडून येत आहेत हे मतदाराची जागरूकता वाढल्याचे निदर्शक आहे. असे हे आंध्रप्रदेशचे निवडणूकचित्र आहे. प्रादेशिक पक्षामुळे राष्ट्रीय एकात्मतेत बाध येईल असा प्रचार इंदिरा गांधींनी केला होता; पण त्याचा प्रभाव जनमतावर पडला नाही आणि तेलगूदेशमच्या धोरणासबंधी रामाराव यांनी केलेली निवेदने लक्षात घेता व्यापक राष्ट्रहितास विरोधी असे धोरण तो पक्ष घेईल असे वाटत नाही.

आंध्रप्रदेशापेक्षा कर्नाटकातील इंदिरा-कॉंग्रेसचा पराभव अधिक अनपेक्षित व धक्का देणारा होता. गुंडूरावांच्या भ्रष्टाचारी राजवटीला इंदिरा गांधीनी दिलेले संरक्षण हे तेथील इंदिरा कॉंग्रेसच्या पराभवाचे मुख्य कारण. आंध्रप्रदेशात इंदिरा गांधीनी चार मुख्यमंत्री बदलले; पण कर्नाटकात गुंडूरावना कायम ठेवले. तुम्ही त्याना सत्तेवरून हटवत नाही तर आम्ही हटवतो असे मतदारांनी त्यांचा व त्यांच्या पक्षाचा पराभव करून दाखवून दिले. इंदिरा कॉंग्रेसला ८१ जागा व ४०.३२ टक्के मते मिळाली. १९५७ पासूनच्या सहा निवडणुकात कॉंग्रेसला मिळालेल्या जागा व मतात कसा फरक पडत गेला याची कल्पना पुढील तक्त्यावरून येईल

## कर्नाटक विधानसभा निवडणुका

(१९५७ ते १९८३)

**कॉंग्रेसच्या जागा व शेकडा मते**

| वर्ष | जागा | शे. मते |
|---|---|---|
| १९५७ | १५१ | ५२ ०९ |
| १९६२ | १३८ | ५०.७२ |
| १९६७ | १२६ | ४८.६३ |
| १९७२ | १६५ | ५२.१७ |
| १९७८ | १४९ | ४३ |
| १९८३ | ८१ | ४० ३२ |

यातील १९७२ चे आकडे पहिल्या फुटीनंतरच्या इंदिरा कॉंग्रेसचे आणि १९७८ व १९८३ चे आकडे दुसऱ्या फुटीनतरच्या इंदिरा कॉंग्रेसचे आहेत. १९७२ ची निवडणूक हा जागा व मते दोन्ही दृष्टीनी कॉंग्रेसच्या विजयाचा उच्चांक होता; पण दुसऱ्या फुटीनंतर इदिरा कॉंग्रेसने कर्नाटकात १९७८ मध्ये सत्ता राखली तरी तिचे बळ १९७२ पेक्षा घटले आणि ही घसरण पुढे चालू राहून १९८३ मध्ये तिनें सत्ता गमावली.

## कॉंग्रेस (आय)–सत्ता गेली !

निवडणुकीसाठी जनता व क्रांतिरंग या दोन पक्षानी सयुक्त आघाडी केली होती; पण तिला निर्णायक बहुमत मिळू शकले नाही. या आघाडीने विधानसभेच्या २२४ जागापैकी ९५ जागा जिंकल्या; पण भाजप, दोन्ही कम्युनिस्ट पक्ष व काही अपक्ष सभासदानी पाठिंबा दिल्याने तेथे विरोधी पक्षाचे सरकार आले. क्रांतिरग पक्ष निवडणुकीनंतर जनता पक्षात विलीन झाला; पण मुख्यमत्री निवडीसाठी घटकनेत्यात जो संघर्ष झाला त्याने पूर्वीच्या जनता पक्षातील भाडणाची आठवण करून दिली. बगारप्पा गटाला फोडण्याचे इंदिरा कॉंग्रेसच्या नेत्यांनी प्रयत्न केले; पण ते असफल झाले. मुख्यमंत्रिपद न मिळाल्याने बगारप्पा असंतुष्ट आहेत; पण त्याच्या मागे फार मोठा गट नाही हे स्पष्ट झाले आहे.

भाजपने १८ जागा मिळविल्या हे पूर्वीच्या जनसघापेक्षा त्याचे बळ वाढल्याचे निदर्शक आहे. १९५७ पासून १९७२ पर्यंतच्या निवडणुकांत जनसघाने फक्त १९६८ मध्ये ४ जागा मिळविल्या बाकीच्या निवडणुकांत त्याला एकही जागा मिळाली नाही. त्याला मिळालेल्या मताचे प्रमाण १.३४, २.२८, २.८१, ४.३ असे वाढत गेले. १९७८ मध्ये जनसंघ जनतापक्षात समाविष्ट होता. जनतापक्षातील फुटीनतर जनसघाने भाजप हे नवे रूप घेतले व १९८३ मध्ये प्रथमच स्वतंत्रपणे निवडणुका लढवून कर्नाटकात १८ जागा जिंकल्या. त्याला मते ७.९८ टक्के मिळाली, जनसघाने पूर्वीच्या निवडणुकात मिळवलेल्या मतापेक्षा हे प्रमाण जास्त आहे.

जनता पक्षाने सर्वांत जास्त जागा मिळविल्या तरी त्याला मते ३३ टक्के म्हणजे

इंदिरा काँग्रेसच्या मतापेक्षा ७ टक्क्यांनी कमी मिळाली आहेत आणि १९७८ मधील जनता पक्षाच्या मतापेक्षाही त्यात ४ टक्के घट झाली आहे. क्रांतिरंगपक्षाशी आघाडी करून जनता पक्षाला जागा अधिक मिळाल्या; पण मतांचे प्रमाण वाढण्याऐवजी त्यात घटच झाली. जनता पक्षाला १९७८ मध्ये ६० जागा व ३७.९५ टक्के मते मिळाली होती.

दोन्ही कम्युनिष्ट पक्षापैकी कम्युनिस्टाना ३ जागा व १.२५ टक्के मते मिळाली. यापूर्वीच्याही निवडणुकात त्यांना ३ पेक्षा अधिक जागा कधी मिळालेल्या नाहीत आणि १९६२ मध्ये मिळालेली २.८८ टक्के मते हीच त्यांना आतापर्यंतच्या निवडणुकांत मिळालेली सर्वांत जास्त मते असून इतर निवडणुकांत ती अर्धा टक्का ते सव्वा टक्क्याचे आसपास आहेत. मार्क्सवादी पक्षाने या वेळी प्रथमच ३ जागा मिळवल्या. आतापर्यंतच्या निवडणुकांत त्याला एकही जागा मिळालेली नव्हती आणि त्याला मिळालेली मते नेहमीच एक टक्क्याच्या आसमास आहेत. दोन्ही कम्युनिस्ट पक्षांना कर्नाटकात पाठिंबा फार थोडा आहे.

अपक्ष उमेदवारांनी आंध्रप्रदेशाप्रमाणे कर्नाटकातही २२ जागा मिळविल्या; पण त्यांना मते ७.५३ टक्के म्हणजे आंध्रमधील मतांपेक्षा कमी आहेत. विजयी अपक्ष उमेदवार १९५७ मध्ये ३९, १९६२ मध्ये २७, १९६७ मध्ये ४१, १९७२ मध्ये २० व १९७८ मध्ये फक्त १० होते. त्यांना मते अनुक्रमे ३०.५९, १७.३१, २८.१७, १२.८७ व ०.७४ अशी मिळाली. अपक्ष उमेदवार कमी निवडण्याकडे मतदारांचा कल १९७८ मध्ये दिसला; पण या वेळी त्यांची संख्या २२ पर्यंत वाढली.

सीमाभागातून महाराष्ट्र एकीकरण समितीचे उमेदवार पुन: निवडून आले व महाराष्ट्रात सामील होण्याचे बाजूने आपला कौल मतदारांनी दर्शविला.

असे हे कर्नाटकातील निवडणुकीचे चित्र. तेथे जागाचे दृष्टीने इंदिरा काँग्रेसचा पराभव झाला असला तरी मतांच्या दृष्टीने तोच सर्वांत अधिक पाठिंबा असलेला पक्ष आहे. त्या पक्षाला सत्ता टिकविण्यात अपयश आले; पण आंध्रप्रदेशाइतकी तेथे इंदिरा काँग्रेसची घसरण झालेली नाही.

त्रिपुरामध्ये डाव्या आघाडीने सत्ता टिकविली; पण तिचे बळ १९७८ पेक्षा घटले, १९७८ मध्ये आघाडीने ६० पैकी ५६ जागा जिंकल्या होत्या. या वेळी तिला ३९ च जागा मिळाल्या त्यापैकी ३७ मार्क्सवाद्यांच्या व २ क्रांतिकारी समाजवादीपक्षाच्या आहेत. १९७८मध्ये मार्क्सवाद्यांच्या ५२ आणि क्रांतिकारी समाजवादी पक्ष व पुरोगामी गट याना प्रत्येकी २ जागा मिळाल्या. या वेळी पुरोगामी गटास एकही जागा मिळालेली नाही. तसेच आघाडीत सामील झालेल्या कम्युनिस्ट पक्षासही एकही जागा मिळू शकली नाही. इंदिरा काँग्रेसला १९७८ च्या निवडणुकीत एकही जागा मिळाली नाही या वेळी त्या पक्षाने त्रिपुरा उपजाती युवा समिती या आदिवासींच्या प्रादेशिक पक्षाशी युती करून १२ जागा मिळवल्या. इंदिरा गांधींनी प्रादेशिक पक्षांवर इतरत्र टीका केली, येथे मात्र त्याच्याशी युती केली. हा पक्ष केवळ प्रादेशिकच नव्हे तर फुटीर प्रवृत्तीचे गट त्यात असून अतिरेक्यांशीही त्याचे संधान आहे. अतिरेक्यानी निवडणुकीवर बहिष्कार पुकारला होता; पण त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्रिपुरा उपजाती समितीला १९७८ मध्ये ४ जागा मिळाल्या होत्या. या वेळी २ अधिक मिळाल्या. तीन अपक्ष निवडून आले. त्यापैकी एक 'आमरा बंगाली' संघटनेचा आहे डाव्या आघाडीला १९७८ पेक्षा कमी जागा मिळाल्या असल्या तरी जवळजवळ दोनतृतीयांश जागा तिने जिंकल्या असून मंत्रिमंडळाला अस्थिरतेचा धोका आहे.

## भाजप—दोन प्रवाह

आंध्र-कर्नाटकच्या निवडणुकानी इंदिरा काँग्रेसला हादरा दिला तर दिल्ली महापालिका आणि महानगरपरिषदेच्या निवडणुकांनी भाजपला हादरा दिला. आपला पक्ष या निवडणुका जिंकणार असा आत्मविश्वास भाजपचे नेते तर व्यक्त करीत होतेच; पण इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांनाही वाटत होते. वृत्तपत्रांचेही अंदाज याबाबतीत चुकले. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ओपीनियनचे संचालक द कोस्टा यांनी मात्र 'हिंदुस्थान टाइम्स' मध्ये लिहिलेल्या लेखात अचूक अंदाज केला होता. दोन फेब्रुवारीला म्हणजे निवडणुकीच्या आधी तीन दिवस एक हजार मतदारांची नमुना पाहणी त्यांच्या संस्थेने केली व त्यावरून इंदिरा काँग्रेसला ४८ टक्के व भाजपला ३९ टक्के मते मिळतील असा निष्कर्ष निघाला. जागांबद्दल या पाहणीत अंदाज केलेला नव्हता; पण इंदिरा काँग्रेसला भाजपपेक्षा अधिक पाठिंबा आहे हे त्यावरून स्पष्ट झाले होते. हरिजन, मुस्लिम व शीख या अल्पसंख्याकांचा पाठिंबा इंदिरा काँग्रेसला अधिक असल्याचे या पाहणीत दिसून आले होते आणि दिल्ली प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष भगत यांनी आपल्या विजयाचे तेच कारण दिले. दिल्ली महापालिका निवडणुकीत इंदिरा काँग्रेसने १०० पैकी ५७ जागा जिंकल्या आणि भाजप ३८, लोकदल चरणसिंग गट, ३, जनता १, अपक्ष १, अशा जागा इतर पक्षांना मिळाल्या. डाव्या पक्षाना एकही जागा मिळाली नाही. महानगरपरिषदेच्या निवडणुकीत एकूण ५६ जागांपैकी इंदिरा काँग्रेसने ३४ जिंकल्या, भाजप १९, लोकदल (चरणसिंग) २, व जनतापक्ष १ अशा जागा इतर पक्षांना मिळाल्या. निवडणुकीसाठी भाजपने लोकदल चरणसिंग गटाशी युती केली होती.

अल्पसंख्य जमातीच्या पाठिंब्याने इंदिरा काँग्रेस विजयी झाली असा दावा त्या पक्षातर्फे केला जातो तो फारसा बरोबर नाही असे 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या अभ्यासतुकडीने केलेल्या अभ्यासाचे निष्कर्षावरून दिसून येते. मुस्लिम मत या वेळी इंदिरा काँग्रेस विरुद्ध गेले आहे असा या अभ्यासाचा निष्कर्ष आहे महानगरपरिषदेवर निवडून आलेल्या चार मुस्लिमांपैकी २ भाजपचे, १ जनता पक्षाचा व फक्त एक इंदिरा काँग्रेसचा आहे आणि हा इंदिरा काँग्रेसचा उमेदवार बहुसंख्य हिंदु वस्तीच्या भागातून निवडून आलेला आहे. महापालिकेत ६ मुस्लिम निवडून आले त्यापैकी ३ भाजपचे असून जनता इंडियन युनियन मुस्लीम लीग आणि इंदिरा काँग्रेस यांचा प्रत्येकी एक निवडून आला आहे. पण मुस्लिम मतदार इंदिरा काँग्रेसपासून दुरावला असला तरी तो भाजपकडे अधिक झुकलेला नसून त्याची मते विरोधी पक्षांमध्ये विभागली गेली आहेत.

भाजपमध्ये दोन प्रवाह आहेत. एक उदार मतवादी प्रवाह आणि दुसरा कट्टर हिंदुत्वनिष्ठ प्रवाह. वाजपेयी पहिल्या प्रवाहाचे पुर-

पृष्ठ २८ वर

# मर्यादित राजकीय शक्ती असलेले साखरसम्राट

तुकाराम कोकजे

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी श्री. वसंतराव दादा पाटील यांची निवड झाली. महाराष्ट्राच्या राजकारणातील अस्थिरतेचे वातावरण संपले आहे असे मानावयास हरकत नाही. गेले दीड वर्ष राजकारणातील अस्थिरतेमुळे महाराष्ट्राचे शासन ठप्प झाले होते, ते आता पुढे चालू लागेल अशी आशा आहे. बॅ. बाबासाहेब भोसले यानी फायलींचा फडशा पाडण्यासाठी सप्ताह साजरे केले. त्या काळात सामान्य जनाना मंत्रालयाचे दरवाजे बद ठेवले. बॅ अतुले यांच्या कारकीर्दीपासून साचलेल्या हजारो फायली हातावेगळया केल्याच्या घोषणा झाल्या. बॅ. भोसले यांच्या कारभाराला एक वर्ष झाल्याबद्दल वृत्तपत्रातून पान पान जाहिराती फडकल्या आणि त्यात भोसल्यांच्या राज्यात झालेल्या चांगल्या कामाचे गुणवर्णन वाचावयास मिळाले; परंतु सबंध वर्षभर राज्यात काही शासन होते अशी जाणीव जनतेला झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच मुख्यमंत्री वसंतदादा यांनी शपथविधी झाल्यानंतर मंत्रालयात पाऊल टाकताच वार्ताहरांशी बोलताना सांगितले की, ' राज्य चालले आहे असे लोकाना वाटले पाहिजे.' त्या दृष्टीने पहिले पाऊल उचलण्याचे त्यानी ठरवले आहे. वसंतरावदादाचा मुख्यमंत्रीपदाचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. आपल्या हळुवार आवाजात सर्वांना आपलेसे करून घेण्याचे त्याचे कौशल्य, संघटनाचातुर्य आणि लोकांची कामे करून देण्याचा सातत्याचा प्रयत्न यामुळे वसंतरावदादा आपली लोकप्रियता टिकवून आहेत आणि त्याचा फायदा त्याना मुख्यमंत्रीपदी काम करताना अवश्य होईल.

श्री. वसंतदादा हे सहकारी चळवळीतील एक कसदार कार्यकर्ते. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे नेते. सहकारी साखर कारखान्याचे राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वही त्यांच्याकडेच. त्यामुळे वसंतदादांचा हा विजय म्हणजे साखरसम्राटाचा विजय असे मानण्यात येते.

महाराष्ट्राच्या राजकारणावर साखरसम्राटाचा प्रभाव आहे असा खूपच गवगवा झाला आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी येणारी व्यक्ती ही ' साखरसम्राटांच्या सल्ल्याने व मान्यतेनेच येते असाही एक समज झालेला आहे आणि साखरसम्राटाना अमान्य असलेली व्यक्ती मुख्यमंत्रीपदी आली तर तिला ते टिकू देत नाहीत. अशा प्रकारे साखरसम्राटच राजकारण चालवितात असा भास निर्माण करण्यात आला आहे महाराष्ट्राचे राजकारण खरोखरच साखरसम्राट चालवितात का ?

महाराष्ट्रात कै. विठ्ठलराव विखेपाटील यांच्या प्रयत्नाने प्रवरानगर येथे पहिला सहकारी साखर कारखाना सुरू झाला. त्यापूर्वी साखरनिर्मिती खासगी क्षेत्राकडे होती; परंतु प्रवरानगर येथील यशातून स्फूर्ती घेऊन महाराष्ट्रात सहकारी साखरकारखान्याची मालिकाच सुरू झाली. सहकारी साखर कारखाना सुरू झाला की, त्या भागातील आर्थिक, सास्कृतिक व शैक्षणिक जीवनच बदलते. सहकारी कारखान्यामुळे ऊसकरी शेतकऱ्याना भाव चांगला मिळतो. कारखान्याच्या मदतीने कुक्कुटपालन, दूधउत्पादन यासारखे व्यवसाय करून जादा प्राप्ती करता येते. फुकट गोबरगॅस मिळतो. कारखान्यातर्फे शेतकऱ्यांच्या मुलांच्या शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाची व्यवस्था होते. असे अनेक फायदे कारखान्याच्या परिसरातील शेतकरी व इतराना मिळतात. सहकारी साखर कारखान्यांनी ऊस पिकणाऱ्या प्रदेशात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सास्कृतिक क्रातीच घडवून आणली आहे. अशी क्राती घडवून आणणारी व्यक्ती शेतकऱ्याना देवासमान वाटली व त्याच्या शब्दात ते राहिले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. म्हणून राजकारणी मंडळी आपल्या भागातील साखर कारखाना आपल्या हाती ठेवण्याचा कायम प्रयत्न करतात. ज्याच्या हाती असा कारखाना नसतो ते असलेल्या कारखान्यावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे साखर कारखान्यांच्या निवडणुका गाजतात. अगदी सार्वत्रिक निवडणुकीप्रमाणे मतदार विभागात रणधुमाळी माजते. साखर कारखाना हातात असणे म्हणजे त्या क्षेत्रातील मते आपल्या खिशात असण्यासारखे आहे, नव्हे असतातच. ऊसमळेवाले शेतकरी व इतरेजन साखर कारखान्याच्या चेअरमनच्या इच्छेनुसार मतदान करतात. त्यामुळे चेअरमन स्वत: किंवा आपला माणूस विधानसभेत निवडून आणू शकतो.

याखेरीज साखर कारखान्याच्या चेअरमनच्या हाती कारखान्याचा मोठा निधी असतो. साखर कारखान्याच्या खर्चावर सहकारखात्याने काही कायदेशीर नियंत्रणे घातली आहेत तरीही कारखान्याच्या खर्चातून बराच निधी बाहेर काढता येतो. या पैशाचा उपयोग अर्थातच विधानसभा व लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी होतो. यासाठी एक साखर कारखाना ताब्यात असणे आवश्यक असते आणि म्हणूनच साखर कारखाना हे सत्तेचे केन्द्र मानण्यात येते.

आज महाराष्ट्रात ६७ सहकारी कारखाने आहेत. त्यापैकी सहा जनता पक्षाच्या नेत्याच्या नियंत्रणाखाली आहेत. पाच शरद पवार यांच्या गटाकडे आहेत. अर्थात ही सर्व नेतेमंडळी कारखाना सुरू झाला तेव्हा काँग्रेस पक्षात होती. नंतर पक्ष बदलेले ५६ कारखाने काँग्रेस (इं) कडे आहेत. सहकारी साखर कारखान्याद्वारे आपल्या मतदारसंघावर आपली सत्ता कायम ठेवता येते हे तत्त्व नेतेमंडळीच्या इतके मनात रुजले आहे की, साखर कारखाने उभारण्याची एक स्पर्धाच सुरु झाली आहे. महाराष्ट्रात आज १४ साखर कारखान्यांच्या उभारणीचे काम सुरु आहे तर २०० सहकारी साखर कारखान्याच्या योजना शासनापुढे विचारार्थ आहेत. विदर्भात दोनच सहकारी कारखाने आहेत; पण १४ प्रकरणे शासनाकडे विचारार्थ पडून आहेत. मराठवाड्यात १५ कारखाने आहेत व २ कारखान्यांना परवानगी मिळाली आहे.

सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन हे त्या त्या भागातील सत्ताधीश असतात. त्यामुळे साखर कारखाने ही सत्तेची केंद्रे झाली आहेत असे म्हटले जाते; परंतु महाराष्ट्राच्या राजकारणावर या सत्ताधीशाचे काही नियंत्रण आहे का? किंवा महाराष्ट्राचे राजकारण सहकारी साखर कारखानदारांच्या मर्जीनुसार चालते का? या प्रश्नाचे उत्तर गेल्या काही वर्षातील राजकीय घटनांची तपासणी करून काढावे लागेल.

## मुख्यमंत्री आणि साखरसम्राट

सहकारी साखर कारखान्याच्या सत्ताशक्तीची पहिली जाहीर वाच्यता श्री. यशवंतराव चव्हाण यांनी १९६० साली केली. या वेळेपर्यंत महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांचे आजच्यासारखे जाळे पसरलेले नव्हते. परंतु जे साखर कारखाने होते त्यानी आपल्या शक्तीचा प्रत्यय आणून द्यावयास सुरुवात केली होती. परंतु ही शक्ती सीमित होती. त्याचा प्रभाव महाराष्ट्रावर नव्हता. श्री. चव्हाण केन्द्रात गेले आणि कन्नमवारजीकडे मुख्यमंत्रीपदाची सूत्रे आली. त्या वेळी साखरसम्राट अस्तित्वातच नव्हते. कन्नमवारजी गेले व श्री. वसंतराव नाईक आले. त्या वेळीही साखरसम्राटांना कोणी विचारले नव्हते.

श्री. वसंतराव नाईक अकरा वर्षे मुख्यमंत्रीपदी होते आणि त्यांच्याच कारकीर्दीत सहकारी साखर कारखान्याचे मोठे जाळे पश्चिम महाराष्ट्रात विणले गेले. ज्या वसंतरावांच्या मदतीने एकामागोमाग एक सहकारी साखर कारखाने जन्मले त्या वसंतरावांच्या विरुद्ध कोणी नव्हते. असणे शक्यच नव्हते. उलट वसंतरावांचे संबंध सर्व साखरसम्राटांशी फार सलोख्याचे होते. कारण वसंतरावांच्या सहाय्यानेच हे सर्वजण साखरसम्राटपदाला पोहोचले होते. तेव्हा वसंतराव नाईक याच्या उचलबांगडीत साखरसम्राटांचा हात असणे कसे शक्य आहे? शिवाय नाईक यांच्या जागी आलेले श्री. शंकरराव चव्हाण यांच्या मागे साखरसम्राटाची शक्ती मुळीच नव्हती. कारण मराठवाड्यात सहकारी साखर कारखाने कमी, आणि जे होते ते काही शक्तिकेन्द्रे झालेले नव्हते. वसंतराव नाईक याचा अस्त आणि शंकरराव चव्हाण यांचा उदय यात साखरसम्राटांचा काहीच संबंध नाही हे निश्चित.

श्री. शंकरराव चव्हाण म्हणजे सरळ चालीचा व कठोर शिस्तीचा माणूस. शिवाय देशात शिस्तपर्व चालूच होते. त्यामुळे शंकररावांच्या शिस्तीची धार जास्तच तीक्ष्ण झाली. त्यात अनेक आमदार जखमी होऊ लागले. आमदारांना शासनात ढवळाढवळ करता येईना. साधी तलाठ्याची बदली करून घेणे जमेना तर इतर नियमबाह्य कामाचे तर नावच नको, त्याचा परिणाम म्हणजे आमदाराची नाराजी. आपली कामे न करणारा मुख्यमंत्री कोणाला चालेल? आणीबाणीचा काळ होता त्यामुळे आमदाराचे हात बांधलेले होते. शंकररावांनी वागण्यात अघळपघळपणा ठेवला असता, शिस्तीचा बडगा उचलला नसता, आमदाराना त्यांच्या त्यांच्या राज्यात धुडगूस घालू दिला असता तर कदाचित शंकररावाच्यावर लौकर जाण्याची पाळी आली नसती. शेवटी आमदाराचीही काही अस्मिता (!) प्रतिष्ठा! आहे की नाही? त्यांनाही राज्यकारभाराला हात लावू दिला पाहिजे की नाही? या सर्व प्रश्नाच्या उत्तरात शंकररावांच्या गमनाचे कारण सापडेल

श्री.शंकरराव चव्हाणाच्या जागी श्री वसंतदादा पाटील आले. श्री.वसंतदादा साखरसम्राटाचे निर्विवाद नेते, तेव्हा सर्व साखरसम्राट त्यांच्या पाठीशी उभे राहणे स्वाभाविकच; पण त्या साखरसम्राटानी दादाना सत्तेवर आणले का? याचे उत्तर शंभर टक्के होय असे देता येणार नाही. दादा हे सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष होते तसे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचेही अध्यक्ष होते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाहीपण सत्ताकेंद्रेच आहेत. कारण इथेही शेतकऱ्यावर अनेक मार्गानी मेहेरनजर करून त्याना अंकित करून घेता येते. त्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची सर्वोच्च संघटना म्हणजे राज्य सहकारी बँक. तिच्या अध्यक्षाच्या हातात ग्रामीण अर्थव्यवस्थेची सर्व सूत्रेच असतात. त्यामुळे सदर अध्यक्षपद हे राज्यातील अत्यंत महत्त्वाचे सत्ताकेंद्र. दोन्ही सत्ताकेंद्रे दादाच्या हाती होती. त्यामुळे त्यानी महाराष्ट्रात खूपच लोकप्रियता मिळविली होती. त्याचाच जास्त फायदा दादाना मुख्यमंत्रीपदाची वाटचाल करताना मिळाला. तेव्हा दादांच्या सत्ताग्रहणाचे श्रेय केवळ सहकारी साखर कारखानदाराना लाटता येणार नाही.

श्री. शरद पवार यांनी दादाच्या हातून सत्ता हिसकावून घेतली. त्यात साखरसम्राटाचा काहीच भाग नाही. उलट त्याचे नेते दादा याना ते वाचवू शकले नाहीत हा त्यांचा मोठाच पराभव मानावा लागेल. शरद पवार चाळीस आमदार घेऊन काँग्रेस पक्षातून बाहेर पडले व जनता पक्षाशी हातमिळवणी करून त्यानी सत्ता ताब्यात घेतली. शरद पवारांच्या मागे साखरसम्राटांचे पाठबळ नव्हते किंवा जनता पक्षाच्या मागेही नव्हते. तरीही साखरसम्राटांचा भरभक्कम पाठिंबा असलेले दादा सत्ताभ्रष्ट झाले. त्या राजकारणाची चर्चा इथे करावयाची नाही आहे; परतु एक मुद्दा सिद्ध होतो व तो म्हणजे साखरसम्राटाचा महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव नव्हता.

१९७९ मध्ये जनता पक्ष फुटण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यातून मध्यावधी निवडणुका आल्या व इंदिरा काँग्रेस केंद्रात पुन्हा सत्तेवर आली. ज्या राज्यात बिगरकाँग्रेसी सरकारे होती तिथे विधानसभा बरखास्त करून नव्या निवडणुका घेण्यात आल्या. महाराष्ट्रातही निवडणुका झाल्या व इंदिरा काँग्रेस पक्षाने अपेक्षेप्रमाणे विधानसभेत बहुमत पटकावले. अर्थात त्यापूर्वी शरद पवार मंत्रिमंडळ बरखास्त झाले. म्हणजेच शरद पवार यांच्या मंत्रिमंडळाचा अस्त हा निवडणुकीमुळे झाला, साखरसम्राटांच्या प्रभावामुळे नाही ही गोष्ट ध्यानात घेणे आवश्यक आहे.

१९८० च्या मध्यावधी निवडणुकीनंतर काँग्रेस विधानसभा पक्षाचे नेतृत्व बॅ. अब्दुल रहमान अंतुले यांच्याकडे आले. त्या वेळी अंतुले विरुद्ध दादा अशी स्पर्धा होती. काँग्रेस (इं) श्रेष्ठीनी श्री. सीताराम केसरी व श्री. ए पी. शर्मा यांना महाराष्ट्रात निरीक्षक म्हणून पाठविले. सर्व आमदारांना भेटून त्याचा सर्वसाधारणपणे कोणाला पाठिंबा आहे हे अजमावण्याची कामगिरी केसरी शर्मा याच्यावर होती. त्यांनी सर्व आमदारांची व्यक्तिगत भेट घेऊन त्याना कोण नेता पाहिजे हे विचारले. त्यातून बहुतांश आमदाराचा पाठिंबा बॅ अंतुले याना दिसल असा आपाला अहवा निरीक्षकानी काँग्रेस (इं) श्रेष्ठीना दिला आणि बॅ. अंतुले हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

## अंतुले आणि दादा

या मध्यावधी निवडणुकीची मोहीम सुरू होण्यापूर्वी बॅ. अंतुले व श्री. वसंतदादा याना भेटण्याची संधी मला लाभली होती. बॅ. अंतुले याना नारायण दाभोळकर रोडवरील 'अंबर' गेस्टहाउसमध्ये मी भेटलो. मी त्याना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदासंबंधी स्पष्टपणेच विचारले. बॅ. अंतुले म्हणाले, 'कोकजे, महाराष्ट्राचा पुढील मुख्यमंत्री तुमच्यासमोर बसला आहे.'

'आपण तर विधानसभेची निवडणूकही लढवीत नाही आहात?'—मी

'मी मुख्यमंत्री झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत विधानसभा किंवा विधानपरिषदेवर निवडून येणे आवश्यक आहे. ते

मी करीन '–बॅ. अंतुले.

'नवीन निवडून आलेल्या आमदारांनी तुम्हाला नेता निवडले पाहिजे ना ?'

'होय. ती एक तांत्रिक गरज आहे; परंतु मॅडमनी (म्हणजे इंदिराजी) मला सांगितले आहे की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी मी स्वीकारावी अशी त्यांची इच्छा आहे. मी त्यांना कबूल केले आहे.'

'असे आहे तर आपण आजच विधानसभेची निवडणूक का लढवीत नाही ?'

'मी आज विधानसभेला उभा राहिलो तर मी मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार आहे हे उघड होईल व आमचे प्रतिस्पर्धी मला निवडणुकीत पाडण्याचा प्रयत्न करतील. मॅडमना ही रिस्क ( धोका ) घ्यावयाची नाही. म्हणून मी उभा रहात नाही.'

यानंतर थोड्याच दिवसांनी दादांची भेट झाली. ते एवढेच म्हणाले की, निवडणुकीचे निकाल लागले की, विधिमंडळ पक्षाची सभा होईल त्या वेळी कळेलच. वसंतदादानी असे ध्वनित केले की, पक्षातील बहुतांशी आमदारांचा पाठिंबा आपल्यालाच मिळेल.

निवडणुकीनंतर विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत सरळ सरळ मतदान घेण्यात आले नाही. आमदाराचा कौल कोणाकडे आहे हे पाहण्यासाठी निरीक्षक पाठविण्यात आले. त्यानी आमदाराचा कौल बॅ. अंतुले यांच्याकडे आहे असा निर्णय दिला. बॅ. अंतुले यानी निवडणुकीपूर्वी जे मला सांगितले ते जर खरे असेल तर निरीक्षक पाठवून कौल घेण्याचे एक नाटक करण्यात आले असेच म्हणावे लागेल. ते काहीही असो. साखरसम्राटाचे नेते वसंतदादा याच्यावर मात करून बॅ. अंतुले मुख्यमंत्री झाले, म्हणजेच या वेळीही साखरसम्राटांचा प्रभाव पडला नाही.

बॅ. अंतुले मुख्यमंत्रीपदी आरूढ झाल्यानंतर त्याना उखडण्यासाठी या साखरसम्राटांनी काहीच प्रयत्न केलेले दिसत नाहीत. उलट हे सम्राट अंतुले यांच्यापुढे हाजी हाजी करतानाच आढळले. बॅ. अंतुले यांच्या प्रतिभा–प्रतिष्ठानला देणग्या देण्यासाठी हे साखरसम्राट चेक घेऊन धावले. कारखान्याचे भागधारक ऊसकरी शेतकऱ्याना न विचारताच त्यांचे पैसे कापून घेऊन हे सम्राट चेक द्यायला मंत्रालय व वर्षा बंगल्यावर धावले. बरोबर फोटोग्राफर न्यायला ते विसरले नाहीत. यावरून या सम्राटाचे शौर्य ध्यानात येईलच.

बॅ. अंतुले यांच्या या कृत्याना आव्हान दिले ते मृणाल गोरे, प. ब. सामंत, भा. ज. प. आमदार राम नाईक आदी लोकांनी. विविध कोर्टात त्यांनी जे खटले दाखल केले व हायकोर्टाने त्यावर जे निर्णय दिले त्यातून बॅ. अंतुले यांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा आला. यात साखरसम्राटाचे काहीच कर्तृत्व नव्हते बॅ. अंतुले यानी खुर्ची सोडल्यानंतर या सर्व साखरसम्राटाना आठवण झाली की, भागधारक शेतकऱ्याच्या परवानगीशिवाय आपण देणग्या दिल्या आहेत त्या परत मागता येतील का याबाबत कायदेशीर सल्ले घेण्यास सुरुवात झाली आहे ज्या राज्य सहकारी साखर कारखाना संघाने प्रतिभाप्रतिष्ठानला देणग्या द्याव्या म्हणून पत्रक काढून आवाहन केले त्या संघाने, प्रत्येक कारखान्याने आपला निर्णय घ्यावा असे सागून हात झटकले आहेत. असे हे शूर साखरसम्राट !

बॅ. अंतुले याच्या जागी बॅ. बाबासाहेब भोसले आले तेही साखरसम्राटाशी कोणत्याही प्रकारे विचारविनिमय न करता. काँग्रेस विधिमंडळ पक्षाने एक ठराव करून नेता–निवडीचे ( नियुक्तीचे हा शब्द जास्त सयुक्तिक आहे ) सर्वाधिकार पंतप्रधान श्रीमती इंदिरा गाधी याना देण्यात आले. त्यांनी बाबासाहेबाची नियुक्ती केली. त्यानंतर विधिमंडळ काँग्रेस पक्षाची बैठक भरवून त्यात निवडणूक किंवा निवड करण्याचा साधा शिष्टाचारही न पाळता बाबासाहेबानी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. बॅ. अंतुले याच्या राज्यात आमदारांची चगळ होती, ती भोसल्याच्या राज्यात बद झाली. अर्थातच भोसले याच्याविरुद्ध मोर्चेबांधणी सुरू झाली. बाबासाहेबाचे बोलणे, भाषा आणि कृतिशून्यता याची त्यात भर पडली आणि वर्ष होताच बाबासाहेबांना खुर्ची सोडावी लागली. बाबासाहेबांनी आमदाराचे तनखे तोडले नसते तर बाबासाहेब अकार्यक्षम व कृतिशून्य ठरले नसते.

बाबासाहेबाच्याविरुद्ध उठाव करणारे नेते श्री. बाळासाहेब पवार हे राज्य सहकारी साखर कारखाना सघाचे उपाध्यक्ष हे खरे; पण सघाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब विखेपाटील हे बाबासाहेबाचे मोठे समर्थक. संघात सध्या तीन-चार तरी गट आहेत. असे असले तरी साखरधद्याच्या समस्याबाबत एकमत आहे आणि त्या सोडवून घेण्याच्या कामी सर्व गट एकत्र आहेत; परंतु राजकारणात मात्र हा त्यांचा एकोपा दिसत नाही. प्रत्येक गट राजकारणात आपल्या सोयीची भूमिका स्वीकारतो. अशा स्थितीत साखरसम्राट राज्याच्या राजकारणावर काय प्रभाव पाडणार ?

या सर्व विवेचनावरून एकच सिद्ध होते की, महाराष्ट्राचे राजकारण साखरसम्राटांच्या हाती आहे हा गैरसमज आहे राज्यपातळीवरील राजकारणात त्याचा प्रभाव नाही हे स्पष्ट झाले आहे. याचा अर्थ ती शक्तीच नाही असा नव्हे. ग्रामीण भागातील ती एक मोठी आर्थिक शक्ती आहे हे निर्विवाद. साखरकारखान्याच्या परिसरातही एक प्रचड शक्ती आहे त्या परिसरातील विविध निवडणुकावर साखरकारखान्याचे चेअरमन व संचालक याचा जबरदस्त पगडा असतो. याचा अर्थ या सम्राटाचे राज्य कारखान्याच्या परिसरापुरते मर्यादित आहे आणि त्या दृष्टीने हे सत्ताकेंद्र ठरते.

असे असताना महाराष्ट्राच्या राजकारणावर साखरसम्राटांचा प्रभाव आहे हा समज कसा काय पसरला? या कल्पनेची सुरुवात १९६० मध्ये झाली. सासवडच्या माळीनगर साखर कारखान्याच्या रौप्यमहोत्सवप्रसंगी बोलताना त्या वेळचे मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण म्हणाले की, 'साखरकारखाने ही सत्तेची केंद्रे बनू लागली आहेत.' त्या वेळी साखर कारखान्याची संख्या आजच्या मानाने खूपच कमी होती तरीही त्याच्या प्रभावाची जाणीव होऊ लागली होती. अर्थात श्री. चव्हाण यांच्या विधानावरून महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांचा प्रभाव आहे असे त्याना कुठेच ध्वनित करावयाचे होते असे वाटत नाही. त्याचे म्हणणे हा प्रभाव स्थानिक पातळीवरच होता असे होते. साखर कारखाने वाढले तरी परिस्थितीत तसा बदल झालेला नाही. प्रभाव साखर कारखान्याच्या परिसरापुरताच मर्यादित राहिला आहे; परंतु श्री. चव्हाण यांच्या विधानाचा खूपच गवगवा झाला. वृत्तपत्रांनी व राजकीय निरीक्षकानी ही कल्पना उचलून धरली आणि 'साखरसम्राटाचे राजकारण' हा वाक्प्रचार प्रसार पावला वृत्तपत्रानी साखरसम्राट हे महान शक्तिमान आहेत व राज्याचे राजकारण खेळतात असे चित्र निर्माण केले; परंतु हे चित्र फसवे आहे.' आपल्या संस्थानापुरतेच हे सम्राट आहेत.

□

# मराठी विनोद

साहित्य परिषद व्याख्यानमाला । पुष्प नववे : रविवार २५ ऑक्टोबर १९८२

## श्री. ज. जोशी

व्याख्यानमालेतलं नववं व्याख्यान रमेश मंत्र्यांच्या विनोदावर झालं. वक्ते होते श्री. श्री. ज. जोशी. मंत्र्यांच्या विनोदाचं वेगळेपण त्यांच्या वेगवेगळ्या अनुभवांत आहे 'जनू बांडे' सारखं व्यक्तिचित्र तयार करण्यात मंत्र्यांचं सामर्थ्य दिसतं असं सांगून श्री. ज. जोशी म्हणाले–

◻

आजच्या व्याख्यानासंबंधी जेव्हा मला गळ घालण्यात आली आणि सांगण्यात आलं की, मी एखाद्या विनोदी लेखकावर बोलावं, तेव्हा मी थोडा चकितच झालो. त्याच कारण असं की, हा काही माझा प्रांत नव्हे आणि असं समीक्षणात्मक बोलणं जरा जास्तच कठीण; परंतु दोन्ही बाजूच्या, वाचनालयाच्या व साहित्यपरिषदेच्या काही अडचणी असतील (वक्ताच मिळत नाही तेव्हा आणा कुणाला तरी पकडून, अशा स्वरूपाच्या) तेव्हा त्या लक्षात घेता मी बोलण्याचे मान्य केले मी हे बोलतोय, यात नम्रतेचा आव आणतोय असा भाग नाही. कारण माझ्या आधीचे जे आठ वक्ते बोलले, ते सर्व 'रजिस्टर्ड समीक्षक' होते, म्हणजे त्यांचा तो धंदा आहे. जसा पॅथॉलॉजिस्ट असतो, त्याचा तो धंदाच असतो की, रक्त तपासायचं व त्यात कोणते जंतू आहेत ते पाहायचं वगैरे. तसा समीक्षकाचा हा धंदाच आहे की पुढयात असलेल्या साहित्याची चीरफाड करायची, त्यात काय आहे, काय नाही हे लोकापुढे मांडायच. यातला एकच वक्ता समीक्षक नव्हता; पण प्राध्यापक मात्र होता. तो म्हणजे प्रा. वाघ; पण समीक्षक पण नाही आणि विद्वत्तेशीही फारसा संबंध नाही असा मधेच घुसडलेला मी एकटाच आहे. तेव्हा आपल्या दोघांवरही ही एक आपत्तीच आहे.

दुसरी आपत्ती म्हणजे आजचा विषय विनोदकार रमेश मंत्री हे स्वत: इथे उपस्थित आहेत. तेव्हा त्यांच्या उपस्थितीत टीका–मराठी अर्थाने नव्हे, तर संस्कृत पद्धतीने टीका करायची. आता ती त्यांना कितपत रुचते पाहू या.

आता आज बोलायचं मान्य केल्यावर मी त्यासंबंधीची म्हणजे महाराष्ट्राची विनोदाची एकंदर वाङ्मयीन परिस्थिती यावरील पुस्तके वाचण्याआधी प्रथम स्वत:च्या ज्ञानाची test घेण्याचे ठरविले. मराठी विनोद म्हटला की कोणकोणती नावे समोर येतात? आणि त्याप्रमाणे कागदावर टिपणे काढत गेलो. अगदी ज्ञानेश्वरांपासून ते अव्वल इंग्रजी वाङ्मयापर्यंत. मराठीत विनोद असा प्रामुख्याने नव्हताच. तसा रामदासानी, एकनाथांनी थोडा थोडा केला आहे; पण एकंदरीत विनोदाबद्दल 'टवाळा आवडे विनोद' अशी अप्रीतीच होती. इंग्रजांशी आपला जास्त संबंध आला तेव्हापासून विनोदाचा महाराष्ट्रात उगम झाला असं आपण ढोबळ मानाने म्हणू. आता मला फार थोडी माहिती आहे; पण तुम्हालाही तशीच माहिती आहे असे समजून मी ही विधाने करीत आहे. तर अशा पद्धतीने *आपण जर या काळाच्या पायऱ्या उतरत उतरत आलो तर आप*ल्याला पहिला विनोदकार, मराठीतील आद्य विनोदकार भेटतो. तो म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. त्याचं सुदाम्याचे पोहे मी वाचलं आहे. तसं माझं वाचन आणि स्मरणशक्ती चांगली आहे. जेव्हा मी हे पुस्तक वाचलं– असेन तेव्हा २० एक वर्षांचा असावा– तेव्हा मी खूप हसलो होतो हे माझ्या चागलं लक्षात आहे; पण आता त्यातील विनोद अगर कोटया मी आठवायला गेलो तर माझ्या काही लक्षात राहिलेले नाही. तो सर्व वाहून गेलेला विनोद आहे असं माझ्या लक्षात आलं. आता जवळजवळ शंभर–पाऊणशे वर्षांचा काळ लोटलेला आहे आणि वाईट वाटलं तरी हे मान्य करायला पाहिजे की, त्यांचे काही उत्तम लेख आहेत–चोराचे संमेलन आहे, पांडुतात्या, शिमगा, श्रावणी आहे; पण ते वाचून आता पूर्वीसारखे हसायला येत नाही. तेव्हा त्यांच्या नावावर फुली मारून मी पुढे जातो. त्याच्या खालच्या पायरीवर गडकरी भेटतात त्याचा बाळकराम, ठकीचे लग्न यांनी तेव्हा आम्हाला हसवलं. त्याचं मोठेपण आम्ही मान्य केलं पाहिजे. 'सकाळचा अभ्यास' हे त्याच्या निखळ विनोदाचे उदाहरण आहे; पण अशी उदाहरणे थोडी. त्यांच्यानंतर अगदी भरपूर हसविणारे विनोदकार चटकन आठवतात ते म्हणजे अत्रे. अत्र्याच्या विनोदाने आम्ही अगदी मनमुराद हसलो. मला वाटतं आमच्या बऱ्यापैकी तब्येतीचं रहस्यही तेच असावं; पण काळ मोठा क्रूर असतो. आज अत्र्याचं काय शिल्लक आहे? झेंडूची फुलंच फक्त आहेत. चि. वि. जोशाचा विनोद बऱ्याच प्रमाणात टिकला आहे. काल त्यांची पुस्तके चाळताना पुन्हा एकदा मला हा अनुभव आला. ५० वर्षांचा काळ लोटला तरी मला आजसुद्धा ते 'दत्तक वडील', 'रावबहादूर' याच्या आठवणीने हसू आवरेना. बाळ गाडगीळ आहेत, शामराव ओक आहेत–त्यांचा विनोद वेगळा म्हणून मला भावला आहे. त्यांचा 'माझा सिंहगडाचा प्रवास' वाचा. पु. ल. देशपांडे आहेत–पण आता परत त्या काळाची फूटपट्टी लावल्यानंतर आज आणि पुढे यातले किती आणि कसे टिकणार आहे पहा.

शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर ८२ ते मंगळवार दिनाक २६ ऑक्टोबर ८२ या कालावधीत महाराष्ट्र साहित्य परिषद व शासकीय ग्रंथालय, पुणे, याच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी विनोद' या विषयावर एक व्याख्यानमाला योजिली गेली.

अशा स्वरूपाची व्याख्यानमाला मराठीत प्रथमच होत असल्याने 'माणूस' मधून ती ११ डिसेंबर ८२ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध झाली. वाचकांनी या व्याख्यान-लेखांना उत्तम प्रतिसाद दिला व व्याख्यानाचे एक पुस्तक प्रसिद्ध करावे अशी सूचनाही अनेकांनी केली.

आजवर डॉ. भीमराव कुलकर्णी ( श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ), प्रा. स. शि. भावे ( राम गणेश गडकरी), डॉ. अंजली सोमण (चिं. वि. जोशी), प्रा. शरद वाघ (दत्तु बांदेकर), प्रा. द. मा. मिरासदार ( आचार्य अत्रे ), डॉ. स. गं. मालशे ( पु. ल. देशपांडे ), डॉ. गं. ना. जोगळेकर ( गंगाधर गाडगीळ ), आणि डॉ. म. वि. गोखले ( वि आ. बुवा ) हे आठ व्याख्यान-लेख प्रसिद्ध झाले. या अंकात श्री. ज. जोशी ( रमेश मंत्री ) व डॉ. विद्याधर पुंडलीक ( बाळ गाडगीळ ) ही शेवटची दोन व्याख्याने देऊन ही व्याख्यानमाला पूर्ण करीत आहोत. सर्व व्याख्यानांचे शब्दांकन सौ. शलाका सोमण यानी केले आहे.

सर्व व्याख्यात्यानीही सहकार्य केल्यामुळेच हा उपक्रम शेवटास जाऊ शकला.

सर्व व्याख्यात्यांचे, तसेच साहित्य परिषद व शासकीय ग्रथालय या संस्थाचालकांचे मन.पूर्वक आभार !

संपादक

## जेम्स बांड-जनू बांडे

तर या आता उल्लेखिलेल्या सगळ्याच्या विनोदाचे एकदर स्वरूप पाहिले तर याचा विनोद ब्राह्मणी विनोद आहे सदाशिवपेठी, थोडासा कारकुनी, मध्यमवर्गीय विनोद आहे. म्हणजे काय ? तर श्रावणी, शिमगा, बायकांच्या फॅशन्स, टिंगल, जुन्या चालीरीतीवर कोरडे हे याचे विषय आहेत आणि हे विषय आता कालबाह्य झाले आहेत. म्हणून ते विनोद आज पूर्वीसारखे परिणाम साधू शकत नाहीत; पण आता म्हणूनच मुद्दाम मी शामराव ओकांचा वेगळे म्हणून उल्लेख केला. त्याचा विनोद मुबईचा आहे. हा ब्राह्मणी विनोद नाही तर इंग्रजी विनोद आहे. सूक्ष्म आहे, निखळ हसायला लावणारा आहे.

कोल्हटकरांनी आपल्या विनोदाच्या सहाय्याने टीका केली—समाजावर, चालीरीतीवर अगदी गणपतीवरसुद्धा केली आणि मग पुस्तक प्रसिद्ध करताना त्यांना असे वाटले आता लोक फारच खवळणार. मग त्यानी केळकराकडे धाव घेतली त्यांना पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यास सांगितली. त्यात केळकरांनी असं एक वाक्य लिहिलं आहे की, टीका करण्याची तऱ्हा म्हणज विनाद तेव्हा ही जी विनोदाची परंपरा आहे त्यात कुठे तरी समाजप्रबोधन आहे. तेव्हा राजकारणावर कोण लिहिणार ? 'समाज' हा विषय बरा होता. हे समाजप्रबोधनाचं भूत बहुतेकांच्या मानगुटीवर बसलेलं होतच; पण ही प्रबोधनाची पद्धत थोडी अनैसर्गिक आहे, अस मला वाटतं. वास्तविक लेखक म्हणजे फार कोणी मोठे वगैरे नसतो. सामान्यच असतो. तो विचारवंत, प्रज्ञावत असतो अशी आपली उगीचच समजूत असते. ही प्रबोधनाची पद्धत बाजूला केली तर बाकीच्या विनोदकारामधील मंत्री हा एक महत्त्वाचा दुवा आहे.

कोणत्याही लेखकाचे आयुष्य, परिसर ध्यानात घ्यावे लागते. कारण त्याने त्या लेखकाची एकंदर चौकट लक्षात येते मंत्रीचा जन्म कोल्हापुरात सधन कुटुबात झाला. वडील फौजदार बहुतेक शिक्षणही तिथेच झाल बी ए. झाल्यानतर त्यानी पत्रकाराचा व्यवसाय सुरू केला. हा साधारण १९५० चा सुमार असावा. आता तेव्हा महाराष्ट्राची एकदर वाङ्मयीन परिस्थिती काय होती ? सदाशिवपेठी, वाङ्मयाचा अस्त होत होता. माडगूळकर, मिरासदार याचे लिखाण जोरात होते. कुऱ्हाड, पाटील, तमाशा, निरांजनं घेतलेल्या स्त्रिया हे सगळ वर्णन अगदी बहरत होत; पण या चलनी नाण्याचा उपयोग मंत्र्यानी आपल्या लिखाणात केला नाही ते लोकप्रिय आहे, ते न करता नवीन काही तरी आणण्याचा प्रयत्न त्यानी केला. आता याचे कारण काय ? तर ते इग्लडहून आल्यानंतर त्याना युसिस ( युनायटेड स्टेटस् इन्फर्मेशन सर्व्हिस ) मध्ये नोकरी मिळाली. कोल्हापूर सोडून मुबईकर, अमेरिकन सरकारचे नोकर झाले. त्याचं आयुष्य हे अस दोन टोकात विभागलेलं आहे एका बाजूला कोल्हापूर तर दुसरीकडे अमेरिका

युसिस, अमेरिका म्हणजे नवीन जग, नवीन विचार, चकचकीत जग ......

हिंदु माणसाच्या मनावर सतत हजार-पाचशे वर्षांचं संस्कृतीचं ओझं असतं, तस अमेरिकन माणसाच नाही. तो चालू क्षण जगतो, उपभोगतो अशा सरकारची नोकरी करता करता मंत्रीसुद्धा आपल्या जुन्या वाङमयीन प्रबोधनाच्या परंपरेतून मुक्त झाले जीवनाकडे नवीन दृष्टीतून पाहू लागले. हे नवे विचार त्यानी महाराष्ट्रात रुजविले.

जुनी परंपरा मोडून हे नवीन विचार आणण्याचा त्यांचा हा प्रयत्न खरोखरच आश्चर्यकारक आहे. कारण माझ्या माहितीप्रमाणे असा प्रयत्न कोणीही केलेला नाही.

प्रथम आपण जनू बांडे पाहू. जेम्स बाँडवरून त्यांना ही कल्पना सुचली. जेम्स बाँडला त्यांनी मराठी मन, मराठी कपडे दिले ही फार महत्त्वाची गोष्ट ठरली. मला हे जमलं नसतं. कारण आम्ही या पुणे-मुंबईच्या बाहेर कधी गेलोच नाही तर आम्हाला हे सुचणार कसं ? पण त्यांनी मात्र जनू बांडेला त्या सर्व देशात फिरवून आणलं आहे. त्याची, त्याच्या हेरगिरीची थट्टा केली आहे आणि लोकांना हे सगळं आवडलं आहे. एकदा तर मंत्र्यांचा मला अगदी हेवाच वाटला होता. झालं काय की, एका घरी मला जेवायला बोलावलं होतं. आम्ही सगळे बसलो होतो. मला वाटलं आता एकदा तरी त्या बाई म्हणतील काय छान आहे ' आनंदी गोपाळ ' वगैरे असं काही तरी ! पण छे. त्यांचं आपलं सारखं ते जनू बांडे. पुराणच चाललं होतं. त्या क्षणी मला मंत्र्यांचा अगदी हेवा वाटला. शेवटी यांचा जनू बांडे गुरु होतो. लोक त्याला म्हणतात संदेश द्या, सांगा काही तरी.तेव्हा हा जनू बांडे संदेश देतो– enjoy. यावरूनच तुम्हाला जनू बांडे या एकूण व्यक्तिरेखेची कल्पना यावी.

### फँटसीचा प्रभाव

' निवडक मंत्री 'मधील ५–६ लेख निव्वळ परदेशवर्णनावर आहेत. अगदी बारीक–सारीक तपशीलसुद्धा त्यांनी नेमके टिपले आहेत; तिथल्या वृत्तीसुद्धा त्यांनी नेमक्या दाखवल्या आहेत. ' जपानी वेश्या ' मध्ये जपानमधील स्त्री आपल्या ५०–५५ वर्षांच्या नवऱ्याला सांगते की, प्रतिष्ठेसाठी तरी तुम्ही एखादी वेश्या ठेवाच ! अमेरिकन बाहुली तर फारच सुंदर आहे. यांच्या मनात नेहमी काही चमत्कारिक फँटास्टिक कल्पना येतात. त्यांच्या लिखाणात यामुळेच ' फॅन्टसी ' हा गुण आढळतो. एखादी चमत्कारिक कल्पना करून तीच खरी आहे असं गृहीत धरून यांनी कितीतरी सुरेख कथा लिहिल्या आहेत.

' सचिवालयात हत्ती येतो, ' माझ्या घरात सिंह '– या कथा पहा. सचिवालयात हत्ती येतो– शिपाई तंबाखू चोळत स्टुलावर बसला आहे– त्याला बाई म्हणतात, ' अरे, तो हत्ती आत येऊन बसला आहे त्याला बाहेर काढ ना !' ' नाही बाई, ते आपलं काम नाही. दुसरं काही असेल तर सांगा!' ते कुलकर्णी येतात, ते म्हणतात हत्ती आलाय त्याची नोंद केली का ? ' आता ती कुठे करणार ? पत्र असेल तर बोला.' ही अशी सगळी सचिवालयाच्या कामावर मजेशीर टीका आहे.

' तुम्ही मांजर व्हा ' ही त्यांची मला सर्वांत आवडलेली कथा. एक साधा कारकून. त्याला एक जादूगार भेटतो. तो म्हणतो, मी तुम्हाला मांजर करू शकतो. आता याला मांजर का व्हावंसं वाटतं ते पहा– घरी एकटाच असतो, बायको माहेरी गेलेली, जेवायला जायचा कंटाळा येतो म्हणून विचार करतो, आता कपभर दूध पिऊन झोपावं; पण आतल्या खोलीत जाऊन बघतो तर एक बोका दूध फस्त करून शांतपणे मिशा स्वच्छ करत खिडकीतून जाताना दिसतो. यावरून त्या मांजराचा हेवा वाटतो की, आपण झोपमोड करून पहाटे दूध घ्यावं, दिवसभर तापवून सांभाळावं आणि याने खुशाल ते संपवावं. बरं आहे बुवा याचे ! अशा सर्व कल्पना केल्या आहेत. पुढे त्या बोक्याला मांजरी भेटते. त्यांचे प्रेमप्रसंग वगैरे– आणि पुढे तो पुन्हा माणूस होतो. मांजराचे आणखी आकर्षण म्हणजे आंघोळीचा त्रास नाही.

' सह्याद्रीची चोरी '– एक दिवस सह्याद्रीचीच चोरी होते– पोलिसात तक्रार नोंदवायला जातो तर हवालदार विचारतो– कोण सह्याद्री ? वर्णन सांगा– अशा एकेक प्रसंगांची गुंफण केली आहे की बास !

म्हणजे यांच्या विनोदात दोन महत्त्वाचे विचारप्रवाह आहेत– एक म्हणजे विनोदाला पार साता समुद्रापलीकडे नेलं, विविध देशात फिरवून आणलं, क्षेत्र विस्तृत केलं हे आणि दुसरं म्हणजे फॅन्टसी. त्यांची भाषा सहज आहे. ओघवती आहे. याचा फार सुंदर नमुना ' कोल्हापुरी चिवडा ' ही गोष्ट आहे. मुंबईच्या जीवनाचं फार सुंदर आणि नेमकं दर्शन त्यांनी घडवलं आहे. या विनोदकाराच्या अंगात लेखनाचे फार मोठे सामर्थ्य आहे, मोठ्या पगाराची नोकरी आहे. जीवन सुखी आहे, हे सर्व असूनही हे फक्त विनोदी लेखनच करतात. त्याचाच सतत विचार करतात, हे मंत्र्यांचं फार मोठं वैशिष्ट्य आहे.

श्रेष्ठ विनोद हा दुःखात खलला जातो, त्याला कारुण्याची झालर असते, असं बोललं जातं. मंत्री यांचा विनोद तसा नाही. तो तसा असावा हा आग्रहही कोणी धरू नये. कारण दुःख, कारुण्य हे मराठी जीवनाचे अविभाज्य भाग आहेत, अमेरिकन जीवनाचे नाहीत. म्हणून दुःख आणि कारुण्य नसूनही त्यांचा विनोद अगदी fresh आहे. त्यांचा संदेश आहे enjoy. तेव्हा हा त्यांच्या विनोदातील ताजेपणा असाच कायम रहावा अशी इच्छा मी व्यक्त करतो. ◻




# मराठी विनोद

साहित्य परिषद व्याख्यानमाला । पुष्प दहावे : सोमवार २६ ऑक्टोबर १९८२

## डॉ. विद्याधर पुंडलीक

**व्याख्यानमालेतलं अखेरचं, दहावं व्याख्यान बाळ गाडगीळ यांच्या विनोदावर होतं. डॉ. विद्याधर पुंडलीक वक्ते होते. पु. ल. देशपांडे यांच्या परंपरेतला गाडगीळांचा विनोद आहे; पण विडंबनाची त्यांची पद्धत मात्र स्वतंत्र आहे असं सांगून पुंडलीक पुढे म्हणाले—**

बाळ गाडगीळ माझे ३५–४० वर्षांपासूनचे मित्र. तेव्हा आजच्या माझ्या व्याख्यानात वैयक्तिक सूर येणे अटळ आहे, पण तो जास्त लांबणार नाही, याची मी काळजी घेईन. आम्ही दोघे इंग्रजी चौथीपासून एकमेकांबरोबर. तेव्हापासून माझ्या या मित्राला एक सवय आहे, जिथे जिथे माझी जिरवता येईल तिथे तिथे जिरवायची. प्रथमपासूनच हा हुशार विद्यार्थ्यांपैकी. कोणत्याही प्रश्नाला हात वर अनेकदा मला त्याचा वर असलेला हात खाली ओढण्याचा मोह झाला आहे. मॅट्रिकला असताना मी त्याला चिडवायचो, तुला सातही विषयात डिस्टिंक्शन मिळणार! मला विश्वास होता की त्याला सगळ्या विषयात काही डिस्टिंक्शन मिळणार नाही; पण त्याने ती मिळवली व तिथेही माझी जिरवली! इंग्रजी तिसरी किंवा चौथीत असताना त्याने 'चिवडेवाला' असे एक शब्दचित्र लिहिले होते, आणि मास्तरांना ते फारसे आवडले नव्हते. त्याचा फायदा घेऊन मी त्याला 'मराठीतील पहिला तेलकट शब्दचित्रकार' अशी थट्टा करीत असे. आज तो मराठी वाङ्मयातील अशा पदावर पोचला आहे की, मला माझे शब्द परत घ्यावे लागत आहेत. अर्थात हा पराभव मान्य करण्याइतका खिलाडूपणा माझ्याकडे आहे. मागे केसरीत त्याच्यावर लेख लिहिताना मी लिहिले होते की, मला त्याला एक पुस्तक अर्पण करायचे आहे; पण त्याच्याइतकी माझ्या पुस्तकांची संख्या नसल्याने तो विचार तसाच राहिला आहे. मनातल्या मनात मात्र तो तयार आहे. साहित्याचा एक संस्कार ऋजुता, न्यायी बुद्धी आणि सदसद्विवेकबुद्धी याची जाणीव या मित्राने मला अखंड दिली. तेव्हा त्या तिन्हींचा संगम आजच्या या व्याख्यानात करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

बाळ गाडगीळाचे विनोद ऐकताना ते काही वेगळ्या पठडीतले आहेत, हे सतत जाणवत राहते. मी जेव्हा पीएच. डी. च्या अभ्यासाला सुरुवात केली आणि हे त्याला सांगितले, तेव्हा त्याने पीएच. डी. ची एक व्याख्या मला सांगितली, to say nothing at greater length. 'काहीही म्हणायचं नाही हे जवळजवळ ५०० पाने सांगत जायचं' एकदा तो आणि मी माझ्या विकीवरून चाललो होतो. मध्ये एक पादचारी आला. चुकी त्याची होती; पण माझी विक्की जरा लटपटली. तो म्हणाला, 'सावकाश रे बाबा. मागे एक प्रचंड विनोदी लेखक बसला आहे.' मी म्हटलं. 'माझी चुकी नव्हती तोच मध्ये आला.' यावर तो संथपणे म्हणाला—'या सर्व गोष्टी तुझ्या आणि माझ्या पोस्टमार्टेममध्ये येतील.' त्याच्या सहवासात असताना आंब्याच्या अढीजवळ गेल्यानंतर जो एक सूक्ष्म असा वास येतो, तशा प्रकारचे त्याचे व्यक्तिमत्त्व असल्याचे जाणवते आणि विनोदाचा स्वादही त्याच प्रकारचा आहे. मला वाटतं, इतकं वैयक्तिक पुरे. आता विषयाकडे वळतो.

### स्वतंत्र मार्ग

मराठी समीक्षेत दोन भयानक पण फार उपयुक्त असे शब्द आहेत- 'विशिष्ट' आणि 'तथापि'. सगळं बोलायचं आणि नंतर चतुरपणे 'तथापि' हा शब्द घालायचा. मराठी विनोदाच्या परंपरेतही हे दोन शब्द वापरले गेले आहेत. आपण त्याचा भयानकपणा आणि त्याचबरोबर उपयुक्तताही लक्षात घेतली पाहिजे. मराठी विनोदाची एक विशिष्ट परंपरा आहे, असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा आमच्या दोघांचे गुरू डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांची मला आठवण होते. त्यांच्या ठरलेल्या मिस्किल वाक्याप्रमाणे मराठी विनोदाला वैभवशाली परंपरा आहे, असे म्हणण्याची चाल आहे, असे म्हणता येणार नाही; पण लोकजीवन आणि विनोद यांचा दुवा पु. ल. देशपांडे यांच्यापर्यंत साधला गेला आहे. कोल्हटकर, गडकरी, जोशी, अत्रे हे सर्वजण महाराष्ट्राच्या लोकजीवनाशी इतके निगडित होते की, त्यांचं आणि लोकांचं एक प्रकारचं जिव्हाळ्याचं नातं निर्माण झालं होतं. त्यांच्याबद्दल बोलताना आपण नकळत एकेरी बोलतो. काय अत्रे माणूस होता असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्यांच्याबद्दल आपल्या मनात आदर नसतो असे नाही. वाचक आणि लेखक यांच्यात इतकं जिव्हाळ्याचं नातं निर्माण करणारा विनोद हा सर्वात जवळचा साहित्यप्रकार आहे. विनोदानं पटकन माणसाच्या जवळ जाता येतं. पुलंच्या कॅसेटची प्रसिद्धी करताना महाराष्ट्राचे 'लाडके दैवत' म्हटलं आहे, ते अगदी सार्थ आहे. अत्र्यांचे विनोद ऐकताना नेहमी असं वाटतं हा लोकांचाच प्रतिध्वनी आपण ऐकतो आहोत. अगदी आमच्या मनातलंच तुम्ही बोललात. हेच आम्हाला म्हणायचं होतं. लोकजीवन आणि अत्रे यांचा अतूट असा एक सांधा होता. पु. लं. च्या बाबतीतसुद्धा आपल्याला हेच म्हणता येईल. अशा प्रकारचा दुवा पु. लं. नंतरच्या पिढीत निर्माण झाला नाही.

विनोदाचा सामाजिक हत्यार म्हणून उपयोग करणेसुद्धा आज दिसत नाही. कोल्हटकरापासून सर्वांनी त्याचा कसा उपयोग केला हे आतापर्यंतच्या वक्त्यांनी सांगितलं. असं असलं तरी काही बाबतीत

पु. ल. नंतरचा विनोद समृद्ध झाला आहे. एका टीकाकाराने फार चांगलं सांगितलं आहे. inreverence is based on the deep understanding of reverence. श्रद्धेची जाणीव असणं आणि त्यावर आधारलेली अश्रद्धा असणं ही आजच्या काळाची गरज आहे. आजचे आमचे मित्र त्या प्रकारातील नाहीत; पण आनंदाची गोष्ट म्हणजे या मराठी विनोदावरील व्याख्यानमालेत तीन तरी लेखक पु. ल. देशपांड्यानंतरचे घेतले गेले आहेत. या व्याख्यानमालेने पु. ल. नंतरच्या मराठी विनोदकाराची उपेक्षा होते, हा आरोप चुकीचा आहे असे सिद्ध केले आहे. मला तर असं वाटतं की, पु. ल. नंतरचा विनोद काही काही बाबतीत अधिक संपन्न झाला आहे. गाडगीळांनी विनोदाच्या क्षेत्रातील विडंबनाची वाट पत्करली. दोन-तीन ठिकाणी मुलाखतीत त्यांनी सांगितलेही आहे की, यामागील प्रेरणा पु. ल. ची आहे; परंतु हे मान्य करूनसुद्धा एक गोष्ट नि:संकोचपणे मान्य करायला हरकत नाही की, या वाटेवरची झाडे ही गाडगीळांनी स्वतंत्रपणे लावलेली झाडे आहेत. ही वाट त्यांनी विस्तारली आहे, अधिक समृद्ध केली आहे.

मला चार बाबतीत पु. ल. देशपांडे यांच्यानंतरच्या विनोदाचा विचार करावासा वाटतो. कथेबाबत मिरासदारांसारखे लेखक आहेत की, ज्यांनी स्पष्ट सांगायचं तर चि. वि. जोशीपेक्षासुद्धा चांगल्या विनोदी कथा लिहिल्या आहेत. विडंबनाचा प्रकार गाडगीळांनी संपन्न केला आहे. रमेश मंत्र्यांचं नाव फॅन्टसीच्या संदर्भात काही मर्यादेपर्यंत घ्यावे लागेल आणि ज्याला आपण एका वेगळ्या प्रकारची पुनर्निर्मिती; विशेषत: पाश्चात्य वाङ्मयाच्या अभ्यासाने जी अर्थपूर्ण पुनर्निर्मितीची-क्षेत्रे निर्माण झाली आहेत. उदा. रमेश मंत्र्यांचे जनू बांडे आणि बाळ गाडगीळांचा चिमणरावाचा अवतार यांची नावे घेता येतील. या संदर्भात मी गाडगीळांच्या चार पुस्तकांचा विचार करणार आहे– 'लोटांगण', 'अखेर पडदा पडला', 'सिगारेट आणि वसंतऋतु' आणि 'चिमणरावाचा नवा अवतार.' गाडगीळांनी खूप लिहिलं आहे. जवळजवळ ४० पुस्तके लिहिली आहेत; पण त्यातली निवडक पुस्तकंच मी आज निवडली आहेत.

## विडंबन–तंत्र आणि मंत्र

विडंबनाच्याबाबतीत गाडगीळांनी विशेष महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. नवी चाकोरी निर्माण केली असं जरी म्हणता आलं नाही तरी हा प्रवाह त्यांनी विस्तारला. याबाबतीत दोघांचे संस्कार त्यांच्यावर झालेले दिसतात. एक मघाशी सांगितल्याप्रमाणे पु ग सहस्रबुद्धे आणि दुसरे पु ल. देशपांडे. नाटक, व्यक्तिरेखा आणि प्रथा या तिन्ही बाबतीत गाडगीळांनी अतिशय कुशलपणे हे विडंबनाचे हत्यार चालविले आहे. साहित्यजीवनात किंवा समाजजीवनात जी फॅशन बोकाळलेली असते, त्याबद्दल गाडगीळ लिहितात–या फॅशन्सचे आयुष्य मुळातच अल्प असते. त्या फार कालसापेक्ष असतात आणि त्या संपल्या की, त्यावर आधारलेल्या विडंबनचे स्वरूप संकोचत जाते. ते स्वत: फार चांगले टीकाकार आहेत. त्यांचे अत्यंत सूक्ष्म असे निरीक्षण आहे. तेव्हा ज्याला आपण क्रिटिकल जजमेंट म्हणू, अशा जजमेंटमधूनसुद्धा त्यांच्या विडंबनाचा उगम झाला आहे आणि तो जास्त टिकाऊ स्वरूपाचा आहे. त्यांच्या विडंबनात एक प्रकारचे साहस आहे. एकीकडून मानले तर सामर्थ्य आणि एकीकडून मर्यादा असे हे स्वरूप आहे. गडकऱ्यांच्या 'एकच प्याला'वर लिहायला साहस लागतं 'अखेर पडदा पडला'मध्ये त्यांनी 'सौभद्र'वर लिहिलं आहे आपल्या सर्वांचे लाडके नाटककार वसंत कानेटकरांवरही त्यांनी लिहिलं आहे पु लं. च्या व्यक्तिमत्त्वामध्ये श्रद्धा आणि अश्रद्धा यांचा इतका बेमालूम मिलाफ झालेला नाही. गाडगीळांच्याबाबतीत असा घोटाळा नाही गाडगीळ हे चांगले शोधक (inventive) टीकाकार आहेत. ज्याला स्वतंत्र म्हणता येईल अशी नवनिर्मितीही त्यांनी विडंबनाच्याबाबतीत केली आहे, हे मला जास्त महत्त्वाचं वाटतं. 'ग्रामीण स्टोरी' ही त्यांची कथा किंवा लेख ५३–५४ च्या सुमाराचा असावा ग्रामीण कथा ऐन भरात असताना त्यांनी हा लेख लिहिलेला आहे आणि तिथूनच ग्रामीण कथाच्या विडंबनाला सुरुवात झाली असं म्हटलं तर वावगं ठरू नये. लेखक एखाद्या प्रकाराची टिंगल केव्हा सुरुवात करतो हे सुद्धा महत्त्वाचं आहे. 'ग्रामीण लघुकथा–तंत्र आणि मंत्र' या ग्रंथाच्या लेखकाने स्पष्ट म्हटलेच आहे– कथा प्रत्ययकारी होण्यासाठी शिव्या सर्रासपणे वापरणे आवश्यक आहे ग्रामीण कथेत शिव्या न वापरणे हे सभ्यतेला सोडून आहे. साधारणपणे दर पॅरेग्राफमध्ये एक आणि दर संवादामध्ये दोन तरी शिव्या असल्याच पाहिजेत! शिव्या सहज दिल्या जाव्यात, कृत्रिमतेचा त्यात वासही असू नये.' गाडगीळ ग्रामीण कथांचा चौफेर बाजूंनी विचार करतात. सुरुवातीच्या त्यांच्या लिखाणात एका मुद्द्याचा विस्ताराने विचार केलेला आढळतो पुढे यात बदल झालेला दिसतो. ग्रामीण कथेचं वैगुण्य त्यांनी नेमकं पकडलं आणि त्यातून ग्रामीण कथेवरची एक खुमखुशीत अशी समीक्षा निर्माण झाली. हे श्रेय आपण त्यांना दिलं पाहिजे.

याहीपेक्षा चांगला विनोद 'अखेर पडदा पडला' या त्यांच्या पुस्तकात आहे. या पुस्तकात 'अखेर' या शीर्षकापासूनच मजा आहे. यात पुढे ते म्हणतात–'संघर्ष हा नाटकाचा आत्मा आहे. मराठी नाटकात मात्र तो वेगळ्या प्रकारे प्रकट होतो. नाटककार आणि प्रेक्षक यांच्यातला संघर्ष हा मराठी नाटकाचा आत्मा आहे.' यात इतक्या तळटीपा आहेत की, काही ठिकाणी त्यांची संख्या ६० पर्यंत गेली आहे. आता वाचकांच्या दृष्टीतून पाहिले तर ते किती अडचणीचे आहे; पण काही ठिकाणी नुसत्या तळटीपाच वाचत जाण्याचा मोह होतो. मला हा लेखनाचा फॉर्म म्हणजे फार मोठी बहादुरीच वाटते. नुसत्या तळटीपांच्या मजकुरातसुद्धा त्यांनी सलगता, सातत्य (continuty) राखली आहे.

## प्रा. विद्यानंद शेंगदाणे

दोन–तीन प्रकारचे प्रवाह 'अखेर पडदा पडला'मध्ये आढळतात. 'वाहतो ही दूर्वांची जुडी', 'दिवा जळू दे सारी रात' आणि 'वेगळं व्हायचय मला' हा एक नाटकांचा गट त्यांनी घेतला आहे. त्याला नावं कशी दिली आहेत पहा. 'वाहतो जुडीला'–'प्रेक्षक रडलेच पाहिजेत.' 'दिवा जळू दे'ला–'कुठे आहे प्रेक्षकांचा रुमाल' आणि 'वेगळं व्हायचं'ला–'तू टाक चिरून ही मान.' ही तीन पर्यायी शीर्षकं त्यांनी दिली आहेत. 'दिवा जळू दे'ची टिंगल करताना ते म्हणतात–'या नाटकाचे दोनशे प्रयोग होऊनही दिवा

जळतोच आहे. त्याच्या वातीतील तेल (तेज) थेंबभरही कमी झाले नाही. आम्हाला वाटतं नाटककारानं इथं थोडासा अन्याय केला आहे किंवा इथे मुद्राराक्षस घुसला असण्याची शक्यता आहे. म्हणजे वातीतील तेज या ऐवजी वातीतील तेल असायला हवं होतं अशी आमची आपली नम्र समजूत. कारण हे दिव्याच्या प्रकाशात चालणारं नाटक जास्तीत जास्त एक कँडलपॉवरचं. तेव्हा त्यातील तेज कमी ते किती होणार? दिवा सतत जळत राहिल्याने कमी होणार ते तेल, तेज नव्हे. शिवाय नाटककार हा कवी नसल्याने तेजाचा थेंब असे म्हणणे त्याला सुचू नये हे तसे योग्यच. तेव्हा दोनशे रात्री जळूनही त्याच्या वातीतील तेल थेंबभरही कमी होऊ नये असेच त्याला म्हणायचे असावे. दुसरे नाटककार बाळ कोल्हटकर. यांच्याबद्दल त्यांनी आणखीही काही लेखात लिहिले आहे. एकदा तर त्यांनी पाश्चात्य नाटककाराच्या धर्तीवर त्यांचा 'वाको' असा उल्लेख केला आहे. या नाटकात सुभाष नावाचा एक कवी आहे. कोल्हटकर नाटकभर कवितेचे कसे थैमान घालतात हे काही नवीन नाही. या सुभाषबद्दल बोलताना गाडगीळ मिस्किलपणे म्हणतात, 'हा कवी असल्यामुळे गुन्हेगार झाला आहे की, गुन्हेगाराची प्रवृत्ती असल्यामुळे कवी झाला, हे सबंध नाटकभर आपल्याला कळत नाही किंवा त्याच्यात या दोन्ही प्रवृत्ती असाव्यात.' दुसरं त्यांनी असं म्हटलं आहे, 'यातली जी ताई आहे, ती म्हणजे कारुण्याची पुष्करणी आहे.' हे बरोबर नाही वाटत. कारण पुष्करणीत फारच कमी पाणी असते. या सबंध नाटकात जो रडारड आहे, त्याचे वर्णन करण्यासाठी गाडगीळांनी ओक्साबोक्शी रडणे, धाय मोकलून रडणे, अश्रू ढाळणे वगैरे शब्द वापरले आहेत. हे लक्षात घेता पुष्करणी हे नाव काही योग्य वाटत नाही, अवास्तव वाटते.

दुसरा गट कानेटकरांच्या नाटकांचा आहे. या टीकेत मराशी मी म्हटलेला साहसाचा मुद्दा येतो. त्यांच्या दोन नाटकांवर गाडगीळांनी टीका केली आहे. एक म्हणजे 'रायगडला जेव्हा जाग येते' याचे उपशीर्षक दिले आहे. 'कानेटकरांच्या माजघरात आबासाहेब' घरातसुद्धा नाही, माजघरात म्हटले आहे हे लक्षात घ्या! गाडगीळांनी ही टीका फार मार्मिक केली आहे. यात त्यांना तेंडुलकर अभिप्रेत असावेत—ते काय करतात, इतिहासातील सामुग्री तर घ्यायची; पण इतिहासातील ऋण मान्य करत नाहीत. दुसरे नाटक त्यांनी घेतले आहे 'अश्रूंची झाली फुले' यात त्यांनी विनोदाचे हत्यार जरा वेगळ्या पद्धतीने वापरले आहे. दोन विनोदी जाण असलेले लेखक कसे वेगळ्या पद्धतीने विडंबन करतात हे पाहण्यासारखे आहे. अत्र्यांनी 'अश्रूंची झाली फुले' चे विडंबन करताना म्हटलं होतं, नेमके शब्द आठवत नाहीत; पण ते म्हणतात, आमच्या कानेटकरांना प्रोफेसर कळलाच नाही. एखादा प्रोफेसर रागावला तर जास्तीत जास्त क्लासेस काढतो. याच्यापलीकडे तो जात नाही. दादा कोंडके त्यांच्या प्रसिद्ध वगात 'विच्छा माझी पुरी करा' मध्ये म्हणतात. त्या नाचणारीच्या पुढे आपली ओंजळ करून म्हणतात, 'आता तुझं रडणं सुरू होईल, ती फुले हुंगण्यासाठी मी ओंजळ केली,' गाडगीळ म्हणतात, हे 'वास्तववादी' आणि 'विस्तववादी' ही नाटक आहे. गाडगीळ या प्राध्यापकांना प्रा. विद्यानंद शेंगदाणे म्हणतात; कारण ते नाटकभर शेंगदाणे खातात. हा खरा गणिताचा प्राध्यापक; पण नाटकात तो शाकुंतलाबद्दल बोलत असतो. हे प्राचार्य आपला विषय शिकवत नाहीत म्हणून ते विद्यार्थ्यांचे आवडते असावेत; असे ते म्हणतात. वास्तववादी कानेटकर यांच्यावर ते खुमखुशीत टिंगल करतात, ती बहुतेक नाटककारांना लागू होईल. साहित्य ही इतकी क्रूर कला आहे की, तुम्ही जे पाहता ते तुम्ही शब्दात उतरवताच असे नाही. पाहण्यापलीकडे आणखी काही तरी लागतं. प्रा. विद्यानंद हे नंतर सोनेरी टोळीचे नायक होतात आणि कानेटकर म्हणतात हे वास्तवावर आधारित आहे. गाडगीळ यावर म्हणतात—आता तरी इतर प्राचार्य यावरून धडा शिकतील काय? आपण गाडगीळांचे प्रथम आभार मानू की, ते अजून प्राचार्यच आहेत!

'सखाराम बाईंडर' बद्दल गाडगीळ जरा वेगळी थट्टा करतात त्यांनी सखाराम बाईंडरची सगळी नीतिमूल्यचं उलटी केली आहेत ही करायला एक हिकमत लागते, चतुराई लागते. त्यांनी तेंडुलकर मध्यमवर्गीयांच्या 'लग्न' या कल्पनेला जो सुरुंग लावतात त्यावरच टीका केली आहे. ते म्हणतात, 'सखारामपंत खरं तर हळूहळू 'नवरा' बनत चालले आहेत.' लग्नाची एक व्याख्या 'बायकोने नवऱ्याला वळण लावणं' ही सुद्धा होऊ शकते. इथे तर लक्ष्मीबाई आपल्या या मानलेल्या नवऱ्याला इतकं वळण लावतात की जर ते खरा नवरा असते तर—असा प्रश्न पडतो. दारूचे प्रमाण कमी, संकष्टी, चातुर्मासला वर्ज्यच, गांजा महिन्यातून एकदाच. सखारामपंत पूजा करू लागले, ती सुद्धा आंघोळ करून. आपल्या सुधारलेपणाची कबुली सखारामपंत स्वतःच देतात.

सौभद्र, मानापमान, पुण्यप्रभाव या नाटकांवरसुद्धा त्यांनी अत्यंत मार्मिक टीका केली आहे. 'एकच प्याला' ला ते म्हणतात, 'प्याला म्हणजे पेला नव्हेच' ते म्हणतात, प्याला हे क्रियापद आहे. दारू प्यायलेला २ ते ३ पाने स्वगत म्हणू शकेल का? सुधाकर प्याला नाही या पद्धतीने त्यांनी या सबंध नाटकाची टिंगल केली आहे.

## नेमकं पण समग्र नाही

इतर विडंबनांमध्ये गाडगीळांनी काही व्यक्तींची विडंबने केली आहेत. त्यामधील सर्वांत यशस्वी विडंबन गो. नी. दांडेकरांचे आहे. दांडेकर मराठीतील एक चांगले लेखक आहेत आणि काही विशिष्ट गोष्टींबद्दल त्यांची ख्याती आहे. त्यातील एक म्हणजे परिक्रमा, प्रवास, भाषा. त्यांची एकूण परिक्रमा लक्षात घ्यायची किंवा त्यांची मोजदाद करायची म्हटली तर त्यांचे आयुष्य दीडशे वर्षांचं होईल. बाकीच्या विडंबनांबद्दल मात्र इतकं प्रशंसेने बोलता येणार नाही. गाडगीळांनी G. P. म्हणून श्री. पु. भागवतांवर लिहिले आहे. मी सत्यकथेचा लेखक म्हणून मला ते आवडलं नाही असं मात्र कृपा करून समजू नका. त्यातला प्रसिद्ध विनोद-भागवत नेहमी विद्यार्थी भाषा वापरतात. 'गोष्ट, कथा चढावी' असं ते लिहितात. गाडगीळ म्हणतात, 'चढावी' म्हणजे कोणत्या संदर्भात? मद्याच्या तर नव्हे? दुसरं म्हणजे 'कथा चांगली वाटावी' यावर गाडगीळ आपल्या बायकोला जेवताना म्हणतात, 'चटणी चांगली वाटावी.' वाटावी म्हणजे झाली आहे; पण भागवत कथा चांगली आहे असं निश्चित अर्थाचं विधान करत नाहीत. माझी तक्रार अशी आहे की, गाडगीळ हे जे एकेका शब्दात, वाक्यात सांगतात ते फुलत नाही. ते जे एकेक

सूत्र पकडतात, ते व्यक्ती समजण्याच्या दृष्टीने जेवढं समर्थ असायला असावं तेवढं असत नाही आणि मग त्याला मर्यादा पडतात. त्यामुळे त्यांची बरीचशी व्यक्तिचित्रे एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच परिणामकारक ठरली आहेत.

हरिभाऊ मोटघांनी 'विश्रब्ध शारदा' लिहिली. गाडगीळांनी 'प्रक्षुब्ध शारदा' लिहिली. सत्यकथेकडे कथा गेली की, भागवतांकडून त्याचा 'पॅथॉलॉजिकल रिपोर्ट' येतो असं म्हणण्याची आमच्या सत्यकथेत लिहिणाऱ्या मित्राची पद्धत. गाडगीळांनी हे कुठून तरी ऐकलं आणि त्याला अशी गंमतीशीर कलाटणी दिली. गाडगीळांनी प्रत्यक्ष पॅथॉलॉजिकल रिपोर्ट संपादकाकडे पाठविला आहे आणि ती कथा आहे असं समजून संपादक लिहीत आहेत अशी कल्पना आहे.

काही वर्षांपूर्वी गाडगीळांनी 'चिमणरावाचा नवा अवतार' हे पुस्तक लिहिलं आहे. त्याला माझी प्रस्तावना आहे. त्यात मी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. हे अतिशय सूचक आहे. गडकऱ्यांचा बाळकराम, कोल्हटकरांचा पांडतात्या हे आज पुन्हा आणता येतील का? चिमणरावाची पुनर्निर्मिती झाली यात गाडगीळांची आणि चि. वि. जोशांची विव्हलाइन कुठे तरी जुळली हे नक्की. मला या पुस्तकाचा एक विशेष असा वाटतो की, गाडगीळांचे व्यक्तित्त्व 'सोफेस्टिकेटेड' आहे. ते प्राचार्य आहेत, प्राध्यापक आहेत. प्राध्यापक असूनही विद्वान आहेत आणि चिमण हा अगदी भोळा आहे. आपल्याला हे मान्य करायला पाहिजे की, आपल्या व्यक्तित्वाची चौकट गाडगीळांनी कुठे तरी ओलांडली आहे. त्याना सगळंच जमलं आहे असं नाही; पण काही प्रमाणात हा प्रयत्न 'मला उमजलेले बालगंधर्व' असा वैशिष्टयपूर्ण कार्यक्रम कुमार गंधर्व करतात तसा आहे. कुमारांचे उच्चार त्यांची मातृभाषा मराठी नसल्याने शुद्ध नाहीत; पण कुमार गंधर्वांना असे सांगायचे आहे की, बालगंधर्वांची गायकी तुम्हाला वाटते तेवढी बायकी नाही फार बंदिस्त आणि भक्कम अशी त्यांची गायकी आहे. त्याचप्रमाणे गाडगीळांनाही सांगायचे आहे, तुम्हाला वाटतो तेवढा चिमण भोळा नाही. यासाठी त्यांनी ११ कथांचा संग्रह लिहिला. दुसरा भाग मी नीट वाचला नाही; पण पहिल्या संग्रहातल्या ११ पैकी दोन कथा 'कथा' म्हणून उत्तम आहेत. या कथा समजून घेण्यापूर्वी आपल्याला 'चिमण' ही व्यक्तिरेखाच नीट समजून घेतली पाहिजे. त्याच्या व्यक्तित्वाशी जुळणाऱ्या तारा गाडगीळांनी या कथात आणल्या आहेत. त्यांनी काऊला अधिक बोलकं केलं आहे, चिमणला आणखी धूर्त केलं आहे. त्यात एक आचार्य रजनीशावर टीका करणारा लेख आहे. चिमणच्या व्यक्तित्वातला ऐसपैसपणा गाडगीळांमध्ये नसूनसुद्धा चिमणबद्दल लिहिताना त्यांची लेखणी मनमोकळी आणि लवचिक झाली आहे.

शेवटचा मुद्दा— गाडगीळांनी प्रवासवर्णनंसुद्धा फार छान लिहिली आहेत. अमेरिकन जीवनाचं फार छान वर्णन गाडगीळांनी केलं आहे. ज्याप्रमाणे काही लेखक— उदा. जॉन मिकेश— भारतीय संस्कृतीचं उत्तम चित्रण करतो. गाडगीळ त्यातल्या काही छटा फार सुंदर तऱ्हेने मांडतात; पण समग्र दर्शन मात्र घडत नाही असा एक आक्षेप मला घ्यावासा वाटतो.

गाडगीळांचा स्वत:चा असा आग्रह आहे की, त्यांच्या कथांचे कसोशीने वाचन व्हावे. मी ते तसे केले आहे. वेळेअभावी सर्व कथांबद्दल सविस्तर विवेचन करता येणे शक्य नाही; पण असे म्हणावेसे वाटते की, त्यांच्या सुरवातीच्या कथा जेवढ्या सरस उतरल्या आहेत तशा नंतरच्या वाटत नाहीत. याचे एक कारण असे असावे की, गाडगीळ कुठे मोकळे होत नाहीत, सैल होत नाहीत, लवचिक होत नाहीत दुसरं कारण असं की, गंभीर कथा लिहिण्याची एके काळी जी शिस्त त्यांनी लावून घेतली होती ती नंतर सोडून दिली. ती आवश्यक होती असं मला वाटतं. आणखी थोडसं असमाधान मला व्यक्त करायचं आहे. माझा तो हक्क आहे असं मला वाटतं— नवरा आणि बायको या संबंधावर त्यांनी नको एवढं लिहिलं आहे, ते टाळता आलं असतं असं मला वाटतं. आज ते मला म्हणाले की, तुम्हाला तसं लिहिता येत नाही म्हणून तुम्ही हे म्हणता; पण एकंदरीतच पु. ल. नंतरच्या लेखकांनी, मत्री, बुवा वगैरेंनी या संबंधावर एवढं लिहिलं आहे की, मृणाल गोरेने जर तीन-चार वर्षांपूर्वी काढला होता तसा लाटण्यांचा मोर्चा काढला, तर या लेखकांना त्याचं स्वागत करावं लागेल!

एकूण गाडगीळांचा विचार करता त्यांचं अतिशय महत्त्वाचं, वैशिष्टयपूर्ण Contribution विडंबन या प्रकाराचं आहे. त्यानंतर प्रवासवर्णनाला आहे. कथांना त्या मानाने कमी आहे. एकंदर समग्र संदर्भात पु. लं. नंतरची जी एक विनोदपरंपरा निर्माण झाली त्यात महत्त्वाचे स्थान बाळ गाडगीळ यांचे आहे. या माझ्या मताशी आपण सहमत व्हाल अशी मला खात्री आहे.

**समाप्त**



# इतिहासाचा झरोका

## ऑटोबायोग्राफी ऑफ बेन्व्हेनूतो सेलिनी

' ऑटोबायोग्राफी ऑफ बेन्व्हेनूतो सेलिनी ' या मूळ इटालियन आत्मवृत्ताच्या मराठी परिचयाचा पूर्वार्ध मागील अंकात दिला. या अंकात उत्तरार्ध. इटालियन कलापरंपरेशी नातं सांगणारा सेलिनी अतिशय साहसपूर्ण आयुष्य जगला. त्याच्या निवेदनात एक मस्त मोकळेपणा आहे. सुख-दुःखांच्या ऊन-पावसात आयुष्याचा माळ एकाकी तुडवत जाणाऱ्या सेलिनीच्या लेखणीबद्दल म्हणूनच की काय वाचकाला आपलेपण वाटत रहातं.

**मूळ इटालियन भाषेतील आत्मवृत्ताचे इंग्रजी भाषांतर : जॉर्ज बुल**

**मराठी परिचय : अशोक प्रभाकर डांगे**

पॅरिसच्या फ्रान्सिस राजाच्या राज्यात सेलिनीचा कलावृक्ष बहरतो. आपल्या सुटकेबद्दलची कृतज्ञता म्हणून चांदीवर कलाकुसर केलेला एक बाउल प्रथम तो राजाला नजर करतो. नंतर राजासाठी त्याच्याच आदेशावरून तो टेबलाभोवती मेणबत्त्या ठेवण्यासाठी राजाच्या उचीचे चादीचे देव-देवताचे बारा पुतळे घडवतो. अप्रतिम कोरीव काम केलेलं सोन्याचं क्षार-पात्र तयार करतो, राजाच्या फॉन्टेनब्ल्यू राजवाड्याचा एक दरवाजा आपल्या अप्रतिम कारागिरीनं नव्यानं उभा करतो. फ्रान्सिस राजा कलेवर फिदा होऊन पॅरिसमधली एक किल्लेवजा गढी त्याला बहाल करतो. त्याशिवाय आधीच्या पिढीत राजाच्या पदरी असलेल्या थोर कलाकार लिओ-नार्दिद विन्सी-इतकाच सातशे क्राउन एवढा प्रचंड वार्षिक भत्ता राजा सेलिनीला देऊ करतो. एका जीवघेण्या प्रसंगातून सुदैवानं पार पडल्यावर पॅरिस-मध्ये सेलिनीचं नशीब मोहरून येतं. त्याला घरदार मिळतं. रोमहून आणलेल्या सहाय्यकाना उत्तम वेतन राजाकरवी देता येतं आणि विशेष म्हणजे एका रसिक राजाचं पाठबळ प्राप्त होतं.

### त्यांना गुन्हेगार ठरवा

पण सेलिनीचं व्यक्तिगत आयुष्य एवढी सरळ, साधी वळणं घेत जाणारं नसतं. त्याचं अस्तित्व अनुभवाच्या लाटावर हेलकावत असतं. त्याचं कलावंत मन अस्वस्थ होतं. त्याच वृत्तीतलं बेडरपण त्याला स्वस्थ बसू देणार नव्हतं. त्या चाळिशीच्या प्रौढपणातही संघर्षाला झुकांड्या देणं त्याच्या वृत्तीत बसत नव्हतं कधी त्यानं राजानं दिलेल्या गढीचा ताबा घेताना झुंज दिली, कधी त्या वाड्यातल्या नाठाळ भाडेकरूंना बळानं रस्त्यावर फेकलं, कधी न्याय विकत घेऊन त्याच्या-सारख्या परकीयांवर जाणीवपूर्वक अन्याय करणाऱ्यांवर हल्ले करून घायाळ केलं. एक मात्र खर, कुणाचा जीव घेऊन आपणावर नवी आफत ओढवून घेण्याचं आपलं पहिलं शहाणपण त्यानं बाजूला ठेवलं; पण ह्याच धामधुमीत एका बाईपाशी निर्माण झालेलं प्रकरण मात्र विलक्षण वेगळं आहे.

सेलिनीनं किती तरी स्त्रियांना एखाद्या पुतळ्यासाठी न्यूड म्हणून वापरलं. कॅतेरिना ही त्यातलीच; एक मॉडेल. सुदर देहयष्टीच्या स्त्रीचा तो शय्यासोबतीसाठीही वापर करत असे. ही कॅतेरिना पॅरिसमधल्या एका नावाजलेल्या वेश्येची मुलगी होती. ती सुदर असल्याने का कोण जाणे सेलिनीला तिच्या इतरांशी संबंधाची नेहमी शंका यायची. पागेलो मिसोरी ह्या अगदी धार्मिक वृत्तीच्या सहाय्यकावर कॅतेरिनावर ' लक्ष ' ठेवायची जबाबदारी त्यानं विश्वासानं सोपवली. एकदा तो पागोलाला म्हणाला, ' पागोलो, माझं तिच्या-वाचून चालणार नाही. एक पुरुष असल्यानं मी तिच्याबरोबर झोप-लोही आहे ! कदाचित तिला माझ्यापासून मूल होईलही; पण दुसऱ्याच्या पोरावर खर्च करायची मला मुळीच इच्छा नाही ! आणि कोणी तसा गैर वागलेला मला खपणारही नाही ! ! आणि कोणी तसा गैर वागलाच तर तिचा आणि त्याचा मी मुडदाच पाडीन ! '

पण ह्या धार्मिक वृत्तीच्या पागोलोनच सेलिनीचा अखेर विश्वास-घात केला ! रतिक्रियेत मग्न असताना सेलिनीनं कॅतेरिना आणि पागोलोला पकडलं कॅतेरिनाची वेश्या आई तेव्हा नजर ठेवण्याची कामगिरी पार पाडत होती; पण ऐनवेळी त्याचा गळा कापण्याची आपली प्रतिज्ञा बाजूला ठेवून सेलिनीनं त्या तिघानाही धक्के मारून आपल्या गढीबाहेर काढलं !

बाहेर पडताच ह्या दोघी मायलेकींनी सेलिनीवर सूड घ्यायचा निर्धार केला आणि एका नॉर्मल वकिलाकडे त्यांनी धाव घेतली. वकिलानं सल्ला दिला,

' सेलिनीनं अनैसर्गिक, इटालिअन पद्धतीनं माझा उपभोग घेतला, असं कॅतेरिनानं कोर्टापुढे सागावं ! ह्या आरोप ऐकताच त्यासाठीच्या शिक्षेनं आपण धोक्यात आल्याचं समजून तो इटलिअन घाबरेल ! निदान काही पैसे देऊन तुमचं तोंड बंद करण्याचा प्रयत्न करील ! '

कॅतेरिना आणि तिच्या आईनं लगोलग कोर्टात सेलिनीविरुद्ध फिर्याद नोंदवली. सेलिनीला समन्स बजावण्यात आलं. सेलिनी आपले

दहा सशस्त्र सहकारी घेऊन कोर्टापुढं हजर झाला. येईल त्या प्रसंगाला काही करून सामना द्यायचा त्यानं मनाशी ठरवलं होतं. न्यायाधीश कॅतेरिनाला म्हणाले,

'तुझ्यात आणि सेलिनीत जे काही घडलं ते तू आम्हाला निवेदन कर!'

कॅतेरिनाचं उत्तर तयार होतं.

'सेलिनीनं माझ्याशी इटालियन पद्धतीनं संग केला!'

न्यायाधीश सेलिनीवर डाफरले.

'बेन्व्हेनुतो सेलिनी, ती काय म्हणतेय ते जरा कान खोलून ऐक!'

सेलिनी न डरता उत्तरला,

'न्यायमूर्तिमहाशय, मी जर इटालियन पद्धतीनं तिच्याशी संभोग केला असेल तर तो अगदी तुम्हा लोकांसारखाच मूल होण्याच्या हेतूनंच केला होता!'

न्यायमूर्ती उद्गारले,

'मूल होण्याच्या नेहमीच्या नैसर्गिक पद्धतीविरुद्ध तू तो केलास असच तिला म्हणायचंय!'

सेलिनी त्यावर उपहासानं उद्गारला,

'न्यायाधीशमहाशय, ही संबंधाची पद्धत इटालियन नव्हे! असलीच तर फ्रेंच असू शकेल!! कारण कॅतेरिना स्वतःच फ्रेंच असल्यानं त्यातली अधिक जाणकार आहे! आता मी नेमका कसा वागलो हे तिनं कोर्टापुढं सांगावं!'

मग त्या रांडेन, सेलिनीवर आरोप केलेल्या घाणेरड्या प्रकाराचं कोर्टापुढं निर्लज्जपणे वर्णन केलं. तिचं ते निवेदन संपताच सेलिनी किंचाळला,

'फ्रान्सच्या सत्ताधीश ख्रिश्चन राजाचे श्रेष्ठ सेवक असणारे न्यायाधीशमहाशय, मी आपणाकडे न्यायाची याचना करत आहे! फ्रान्सच्या राजाच्या सध्याच्या कायद्यानुसार ह्या गुन्ह्याला जाळून ठार मारण्याची शिक्षा सांगितली आहे ह्याची मला पूर्ण जाणीव आहे! आणि ही शिक्षा ह्या गुन्ह्यात सहभागी होणाऱ्या दोघाही व्यक्तींना लागू होते!! न्यायमूर्तिमहाशय, ह्या बाईनं स्वतःच्या पापाची आत्ताच आपणापुढे कबुली दिली आहे. मला आपण विचाराल तर माझे तिच्याशी असे कसलेही संबंध नाहीत हेच मी आपणास सांगेन आणि तिच्या त्या आईबद्दल म्हणाल तर ती रांडही अशाच एक ना दुसऱ्या गुन्ह्याबद्दल जाळून मारायलाच पात्र ठरेल हे तुम्हीही जाणता! आता आपणच काय ते ठरवा! मी आपणाकडे न्याय मागत आहे!'

त्यानंतर सेलिनी उच्च रवानं ओरडत राहिला,

'ह्या मायलेकींना गुन्हेगार ठरवा!' त्यानाही शिक्षा करा!'

यापुढं जाऊन त्यानं न्यायाधिशानाच दम दिला,

'जर आत्ताच्या आत्ता, माझ्या समक्ष, आपण त्या दोघींना तुरुंगात घालणार नसाल, तर मी तावडतोब असाच्या असा राजाकडे धाव घेईन आणि आपण माझ्यावर करत असलेल्या अन्यायाविरुद्ध दाद मागेन!'

त्याबरोबर न्यायमूर्तींचा आवाज खाली आला आणि सेलिनीचा स्वर टिपेला चढला. तो किंचाळायला लागला,

'त्यांना जाळा! त्यांना जाळा!!'

घटना ठरवल्यापेक्षा वेगळं वळण घेताहेत हे पाहिल्यावर त्यांचा तो नॉर्मल वकील समजावणीच्या शब्दांवर उत्तरला,

'त्या स्त्रिया आहेत! पतिता आहेत! पुरुषापेक्षा दुबळ्या आहेत!' असं सांगत त्यांची रदबदली करू लागला आणि त्याच क्षणी सेलिनीला खात्री पटली, आपण बाजी मारली! मग तो आपल्या सहकाऱ्यांसह न्यायालयातून बाहेर पडला आणि आपल्या गढीत परतला.

## 'वाचलेला' माणूस

खरं तर पाचएकशे क्राउन तोंडावर फेकून सेलिनी त्यांची तोंडं बंदही करू शकला असता; पण सेलिनी आपल्या स्वतःवरचा आघात सहन करणाऱ्यातला नव्हता, हेच अशा प्रसंगातून पुन्हा एकदा सिद्ध होतं. आपल्या चारित्र्यावरचा हा हल्लाही त्यानं आपल्या बुद्धिचातुर्यानं परतवला. शत्रूचे दात त्याच्याच घशात घातले. एवढच नव्हे, त्यानंतरही आपला नादान, धोकेबाज सहकारी पागोलो मिसेरीवरचा सूडही त्यानं तलवारीचा धाक दाखवून, त्याच त्या रांडेशी, कॅतेरिनाशी, लग्न लावून पुरा केला आणि एवढच नव्हे तर त्या लग्नानंतरदेखील पराभूत कॅतेरिनाला न्यूड मॉडेल म्हणून राबवून, त्याच वेळी तिचा उपभोग घेऊन आणि शेवटी तर तिला निर्दयपणे मारहाण करून त्यानं आपल्या सूडाची हद्द गाठली! अपमानानं उफाळून आलेल्या सेलिनीच्या खुनशीपणात काहीसं राक्षसी वळण घेतल्याचं वाचकाला इथं जाणवतं. श्रेष्ठ कलाकृती निर्माण करणाऱ्या श्रेष्ठ कलावंताचं हे अमानुषपण अगदी आश्चर्यकारक असतं.

सेलिनी हा एक 'वाचलेला' माणूस होता असं म्हटलं जातं. त्याची रांगडी भाषा, खुना-खुनी, लक्षात घेतली तरी ही तो आतल्या आत कुठे तरी बऱ्यापैकी सुसंस्कृत माणूस असावा. लिओ नार्दो त्याच्या आधीच्या पिढीतला, तर मायकेल अँजेलो, राफेल त्याचे समकालीन. आपल्या ह्या थोर समकालिनांनी उचीवर नेऊन ठेवलेल्या कलात्मक दर्जाची त्याला निश्चितच जाणीव असावी. सेलिनी आपल्या निवेदनात मायकेल अँजेलोचा वरचेवर उल्लेख करताना दिसतो. त्याला तो आपला गुरूच मानतो. कलेच्या क्षेत्रात आपण मायकेल अँजेलोचे किती ऋण मानतो हेही तो वारंवार ठसवतो. त्याच्या कित्येक कलाकृतींवर मायकेल अँजेलोचा प्रभाव जाणवत असला तरी पुढची दोन शतकं जगातल्या चित्रक्षेत्रावर आपल्या शैलीनं मोहिनी घालणाऱ्या मायकेल अँजेलोच्या उचीला तो पोहचू शकला नाही, हेच खरं! सेलिनीच्या दृष्टीनं आपल्या लिखाणात त्यानं आवर्जून विशेषण लावल्याप्रमाणे मायकेल अँजेलो 'थोर (ग्रेट)'च राहिला! ह्या संदर्भात सिमण्डच सेलिनीबाबतच मत अधिक ग्राह्य धरलं जातं. तो म्हणतो, 'सेलिनी हा एक परिपूर्ण कारागीर होता; पण तो काही प्रतिभाशाली कलावंत नव्हता. त्याच्या कलेमध्ये पुरेशी सखोलता असत नाही, खऱ्या अर्थाची महत्ता असत नाही, तसाच सुसंवादही सापडत नाही!'

सेलिनीचं फ्लोरेन्सप्रेम त्याच्या शब्दाशब्दातून दृष्टिक्षेपात येतं. रोम असो, पॅरिस असो तो तिथेही फ्लोरेन्सच्या रहिवाशांशी संपर्क राखून असता आणि आयुष्याच्या सध्याकाळीही तो स्वाभाविकच फ्लोरेन्सकडेच परततो सेलिनीचं फ्लोरेन्सच्या मेडिकी राजघराण्यावर

मनापासनं प्रेम असतं. त्याचप्रमाणे रोमचा पोप आणि फ्रान्सच्या राजाशीही तो निरकाच एकनिष्ठ असतो. ह्या राज्यकर्त्यांच्या दरबारातच त्याच्या कलेला आश्रय मिळतो, वाव मिळतो. ते कितीही जुलमी असोत. लहरी असोत, जसा तो आपल्या कलागुणांमुळे स्वतःला कुठल्याही नीति–नियमांपलीकडचा ठरवतो त्याचप्रमाणे ह्या सर्व राज्यकर्त्यांना त्यांच्या जन्मजात अधिकारामुळं साऱ्या कायदेकानूनांच्या पलीकडचे समजतो! सेलिनीचं हे 'अगाध' तत्त्वज्ञान वाचकाला विलक्षण बुचकळ्यात टाकणारं आहे. आपल्या अद्वितीय कलागुणांमुळं श्रेष्ठ कलाकाराचा कदाचित समान बंधनांना अपवाद केला गेला तरीदेखील एखादा क्रूरकर्मा अन्यायी राजा कुठल्याच सामाजिक न्यायअन्यायापलीकडे कोणत्याही काळात असू शकणार नाही, असता कामा नये!

सेलिनी कलावंत म्हणून कोणत्याही दर्जाचा असेना, सेलिनीची 'द लाइफ' ही निःसंशय एक श्रेष्ठ कलाकृती आहे. ही कलाकृती त्यानं अजाणताच निर्माण केली असाही त्याच्यावर आता आरोप केला जातो. स्वैरपणानं केलेल्या ह्या लिखाणातूनच फारशी साहित्यिक जाण दिसत नाही येवढं मात्र म्हणता येईल आणि त्याखेरीज एकीकडे परमेश्वराचे आभार मानण्याच्या उदात्त हेतूनं केलेलं हे लिखाण दुसरीकडे आपला एक डोळा जनमानसावर ठेवून केलं गेलं आहे, हेही सेलिनीच्या ह्या स्वैर शब्दाविष्कारातून जाणवतं; पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे 'आपण कोणत्या (उच्च) प्रतीचे कलाकार होतो, व्यक्ती होतो, हेच जगाला ठासून सांगण्यासाठी सेलिनीचं केलेलं हे स्वसमर्थन होतं.

## सौंदर्याचं प्रेम!

एरवी कलावंताच्या व्यक्तित्वात वसणारी भावविवशता, हळुवारपणा ह्यासारख्या गोष्टी सेलिनीत अभावानंच आढळतात. तेव्हा युरोपात प्लेग फैलावलेला असतो. एकदा सेलिनी कोणा ड्यूकची सेवा बजावून येतो तेव्हा त्याच्या घराचा अनोळखी स्त्रीनं ताबा घेतलेला पाहून तो संतापतो. तिला धमकावतो. तो गोंधळ पाहून एक शेजारीण धावत येते आणि त्याच्या प्रेमळ बापाचा आणि भावाबहिणीचा प्लेगनं बळी घेतल्याची निर्घृण बातमी सेलिनीच्या कानावर घालते तेव्हाच तो हेलावतो! दोन वर्षांचा त्याच्या नोकराच्या घरी वाढणारा त्याचा एक अनौरस मुलगा एका भेटीत नंतर त्याला परत जाऊ देत नाही. करुणपणे रडतो आणि सेलिनी परतल्यावर दोनच दिवसांत अचानक मृत्युमुखी पडतो, ही आठवण सांगतानाही तो विलक्षण हळवा होतो. अर्थातच असे प्रसंग क्वचितच. एरवी त्याची कलावंताची भावविवशता, भावकर्कशताच होत असल्याचं दिसतं.

पॅरिस आणि रोमप्रमाणेच त्याच्या स्वतःच्या फ्लॉरेन्स शहरानंही सेलिनीच्या वाट्यास सुखाएवढंच दुःखाचंही दान दिलं.ह्याच शहरात ड्यूकसाठी त्यानं ग्रीक पुराणातल्या पर्सुअस ह्या योद्धयाचा अतिभव्य ब्राँझचा पुतळा बनवला, तेव्हा तो आयुष्याच्या उतरणीला लागला होता. १५५४ मध्ये फ्लॉरेन्समधल्या थोर पुरुषांत त्याची गणना केली गेली; पण त्यानंतर दोनच वर्षांनी दुसऱ्या एका सुवर्णकारावर हल्ला केल्याबद्दल ह्याच फ्लॉरेन्सनं त्याला पुन्हा एकदा तुरुंगात डांबलं. त्यानंतर आपल्याच एका तरुण सहकाऱ्याशी समलिंगी संबंध ठेवल्याबद्दल त्याची निर्भर्त्सना केली गेली. एवढंच काय त्याच्या अष्टपैलू आयुष्याचा आणखी एक आविष्कार म्हणून की काय त्याचं मुंडनही करण्यात आलं! ह्या साऱ्याच धामधुमीत त्यानं आपल्या आयुष्यावर आधारित 'सुवर्णकला आणि शिल्पकला' हा प्रबंधही लिहायला सुरुवात केली. १५६४ मध्ये आणखी एक सन्मान त्याच्याकडे चालून आला. थोर मायकेल अँजेलोच्या दफनविधीला उपस्थित रहाणाऱ्या फ्लॉरेन्सच्या शिष्टमंडळाचा एक सदस्य म्हणून इतर थोर कलाकारांबरोबर त्याचीही निवड झाली; पण दुर्दैवानं अति आजारपणामुळं मायकेल अँजेलोचा एकनिष्ठ शिष्य म्हणवून घेणारा हा कलाकार त्याच्या अंत्यविधीलाही उपस्थित राहू शकला नाही!

सेलिनीचं वैयक्तिक आयुष्यही अपयशाच्या अंधारात अखेरपर्यंत गोते खात राहिलं. कमीत कमी आठ औरस आणि अनौरस अपत्यांना जन्म देऊन समाधान न झाल्यानंच की काय १५६० मध्ये त्यानं आपल्याच एका मॉडेलचं मूल दत्तक घेतलं. पुढं स्वतःचं एकही मूल धड जगलं नाही तेव्हा त्यानं ह्याच दत्तक मुलाला आपला वारस नेमलं; पण पुढं त्याचेच प्रताप पाहिल्यावर त्यानं आपलं दत्तकपत्र रद्द करून टाकलं; पण उरलेल्या ह्यातभर ह्या दत्तक मुलाच्या निर्वाहासाठी पोटगी देणंही त्याला भाग पडलं!

सेलिनीचं सौंदर्यावरचं प्रेम अखेरपर्यंत अबाधित होतं. विशेषतः मानवी देहाचं सौंदर्य त्याच्यातल्या कलावंताला आयुष्याच्या नाक्यानाक्यावर खुणावताना दिसतं. ह्या सौंदर्यप्रेमानंच त्याला आपल्या निर्मितीतून अपार आनंद मिळाला आणि त्याचबरोबर अवघड अवघड कलात्मक उद्दिष्टंही सहज साध्य करणं शक्य झालं; पण विशेष म्हणजे सेलिनी आपल्या कलेबद्दल ती स्वतःची रखेली असावी अशाच भावनेनं लिहीत जातो. कधी तो तिच्याशी बेइमानी करून, तिला लाथाडून देऊन, रोमच्या हल्ल्याच्या वेळी लढायला धाव घेतो आणि ह्या युद्धातही अधिकाधिक माणसं मारण्यातच ह्या कलावंताला अधिक आनंद मिळतो.

'द लाइफ' ह्या आत्मकथेनं सेलिनीला मुख्यतः कीर्ती प्राप्त झाली. अनेक स्थित्यंतरानंतर अठराव्या शतकात त्याच्या आत्मकथेचं मूळ हस्तलिखित कुठे तरी गहाळ झालं आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला १८०५ मध्ये अचानक एका पुस्तकाच्या दुकानात ते आढळून आलं. त्या दुकानाच्या मालकाच्या मृत्युपत्रानुसार, त्यानंतर आणखी तब्बल दोन दशकांनंतर, ते फ्लॉरेन्सच्या लॉरेन्तियन लायब्ररीच्या स्वाधीन करण्यात आलं. त्यानंतर आजतागायत तेथेच ते सुरक्षितपणे जपून ठेवलं गेलं आहे.

फेब्रुवारी १५७१ मध्ये सेलिनी क्षयानं निवर्तला. अॅन्यूनझ्याता चर्चमध्ये मोठ्या सन्मानानं त्याचं दफन केलं गेलं. सेलिनी जिवंत असताना त्याला फ्लॉरेन्सनंच कारागीर म्हणून जसा नावलौकिक मिळवून दिला तसंच त्याच्या मृत्यूनंतरही त्याला तितक्याच प्रेमानं सन्मानित केलं. त्यांच्या दृष्टीनं त्याच्यातला कारागीर श्रेष्ठ होता; पण शिल्पकार म्हणून त्याच्या कर्तृत्वाबद्दल त्यांच्यात एकमत नव्हतं.

सेलिनीच्या मृत्यूनंतर सुमारे दोनशेहून अधिक वर्षांनी म्हणजे सन १७२८ मध्ये त्याचं आत्मवृत्त नेपल्समध्ये इटालियन भाषेत सर्वप्रथम

प्रसिद्ध झालं आणि त्यानंतर आणखी अर्धशतकानंतर ते आधी इंग्रजी, मग जर्मन आणि त्यानंतर फ्रेंच भाषेत अनुवादित केलं गेलं. सेलिनीच्या ह्या आत्मचरित्राच्या प्रसिद्धीबरोबरच युरोपातल्या सौंदर्यप्रेमी वृत्तींना एकच भरतं आलं. सेलिनीच्या सोन्याचांदीच्या सर्वच कलाकृती त्याच्या मृत्यूनंतर वितळवल्या गेल्या. फक्त त्यानं फ्रान्सच्या राजासाठी प्रेमानं बनवलेलं क्षारपात्र आज फ्लॉरेन्सच्या म्युझियममध्ये अस्तित्वात आहे. तसंच पोप क्लेमेंटच्या हिऱ्यांच्या मुकुटाचं डिझाइनही लंडनच्या म्युझियममध्ये जतन करून ठेवलं आहे.

सेलिनीच्या आत्मचरित्रात कर्कशपणे जाणवतो त्याचा स्वतःबद्दलचा चढेल स्वर, स्वतःच्या कलेबद्दल आणि पराक्रमाबद्दलच्या त्याच्या बढाया ! अर्थात स्वतःबद्दलचे त्याचे सारेच दावे सहजासहजी निकालात निघू शकत नाहीत हेही तितकंच खरं आणि ह्या साऱ्यापलीकडे जाऊन ह्या आत्मनिवेदनातून व्यक्त होतो तो थक्क करणारा त्यातला स्पष्टपणा, मोहवून टाकणारा मनमोकळेपणा आणि अतुलनीय अस्सलता !

कलाकाराच्या आधुनिक व्याख्येत बेन्व्हेनूतो सेलिनीचा सरळ समावेश होऊ शकणार नाही. त्याला आपल्या परिभाषेत समाविष्ट करून घ्यायला ती थिटी ठरेल. त्याच्या कलेच्या निष्ठेबद्दल बोलणं हेही आपणाला चुकीच्या निष्कर्षाप्रत आणून सोडेल; पण एक मात्र खरं की, सोळाव्या शतकातल्या समाजजीवनाचं अगदी जवळून दर्शन घडवणारं सेलिनीचं अस्सल आत्मचरित्र हा इतिहासाच्या अपार्थिव तटबंदीतला एक झरोकाच असू शकेल ! □

---

## फिनिक्स निवड

## Catch-22

–Joseph Heller

## Zorba the Greek

–Nikos Kazantzakis

'कॅच–२२' हे जोसेफ हेलरचे पुस्तक बहुतेक १९६१ मध्ये निघाले. तेही 'हू इज अफ्रेड ऑफ व्हर्जिनिया वुल्फ' सारखेच वाचायचे म्हणून राहिले. बहुतेक अवघड पुस्तके वाचण्याचे आपण सारखे पुढे ढकलतो. 'कॅच ट्वेंटी–टू' हे पुस्तक इतके गाजलेले आहे की, 'कॅच–२२ सिच्युएशन' असा एक वाक्प्रचारच इंग्रजी भाषेत प्रचलित झाला आहे. कधीकधी लोकांचा एखादा ग्रुपच विन्सेन्ट व्हॅन गॉगच्या व्हिटफील्डमध्ये असतो. सर्वांचीच चेकमेट सिच्युएशन. इथे हलावं तर हे आडवं, ते करावं तर इथे वांधे. काहीच न करावे तरीही बोंबाबोंब. 'टाइम'सारख्या उच्चभ्रू मासिकात हा वाक्प्रचार मी अनेक वेळा वाचला होता, म्हणून तर हे पुस्तक परवा दोन–तीनदा वाचून काढले.

मुख्यत्वे हे पुस्तक युद्धाविरुद्ध आहे. हेलरची तुलना जोनाथन स्विफ्ट (गलीव्हर ट्रॅव्हल्सवाला) व इव्हलीन वॉ (द स्कुप वाला) यांच्याशी केली जाते. यातलं मुख्य पात्र म्हणजे यॉसेरियन बॉंबर पायलट. तो त्याची ड्युटी करायला नेहमीच नाखूष असतो. बावीस ही WWII ची एक अप्रतिम व अद्वितीय कादंबरी आहे. अनेक समीक्षकांनी अनेक वर्षे अनेक विशेषणे या कादंबरीला बहाल केली. एखाद्या जेट इंजिनाने जमीन सोडून आकाशात झेप घ्यावी तसं हे पुस्तक प्रसिद्धीच्या झोतात झेपावलं. जेव्हा अनेक लेखक फॉर्म्युला टाइप कादंबऱ्या लिहीत होते त्या वेळेला हेलरने 'कोसला' (सॉरी Catch–22) लिहिली. एक लॅंडमार्क. नेहमीच्या कादंबरीपेक्षा 'कॅच–२२' ही एकाच वेळी थिटी व सुपिरियर आहे.

बावीसचं असं आहे बघा. कादंबरी म्हणून ती अगदीच तुटक तुटक व विस्कळित आहे. ती इतकी की, कधीकधी आपल्याला वाटावं की, कादंबरी या सदरात ती बसते कशी ? परंतु केवळ लिखाण म्हणून पाहिले तर मजकूर उत्कृष्ट आहे. हा एक पॅराडॉक्स नाही. कादंबरीचं तंत्र तसं अल्डस हक्सलेलाही अजिबात जमलेलं नव्हतं. बावीस या कादंबरीत एका विचित्र प्रकारच्या लॉजिकची नस आहे. विनोद तर इथे आहे, उपहासही भरपूर. मधेमधे जंगलीपणा आहे. कधीकधी या लिखाणात शिस्तच नाही. तर कधीकधी हेमिंग्वे सारखी स्टॅकॅटो, लॅकॉनिक संभाषणे आहेत. मधेच एखाद्या वेळेला लुई कॅरॉलची (Alice In Wonderland) नॉन्सेन्स फॅन्टसी आहे. काफ्का तर आहेच आहे आणि हेन्री मिलरची हगवण (Scatological scences) पण आहे.

युद्धात न जाण्यासाठी कॅच–२२ मधला अॅन्टिहिरो किती क्लृप्त्या लढवतो ते वाचून डोळ्यांत अश्रू, ओठात हसू येतं. तो आळीपाळीने युद्धात न लढण्यासाठी भेकडपणाचं प्रदर्शन, याचना, निंदा, धमक्या व अनेक प्रकारचे विक्षिप्त वर्तन करतो. इथेच तर Catch–22 येतं. तो डॉक्टरकडे लिव्हर दुखते म्हणून जातो; पण त्याला जॉन्डीस नसतो. डॉ. दनीक त्याला म्हणतात, 'कुणी क्रेझी असेल तर मी त्याला ग्राउंड करू शकतो; परंतु ज्याला कॉंबॅट ड्युटी टाळायची आहे तो क्रेझी कसा असू शकेल ?' अर्थात याआधी यॉसेरियनच्या साध्या लॉजिकमुळे त्याला क्रेझी लेबल लावलं गेलं असतं.

एकदा स्नॉडेन नावाच्या रेडिओ–गनरचे गोळी लागून दोन तुकडे होतात. रक्त व पोटातले आतडे सर्व यॉसेरियनच्या युनिफॉर्मवर उडतात. त्यानंतर काही काळ यॉसेरियन कपडेच घालत नाही ! त्याला काही काळाने फ्लाइंग क्रॉस बहाल करण्यात येतो तेव्हा तो युनिफॉर्म न घालताच येतो ! मग बिल्ले, पिना वगैरे लावणार कसे ? सर्व मिलिटरीत खळबळ. या सर्व घटना इटलीजवळच्या पिआनॉसा (काल्पनिक) या बेटात व रोममध्ये घडतात. कॅप्टन्स, जनरल्स व सोल्जर्ससारखे पिआनोसा ते रोम शटल होत असतात. 'कॅच–२२' ह्या पुस्तकात जोसेफ हेलरना असे सांगायचे आहे की, चांगल्या माणसांना या जगात स्थान नाही. आर. डी. लॅंगनी जे विचार अगदी गंभीरपणे मांडले तेच विचार हेलरने काही अंशी विनोदाने मांडले. 'या जगाची मूल्ये मला मान्य नाहीत...' हेच 'बावीस'चे पालुपद !

१९६० ते १९७० या दशकातलं हे सर्वोत्तम पुस्तक म्हणून चर्चिले गेले. अजूनही ते चर्चिले व वाचले जाते. वीस वर्षांत हेलरनी तीन ते चारच कादंबऱ्या लिहिल्या. म्हणून तर त्याची गुणवत्ता टिकून राहिली.

सुरूवातीला कॅच– २२ चे नांव कॅच–१८ होतं; परंतु संपादकानं म्हटलं ते लिऑन युरीच्या मिला–१८ या कादंबरीबर क्लॅश होईल म्हणून १८ चं २२ झालं.

Catch– 22 हा सिनेमा १९७० साली निघाला. ज्याला ब्लॅक कॉमेडी म्हणतात त्याचा २२ हा प्रकार आहे. कॅच– २२ हे दुसऱ्या विश्वयुद्धावरचं ( आणि त्यामुळे सर्वच युद्धावर ) एक आरोपपत्र आहे. या जगात अशा अनेक प्रकारच्या मोठमोठ्या संस्था आहेत की, त्यात ' माणूस ' पण अजिबात नाही. अशा संस्थेचा म्होरक्या म्हणजे मिलिटरी. या पुस्तकालाही थिएटर ऑफ द ॲब्सर्डचा टच आहे. हेलर टाइम, लुक व मॅकॉल्स मासिकात काम करीत असताना त्यांनी ही कादंबरी लिहिली.

काही लोक विचारतील की या जगाची मूल्ये मला मान्य नाहीत एवढा निष्कर्ष काढण्यासाठी बावीस वाचायचा खटाटोप का करावा ? तर याला मी उत्तर देईन की, कच्चं अंडं खाण्यात व आम्लेट खाण्यात फरक नसतो का ?

¤

आता 'झोरबा द ग्रीक' हे पुस्तक घेऊ या. या पुस्तकाचे लेखक श्री. निकोस काझान्टझकीस हे एक ग्रीक फिलॉसॉफर होते. आंद्रे मालरो जसे फ्रान्सचे मंत्री आणि लेखक होते तसेच काझान्टझकीस हे ग्रीसचे मंत्री व लेखक होते. ग्रीसमधील आधुनिक साहित्यनिर्मितीत काझान्टझकीसचा वाटा फार मोठा समजला जातो. प्रत्येक देशातील साहित्यक्षेत्रात काही नावे फार फेमस असतात. अशातलाच हा प्रकार. काझान्टझकीस हे हेन्री बर्गसन याच्या हाताखाली तत्त्वज्ञान शिकले. ते काही काळ युनेस्कोचेही अधिकारी होते. शोकांतिका, प्रवासवर्णने, निबंध असे साहित्याचे अनेक प्रकार त्यांनी हाताळले आहेत. डिव्हाइन कॉमेडीसारख्या क्लासिक पुस्तकाचे भाषांतर ग्रीकमध्ये केले आहे.

त्याच्या He who must die ( Greek Passion ) या पुस्तकावरही सिनेमा निघाला आहे. त्याची मुलगी हेलन हिने त्यांचे चरित्र लिहिले आहे.

असा हा काझान्टझकी झोरबाचा लेखक होता; पण गंमत अशी की, त्यांचा झोरबा द ग्रीक या पुस्तकावराच्या एथनी क्विनच्या गाढवावर बसलेला फोटो पाहिला की हा काय फार्स आहे असे अनोळखी इसमास वाटते. पुस्तक इतकं भन्नाट आहे की वाचून झाल्यावर कायम इम्पॅक्ट रहातो.

ज्याला रॉ पॅशन म्हणतात तो या पुस्तकात आहे सेलिब्रेशन ऑफ लाइफवर आपण अनेक व्याख्याने ऐकलेली असतात. रजनीशचा तर तो खास विषय; पण या पुस्तकात जे लाइफचं सेलिब्रेशन आहे तसे मी तरी इतर ठिकाणी वाचले किंवा ऐकले नाही.

खाणीत काम करणारा झोरबा हा ६० वर्षांचा असतो. मृत्यू जवळ ठेपला असताना जीवनाचे अनेक अनुभव घ्यायला तो आसुसलेला असतो. जसजसं त्याचं वय वाढत जातं तशीतशी त्याची अनुभव घेण्याची तृष्णा अघोर होत जाते. खाणं, पिणं, बाया– सर्व हेमिंग्वेसारखं. शरीरही अगदी आडदांड. पुस्तक वाचताना आपल्याला असं सांगावसं वाटतं, 'वा झोरबा, जरा हळू !' पण हळू आणि सौम्य हे शब्दच त्याच्या डिक्शनरीत नाहीत !

एकदा झोरबाला काही सांगायचं असतं. शब्द थिटे आणि उणे पडतात म्हणून तो उठून सरळ नाचायला लागतो !

या पुस्तकातील स्थळ म्हणजे क्रीट. हे ग्रीसचे सर्वांत मोठे बेट. खाणीतल्या कामगारांचा सुपरवायझर म्हणून झोरबाला इथे आणले जाते आणि पुढचं सर्व घडतं. जो गोष्ट सांगतो तो नॅरेटर म्हणजे 'बॉस.' मॅडम हार्टेन्स म्हातारी होत असलेली गणिका असते. त्याशिवाय एक विधवा बाई व स्टॅवरिडकी नावाचा बॉसचा फ्रेंड अशी मुख्य पात्रे या पुस्तकात आहेत. झोरबा आणि बॉसच्या वादावादीत झोरबाच जिंकतो. कारण झोरबाचं तत्वज्ञान अगदी डाउन–टू–अर्थ असतं. झोरबा हा खऱ्या अर्थानं 'फ्री' असतो. स्वतःच्या प्रेरणेनुसार वागणारा, एखादी वस्तू त्याला आवडते तेथे तो रेंगाळतो. त्या वस्तूचा किंवा माणसाचा कंटाळा आला की, तो पुढे सरकतो. मनात कसलेही इंद्रियव्यापारनिग्रह न ठेवता. म्हणूनच झोरबा एवढा रिफ्रेशिंग वाटतो. चुकवू नये असं काही ...... जरूर वाचा.

–जे. एन्. पोंडा


**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल ! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बाबुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

–ग. रा. जाधव
(केसरी, रविवार, ६–१२–८१)

**आंबेडकर भारत**

लेखक : बाबुराव बागुल
राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : २० रुपये.

# अंबाजोगाई : हा उत्साह, हा आनंद, ओळखी अन् गप्पा

राजा दीक्षित

माझे वडील दरवर्षी साहित्य संमेलनाची वारी करतात; पण मी काही त्यांच्यासारखा 'माळकरी' नाही. परगावच्या संमेलनाला यंदा मी प्रथमच गेलो. यापूर्वी पुण्यातच झालं म्हणून एक संमेलन पाहिलं होतं. यंदाच्या संमेलनातल्या कविसंमेलनासाठी मी निमंत्रित होतो. कवी असल्या संधीसाठी टपून बसलेलेच असतात! साहजिकच अंबाजोगाईच्या एस्. टी. त बसलो. धुळीच्या साम्राज्यातून प्रवास करत अंबानगरीला पोहोचलो. स्टॅंडसमोरच्या स्वागत–कक्षात चहासकट जे स्वागत झालं त्यामुळे भावी व्यवस्थेविषयी गोड गैरसमज करून घेतले; पण ते सगळं काव्य लवकरच धुळीला मिळणार होतं!

तो समेलनाचा आदला दिवस होता. बरेचसे पाहुणे समेलनाच्या दिवशी येतील असा सयोजकाचा अदाज होता. तो चुकला अन् त्याची जाम तारांबळ उडाली. समेलनाच्या कार्यालयातल्या सुरेख पोर्ट्रेटमधले कुरूंदकर ही तारांबळ आपल्या मिरिकल नजरेतून टिपत होते. कुरुंदकराची उणीव समेलनात जाणवत होती. गुरुजींच्या अकल्पित मृत्यूची हळहळ लोकांच्या मनात अजूनही किती ताजी आहे, याचं प्रत्यंतर आलं.

स्वामी रामानदतीर्थ महाविद्यालयाच्या आवारात हिंडताना एक बंदुकधारी वॉचमन दिसला. साहित्य संमेलनात बंदुक पाहून मजा वाटली. बिचारे मराठी साहित्यिक करून करून काय करणार? 'डास मारायला बंदुक कशाला' ही म्हण सारखी मनात घोळायला लागली. न राहवून त्या वॉचमनला गाठलं. सुदैवाने, वॉचमनला साजेसा उर्मटपणा त्याने दाखला नाही. त्याची वाणी भलतीच गोड. मी त्याला विचारलं की, 'बॅंकेत अशा बदुकीची गरज असते; पण कॉलेजवर काय बुवा गरज?' त्या कॉलेजचं आवार प्रचंड आहे आणि त्या भागात पूर्वी मोठा दरोडा पडला होता. तेव्हापासून वॉचमनच्या हातात बदुक आली. हा वॉचमन खूपच जुना सेवक आहे. १५–२० वर्षे तरी नोकरी करतोय. त्याचं नाव सय्यद पाशा. स्वामी रामानंदतीर्थांची सेवा केल्याचं तो सागत होता. 'बागी मदरसा'च्या श्री. बाबासाहेब परांजपे यांच्या मोठेपणाच्या आठवणीही त्याने सांगितल्या. बाबासाहेबांबद्दल बोलताना त्याचे डोळे कृतज्ञतेने पाणावले. त्यांच्या कार्याची साक्ष आजूबाजूच्या इमारती जेवढ्या देत होत्या तेवढेच पाशाचे भरून आलेले डोळे देत होते. पाशाने आगीतून मुलाला वाचवणे, चोराशी लढणे असे त्याला साजेसे पराक्रम तर केले आहेतच; पण चवक नाटकात कामही केलं आहे. त्या निमित्ताने त्याला जिवाच पुणं करायला मिळालं होतं! साहित्य संमेलनाच्या अध्यक्षानाही बंदुक चालवता येते हे मी पाशाला सांगितलं. 'अध्यक्षांचा परिचय' हे सुरुवातीचे गोड काम जणू माझ्याकडे आहे अशा थाटात मी त्याला सारं काही ऐकवलं. संमेलनात पाशाने बंदुकीचा वापर अर्थातच केला नाही. वास्तविक कविसमेलन ऐकताना लोकांची त्याच्याकडून ती अपेक्षा होती! पण तो अधिक सूज्ञ. एक कवी मारला तर दहा कवी त्याच्यावर कविता लिहितील अन् त्या गाऊन दाखवतील हे भावी संकट त्याने हेरलं असावं! म्हणूनच की काय, शेवटचे दोन दिवस त्याने बंदुकीला रजा दिली

गैरव्यवस्था हे या संमेलनाचं एक प्रमुख वैशिष्टय. यजमान लोक तसे फार चागले होते. तळमळीने राबत होते. पण मुळात संयोजनच धड नव्हत. पुरेसा पैसाही उभा राहिला नाही. संयोजन–समितीत भाडणं होती. पाहुण्याचे राहण्या–जेवणाचे हाल झाले. लोकांनी सुरुवातीला शिव्या–शाप दिले; पण मग विनोदाचा आश्रय घेतला. त्यामुळेच जेवताना वाटीतल्या पदार्थाच 'वरणाचं सूप' असं नामकरण झालं! खास निमत्रित पाहुणे–साहित्यिक, तसच माडगूळकर कुटुबीय याच्याकडेही सयोजकाच दुर्लक्ष होत होतं. पुढे बसण्याच्या जागावर देणगीदाराचा थवा आक्रमण करीत होता. खुद्द व्यासपीठावरही ज्याचा काही सबंध नाही असे लोक गर्दी करत होते. त्याच्या जोडीला कधीकधी पोलीसमामाही असत. गैरव्यवस्थेच्या तडाख्यातून पत्रकारसुद्धा सुटले नाहीत. एवढ मोठं समेलन म्हटलं की, काही गैरसोयी व थोडा गोंधळ गृहीतच असतो; पण अंबाजोगाईला तो खटकण्याइतका होता. उत्साहाला शिस्त नसल्यामुळे सयोजकाचा चागुलपणा निरुपयोगी ठरला.

नामातराच्या प्रश्नाची छाया या समेलनावरही पडलेली होती. पण सारं काही सफाईने निभवून नेण्यात आलं. दलित साहित्यावर एक परिसवाद, विविध कार्यक्रमामध्ये दलित साहित्यिकाचा समावेश, नामांतर आदोलनातले हुतात्मे पोचीराम काबळे व जनार्दन मवाडे याची भोजनगृह व प्रवेशद्वाराला दिलेली नावं, ग्रंथदिंडीत दलित साहित्यिकांचे ग्रथ–अशा मलमपट्ट्या केलेल्या होत्या. दुसरीकडे पोलीस दक्ष होते. सात–आठशे नामांतर विरोधकांची फौजही सज्ज असल्याचं ऐकलं. नामातराबाबतचा ठराव अधिवेशनात आलाच नाही! युक्रांदच्या चार–सहा कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या अन् त्यांची उचलबांगडी झाली. विद्रोही कवींनी आपलं एक कविसमेलन भरवलं बस! झाल ते एवढच. नामातर चळवळीची धार बोथट झालीय हे नक्की एका दलित कविमित्राशी गप्पा मारत होतो. 'नामातरावरून विशेष गडबड होणार नाही, कारण एकंदरच चळवळ थंडावलीय', हे त्याचे उद्गार खरे ठरले. गावातून हिंडत होतो तेव्हा, समेलनाच्याच मुहूर्तावर एका चौकाचं 'डॉ. बाबासाहेब आबेडकर चौक' असं नामकरण झालेलं दिसलं. नाम-

करणाची कक्षा यापलीकडे विद्यापीठापर्यंत जाईल असं दिसत नाही. बाकी एक वेळ ठीक; पण नामांतर प्रश्न साहित्यसंमेलनात येऊ देण्यास खरोखरच तात्त्विक विरोध असेल [तर आंदोलनातील हुतात्म्यांची नावं भोजनगृह व प्रवेशद्वाराला देण्याचा देखावा करण्याची काय आवश्यकता होती? अशी कोरडी सहानुभूती दाखवून काय साधलं? हुतात्म्याची अशी क्रूर थट्टा करायला नको होती.

## ग्रंथदिंडी–गावाची

चार तारखेला दुपारी ग्रंथ-दिंडी निघाली. योगश्वरीच्या मंदिरापासून कुरुंदकरनगरापर्यंत. दिंडीच्या अग्रभागी एका बैलगाडीत समेलनाध्यक्ष व्यकटेश माडगूळकर आणि पूर्वाध्यक्ष गंगाधर गाडगीळ लाल फेटे बांधून बसलेले होते. पुण्यातल्या गणेशोत्सव मिरवणुकीतल्या मानाच्या गणपतीसारखा थाट होता. सिल्कचा नेहरूशर्ट घातलेल्या रुबाबदार माडगूळकरांच्या उजळ अन् गव्हू चेहऱ्याला डोईचा फेटा भलताच खुलून दिसत होता. गावचे श्रीमंत पाटीलच जणू! गाडगीळांकडे पाहून गमत वाटली. जीनची पँट. भोवती बेल्ट. पँटमध्ये खोचलेला बारीक चौकटीचा शर्ट अन् डोईला फेटा. रोटरीक्लबसारख्या एखाद्या संस्थेच्या फॅन्सिड्रेस स्पर्धेत बक्षिस मिळायला हरकत नाही! दिंडीमधल्या वाद्यांचे सूर हिंदी चित्रपटगीतांचे नव्हते, तर स्वा. सावरकराच्या स्वतंत्र्यतेच्या स्तोत्राचे होते.

जरा वेळ हे दृश्य पाहून मग पालखीशेजारी चालू लागलो. पालखीत मुकुंदराजाच्या 'विकेकसिंधू'पासून लक्ष्मण माने यांच्या 'उपरा'पर्यंत विविध ग्रंथ होते. (असं म्हणतात. त्यातील बरेचसे लाल कव्हरच्या बंदिवासात अडकले होते.) दिंडीतल्या एका उत्साही गावकऱ्याशी गप्पा झाल्या. तो सांगत होता की, 'ही दिंडी आम्हा गावकऱ्याची बरं का. संमेलन कमिटीचा त्याच्याशी काही संबंध नाही. ते तुम्हाला दिसताहेत का इथे? त्यांना इथे प्रवेशच नाही. त्या चोरांचं राज्य तिकडे. हा गावकऱ्यांतर्फे साहित्यिकांचा सन्मान आहे. ही बैलाची जोडी आमच्या पाटलांची. या वाजंत्रीवाल्यांना बिदागी आम्हीच देणार. आमचं गाव फार रसिक आहे बघा. संगीताचा तर खूप शौक आहे. कलावंतांचा आम्ही सन्मान करतो. वाजत गाजत मिरवणुका काढतो.'– त्याच्या या उद्‌गारांवर वेगळं भाष्य करण्याची आवश्यकता नाही. ज्यांच्या सन्मानासाठी हा प्रपंच चालू होता ते बहुसख्य साहित्यिक मात्र समेलनाच्या आवारातच रमले होते! दिंडी तेथे पोहोचली तेव्हा मात्र बघ्याचा पूर लोटला.

अध्यक्षीय भाषण हे व्यासपीठावर झालेल्या कार्यक्रमामधलं एक ओॲसिस. वास्तविक वाचून दाखवलेलं भाषण म्हणजे एक कंटाळवाणा प्रकार असतो. पण माडगूळकरांची वाचन शैली आकर्षक अन् मूळचं भाषणही छान. त्यामुळे अध्यक्षीय भाषणाने समाधान दिलं. त्यातले काही मुद्दे महत्त्वाचे वाटले. त्याचा उल्लेख करायला हवा. आपण कसे घडलो याचा माडगूळकरांनी परामर्श घेतला आहे तो अतिशय वेधक आहे. आपल्या बालपणीच्या सवंगड्याचं वर्णन करून ते म्हणतात, 'मी ह्या सर्वांचं देणं लागतो आणि ते अनेक गोष्टींबरोबर शैलीचंही आहे. साधेपणा, निरागसता, जोम ही शैलीची भूषणं, गुन्हाळावर बोलवून रस द्यावा तशी त्यांनीच मला दिली आहेत.' खेडेगावातलं बालपण, सवंगडी, तालुक्याच्या हायस्कूलमधल शिक्षण, विविध प्रकारचं वाचन, बेचाळीसच्या चळवळीतला सहभाग आणि मुंबई महानगरातला प्रवेश असा हा प्रवास व त्यातून घडलेला त्याच्यातला लेखक या वर्णनात दिसून येतो. त्याला ज्या तात्त्विक चर्चेची जोड आहे ती महत्त्वाची आहे. ही चर्चा तात्त्विक असली तरी सहजसुदर शैलीतली आहे. कपाळाला आठ्या नाहीत, पाडित्याचा बडिवार नाही की बोजड दुर्बोध विवेचन नाही. सोपी भाषा. सुदर उपमा. मधूनच सूत्रमय, सुभाषितवजा वाक्यं. एकंदरीतच गप्पाच्या धाटणीचं निवेदन. मुख्य म्हणजे सारे प्रचीतीचे बोल. असं हे रसायन. छान जमलेलं. कथा-लेखनाकडे वळण्यापूर्वीची कोंडी वर्णन करताना माडगूळकर म्हणतात, 'ढग भरून येत होते, पण बरसत मात्र नव्हते.'– ही स्थिती आज राहिलेली नाही. म्हणूनच अध्यक्षीय भाषण ऐकता-वाचताना रसिक चिंब भिजून जातात. हेच भाषणाचं यश.

माडगूळकरांचा एका गोष्टीवर भर आहे. ती म्हणजे, 'साहित्यिक असतो, होत नाही. जितक्या स्वाभाविकपणे केळीला घड येतो तितक्याच स्वाभाविकपणे त्याच्याकडून लेखन होतं. जमिनीचं कवच फोडून वर उसळून येणाऱ्या केळीच्या रसरशीत कोंभातच घडाचं आश्वासन असतं. असा तो मुळातच असला म्हणजे आजूबाजूच्या वातावरणाचा लाभ त्याला मिळतो.'– हे एकदा स्पष्ट करून मगच त्यांनी आपल्या जडणघडणीचं वर्णन केलं आहे. याचा अर्थ, लेखकाच्या घडणीतलं परिस्थितीचं महत्त्व ते मान्य करतात; पण यातल्या व्यक्तिसापेक्षतेचं भानही त्याना आहे. म्हणूनच ते सांगतात, 'एकाच परिसरात अनेक व्यक्ती जन्मतात, वाढतात. तरी तो परिसर सर्वांना सारखाच उपयोगी पडत नाही. त्याच परिसरात वाढलेल्या दोन लेखकांनासुद्धा तो सारख्याच पद्धतीनं उपयोगी पडत नाही. प्रतिभा, सवेदनक्षमता आणि अनुभव ह्या तिन्हीच्या रसायनातून साहित्य निर्माण होतं.'

सामाजिक बांधिलकीचा विचार त्यांनी फेटाळून लावला आहे. त्यांची भूमिका कलावादी दिसते. माडगूळकरांचं साहित्य लक्षात घेता, बांधिलकीचे ढोलनगारे वाजताहेत याचा पुरेपूर फायदा त्यांना उठवता आला असता. पण त्याना साहित्यावर हल्ली मारल्या जाणाऱ्या शिक्क्यांचं वावडं आहे. म्हणूनच ते सरळ सांगून टाकतात, 'माणदेशातल्या तळागाळातल्या लोकाची स्थिती वेशीवर टांगण्यासाठी आपण अशा तऱ्हेची भाषिक कृती केली पाहिजे, असा विचारही माझ्या मनात नव्हता. माझ्या हातून हे अगदी स्वाभाविकपणे घडलं.'... 'प्रत्यक्ष जीवन जगत असताना त्या त्या समाजाच्या संदर्भात सामाजिक प्रश्न, संघर्ष अटळच असतात. कलावंत त्याला साक्षी असतोच. त्यापासून तो बाजूला राहू शकतच नाही. पण तो कोणतेही झेंडे खांद्यावर घेत नाही. तशी जरूरी नसते.' 'हेतुपूर्वक काही सामाजिक कार्य करणं, विशिष्ट मानवसमूहाचे प्रश्न वेशीवर टांगणं, चळवळ करणं, मोर्चे काढणं, हे कार्य कार्यकर्ते करतात. साहित्यिक हा कार्यकर्ता नसतो. बांधिलकी कार्यकर्त्याला असते, साहित्यिकाला नसते.'

सामाजिक बांधिलकीची अपेक्षा इतर कलावंतांपेक्षा साहित्यिकांकडूनच का केली जाते याचं त्यांनी केलेलं विश्लेषण दखल घेण्या-

जोगं आहे– 'भाषा हे साहित्याचं माध्यम आहे आणि ती सामाजिक विनिमयाचं साधनही आहे. म्हणून सामाजिक बांधिलकीचं टुमणं साहित्याच्या मागं लागतं. मी जेव्हा वानराचं चित्र काढतो तेव्हा ते मराठी वानराचं चित्र नसतं, पण ज्या क्षणी मी 'वानर' हा शब्द उच्चारतो किंवा लिहितो त्या क्षणी ते वानर मराठी बनतं. भाषा हे ज्या कलेचं माध्यम नसतं त्या कलेकडून सामाजिक बांधिलकीची अशी अपेक्षा केली जात नाही. चित्रकाराकडून, शिल्पकाराकडून, गायकाकडून ही अपेक्षा कोणी करत नाही. साहित्यिकाकडून मात्र करतात, कारण तो भाषा वापरतो. साहित्य ही अखिल मानवमात्रासाठी निर्माण होणारी कलाकृती आहे असं आपण लक्षात घेतलं, म्हणजे त्याच्याकडून बांधिलकीची अपेक्षा आपण करणार नाही. हे बंधन आपण साहित्यिकावर घालणार नाही. त्याचं स्वातंत्र्य मान्य करू; कारण स्वातंत्र्य हा साहित्यिकाचा जन्मसिद्ध हक्क आहे.' एकंदरीत आद्य क्रांतिकारक कवी केशवसुताना अभिप्रेत असलेला 'प्रदेश साकल्याचा' माडगूळकरांनाही अभिप्रेत आहे. म्हणूनच आपल्याकडची सामाजिक शिक्केबाजी त्यांना मान्य नाही. त्यामुळेच– 'एकीकडे आपण जातपात नसलेला, सर्व धर्मांना सामावून घेणारा आदर्श समाज निर्माण व्हावा अशी स्वप्नं पहातो आणि त्याच वेळी साहित्यात मात्र जातिभेद तीव्र करू पहातो, हे बरोबर आहे का ?'– अशी व्यथा ते बोलून दाखवतात. त्याना अधिक व्यापक वर्गीकरण अभिप्रेत आहे. त्यांच्या मते, 'साहित्याचं वर्गीकरण करण्याची आपली जी पद्धत आहे तीही सामाजिक वर्णनपर अशीच आहे. ग्रामीण, दलित, मध्यमवर्गीय वगैरे. पण साहित्याचं वर्गीकरण हे आविष्काराच्याही दृष्टीनं होऊ शकतं. साहित्याची जसजशी उत्क्रांती होते त्यानुसार हे वर्गीकरण असतं. १. नियमानुसारी २. अद्भुतरम्य ३. वास्तववादी ४. अस्तित्त्ववादी ५. मानसवादी ६. अतिवास्तववादी अशा तऱ्हेचं वर्गीकरण इतर ठिकाणी होताना आपण पहातो. असं वर्गीकरण हे इतिहासाला साक्षी ठेवून केलेलं असतं. सर्व साहित्य एकच आहे असं मानून केलेलं असतं.' (एकीकडे हे विचार माडगूळकरांनी मांडले अन् दुसरीकडे 'दलित व ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा वेगळया आहेत' आणि 'स्त्री–लेखिका माध्यमवर्गीय चौकटीबाहेर पडू शकली नाही' असे दोन परिसंवाद संमेलनात झाले ! तरी बरं की, दलित व स्त्री साहित्याचे हुकमी समीक्षक डॉ. भालचंद्र फडके संमेलनाला येऊ शकले नाहीत; माडगूळकरांच्या भाषणामुळे ते आता किती चिंता आणि चिंतनात पडले असतील कोण जाणे ! )

माडगूळकरानी साहित्याचं स्वरूप व प्रयोजन याविषयी काही चर्चा केली आहे. दोन त्रिकोण माडून त्यांनी प्रथम सांगून टाकलं आहे की, 'सर्व लेखन म्हणजे साहित्य नव्हे. सर्व वाचक म्हणजे रसिक नव्हेत. सर्व लेखक म्हणजे साहित्यिक नव्हेत.' हा सर्वमान्य होण्याजोगा विचार आहे. प्रयोजनाबाबत ते म्हणतात, 'सामाजिक बांधिलकी नाही, मग साहित्याचं प्रयोजन काय? निसर्गात उमलणाऱ्या फुलाचं असतं तेच. आपण गुलकंद करावा म्हणून काही गुलाब फुलत नाही. प्रयोजन ही सामाजिक गरज आहे. तुम्ही ते उपयुक्ततेच्या दृष्टीने साहित्याला चिकटवू शकता.'......'तेव्हा आपण प्रयोजनाचा, उपयुक्ततेचा आग्रह धरू नये. राजकारण आणि समाजकारण यांचं प्रचंड वर्चस्व आलं की, साहित्यात वेठविगारपद्धती सुरू होते.' या चर्चेतलं त्यांचं सुभाषितवजा विवेचन फार सुरेख आहे– 'अखेर साहित्य हीही एक सवय आहे आणि सवयी ह्या माणसाला झाकणारी वस्त्रं असतात'

. वाचन व साहित्यप्रसाराच्या संदर्भातही माडगूळकरांनी काही महत्वाचे विचार मांडले आहेत. उदा 'कोणती वनस्पती खावी आणि कोणती खाऊ नये, ही निवड सशाची किंवा हरणाची पोरं आयाच्याकडून शिकतात. माणसाच्या पोराच्या आया वाचनाच्या बाबतीत एवढया तत्पर असलेल्या मी पाहिल्या नाहीत. निवड करून केलेलं वाचनच श्रेयस्कर असतं. उद्योगपतीपेक्षा पुस्तकं जास्ती उदार असतात...; पण जी छापली जातात आणि दोन पुठ्ठ्यांमध्ये बांधली जातात, ती सर्वच काही पुस्तकं म्हणायला लायक नसतात. ...बरेच लेखक असे असतात की, जे काजूच्या झाडांची बाग करत आहोत असा बहाणा करून फेणी गाळण्याचा चोरटा धंदा करतात.'......'लेखकाला वाचन हे पोषण द्रव्यच आहे; पण मुळात प्रतिमा नसली तर मात्र पुतळयाला पोषणद्रव्य चारून तो जसा सजीव होत नाही, तसा वाचकही साहित्यिक होणार नाही. अशा या लिखित अक्षरांच्या पलीकडेही एक वाचन साहित्यिकाला करायचं असतं, ते मानवी समूहाचं.'......'आपलं रोजचं वाचन वर्तमानपत्राच्या कॉलमच्या उंचीपलीकडच असावं. नक्षत्रं अशी ढगांच्यापलीकडे असतात, तसा आशय हा शब्दाच्यापलीकडे असतो. अशी निवड करून उत्तम तेवढंच वाचण्याचं धोरण तुम्ही ठेवाल, तर सुमार पुस्तकं वाण्याच्या दुकानात पुडया बांधण्याच्या उपयोगाची ठरतील आणि एवढ्याच कामासाठी उपयोग होतो आहे हे ध्यानी येताच त्याच्या निपजेला आपोआप आळा बसेल......चारदोन मोठी शहरं सोडली तर पुस्तकांचे जथे फार दूरवरचा प्रवास करत नाहीत......खेडोपाडी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे, तशीच तहानेल्या वाचकांना पुस्तकंही मिळायला नकोत का ?' फिरती वाचनालये, टाइम्स लिटररी सप्लिमेंटप्रमाणं एखादं मासिकपुस्तक, भारतीय व बाहेरच्याही उत्तमोत्तम ग्रंथाची भाषांतरं, पुस्तकांच्या किंमती आवाक्यात राहण्यासाठी केरळप्रमाणे सरकारी सस्था, ग्रनोल्ब या फ्रेंच गावातील 'मेझाँ द क्युल्च्यूर'सारखे एखादे सांस्कृतिक केंद्र, अशा विविध गोष्टीची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली आहे. आकाशवाणीतल्या चाकरीचे दडपण न बाळगता, त्यांनी आकाशवाणी व दूरदर्शनलाही साहित्यप्रसाराच्या त्याच्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. त्याच्या सूचनामधला व्यवहार्य भाग प्रत्यक्षात उतरायला हवा या साऱ्या संदर्भातली 'हेही आपलं दारिद्र्य लाज बाळगावी असंच नाही का?' ही त्याची खंत रास्त आहे.

संभाव्य लेखकाना त्यांनी केलेला उपदेश त्याच्या एकूण भूमिकेशी सुसंगत आहे– 'अनुभवाशी प्रामाणिक रहा आणि स्वतःचीच अभिरुची साक्षी ठेवून लिहा. कुठलीही मळलेली वाट धरू नका. तुमची वाट तुमच्याच पायाना पाडू द्या......कोणासारखे होण्यासाठी खपू नका, स्वतःला ओळखण्यासाठीच खपा. प्रतिभावंताची एकच प्रत निसर्ग काढतो आणि तो साचा मोडून टाकतो..... खाजगी वा सरकारी पारितोषिकाना फार महत्त्व देऊ नका. रसिकांनी दिलेली दाद हे फारच श्रेष्ठ पारितोषिक असतं समीक्षकाच्या मतामुळे

खट्टू होऊ नका. ते त्याचं एकटयाचं मत असतं आणि अखेर तोही एक वाचकच असतो......अखेर समीक्षा ही पाण्यावरची अक्षरं असतात, पाषाणावरची नव्हेत. जे सांगाल ते सोप्या मराठीत सांगा. सोपं लिहिणं ही फार कठीण गोष्ट असते. शब्दही नेमके येऊ द्यात. ...कसलीही कुंपणं घालून घेऊ नका!'

साहित्यिकाच्या स्वातंत्र्याच्या जन्मसिद्ध हक्काचा पुकारा करणारे माडगूळकर शेवटीही केशवसुताच्या 'मळयास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे' या भूमिकेचाच पुनरुच्चार करतात. ह्या स्वातंत्र्याचं भान साहित्यिकांनी ठेवणे खरोखरच आवश्यक आहे.

एक गोष्ट सहज जाणवून गेली. या अध्यक्षीय भाषणात वा साहित्यपरिषदेने पुण्यात केलेल्या सत्कारसमारंभातील भाषणात गदिमाचा उल्लेख नाही. अध्यक्षीय भाषणात— 'तिथं माझा थोरला भाऊ शिक्षक होता'— असा फक्त एक जुजबी उल्लेख आहे. गदिमांच्या अनुल्लेखाच रहस्य काय असावं? मला हे तात्त्विक वाटतं. व्यंकटेश माडगूळकर हे एक स्वतंत्र प्रकृतीचे साहित्यिक आहेत. स्वयंभू आणि आत्मतल्लीन. भाऊ साहित्यिक म्हणून ते साहित्यिक झाले, असलं तर्कशास्त्र त्यांना मान्य नसेल. त्यांच्या साहित्यिक घडणीत गदिमाचा प्रभाव नसणं शक्य आहे. त्यांची छावणी वेगळी आहे. थोरला भाऊ अन् थोर भाऊ म्हणून गदिमांबद्दल त्याना आदर असेलही; पण आपल्या साहित्यिक असण्यावर गदिमाच्या साहित्यिक मोठेपणाची छाया पडणं त्याना मान्य नसावं. त्यांच्या भाषणातली भूमिका लक्षात घेता 'मी होतोच. मी आहेच,' असं त्याना वाटलं तर ते स्वाभाविक आहे. याला कोणी अहकार म्हणू नये आणि समजा तो अहकार असलाच तर तो समर्थनीय म्हणावा लागेल. व्यंकटेश माडगूळकरासारख्या आत्मतल्लीन स्वयंभू प्रतिभावंताने गदिमांच्या मोठेपणाचा आसरा घेतला नसावा तो यामुळेच का? त्यांच्या भाषणात एकंदरीतच बालपणचे सवगडी वगळता आप्तमित्राचे नामोल्लेख नाहीत. कारण कोणाला खूष करणे हा त्याचा प्रकृतिधर्म नसावा. व्यतिक्महतीपेक्षा परिस्थितीची उकल व तत्त्वनिवेदन याकडे त्यांचा कल आहे, हे त्याच्या भाषणाचं एक वैशिष्टयच म्हटलं पाहिजे.

## कविसंमेलन—नाटयप्रयोग

संमेलनातले बहुसंख्य कार्यक्रम कंटाळवाणे झाले, फसले. चार तारखेला रात्री झालेलं कविसमेलन हा एक प्रचड छळ होता. हे असं का झालं? एक तर कवीची भारूडभरती फार मोठी होती. पन्नासाहून अधिक कवी अन् त्याच्या प्रत्येकी दोन कविता. रात्री दहा—साडेदहापासून पहाटे अडीच—तीनपर्यंत हा काव्यगोंधळ चालू होता. सुमारे सात—आठ हजार श्रोते या गोंधळाला अनुकूल वातावरण निर्माण करत होते. काव्याची समज बेताची अन् उत्साह जास्त या प्रकारचे श्रोते बहुसंख्य होते. व्यासपीठावरील कवी हरप्रकारे अरसिकेषु काव्यनिवेदनम् करत होते. कवीमंडळीचीकाही चुकीची गणितं आहेत. त्यातलं एक म्हणजे, जास्तीत जास्त लावलचक कविता जास्तीत जास्त घोळवून म्हणणे. आपण किती वेळ म्हणतो यापेक्षा काय आणि कसं म्हणतो याचं भान हवं. ते अनेकांना नसतं. नव्हतं. दुसरं एक अजब गणित म्हणजे शब्दांचं दुबळेपण सुरांनी झाकणे! जो उठतो तो आपला गात सुटलेला; पण त्याचे शब्दही लुळे अन् सूरही पांगळे! काही कवी लोकानुनय करून आपल्या सुमार काव्यालाही दाद मिळवून गेले. या लाबणाऱ्या कविसंमेलनात, ज्याना तीन तासांचा स्वतंत्र कार्यक्रम मिळालेला आहे अशा सुरेश भटांनी भाग घेऊन बराच वेळ खाल्ला. भटासारख्या नामवंताने हा मोह टाळायला हरकत नव्हती. काहीनी वातावरणाचा फायदा उठवण्यासाठी व्यक्तिगत निंदानालस्तीच्या कविता म्हटल्या. उदा. मधुकर केचे यानी 'माझे लंडन हे हुकले' ही मधुकर अष्टीकरांवरची कविता गाऊन मेलेल्याला मारण्याचे शौर्य गाजवलं. रामदास फुटाणे यानी इंदिरा कॉंग्रेसची टिंगल मारली. त्यांच्या उथळ काव्याला अर्थातच खळखळाट फार होता. भटांनी आपल्या स्वतंत्र कार्यक्रमात वसंतदादांना कवितेत झोडपलं. हा सर्वच प्रकार म्हणजे हीन अभिरुचीचं द्योतक होय. राजकीय कविता जरूर पेश कराव्यात; पण त्याना तात्त्विक आधार हवा. त्या कविता व्यक्तिद्वेषाने पछाडलेल्या वा प्रचारकी असू नयेत वसंतदादावर टीका करताना शरदरावाच्या भाटगिरीचा वास आला तर काय अर्थ आहे? वसतऋतूनंतर शरदऋतूचे आगमन होणार, या अर्थाचं काव्य रामदास फुटाण्यांनी म्हणायचं अन् हर्षभरित होऊन स्टेजवरच कवी (चुकलच! आमदार—) महानोरांशी हात मिळवायचे हा प्रकार साहित्यिक—कार्यक्रमात अशोभनीय होता. असल्या कविता करूच नयेत का? म्हणूच नयेत का? जरूर कराव्यात अन् म्हणाव्यात. कवी पोटासाठी काव्यशक्तीचा वापर करू शकतात. पैशासाठी वा मैत्रीखातर कोणी मंगलाष्टकं रचावीत, स्वगतपद्यं लिहावीत, आरत्या कराव्यात वा पापड—काव्यं लिहावीत; पण या साऱ्याला निखळ साहित्यिक कार्यक्रमात जागा नाही. फुटाणे आणि भट यांनी शरद—कॉंग्रेसच्या प्रचारसभेत खुशाल आपलं प्रचार—काव्य गात सुटावं; पण साहित्यसमेलनाच्या मंडपात आपला रंग वेगळा आहे याचं भान सुटू नये.

तर अशी ही कविसमेलनाची कथा! या असल्या वातावरणात नामवंत कवींचं काव्यवाचनही नेहमीसारखं रंगू शकल नाही. यापुढे साहित्यसमेलनात कविसमेलन ठेवताना हा अनुभव लक्षात घेतला जावा कवीची संख्या मर्यादित ठेवायला हवी. त्यात काही जुने अन् काही नवे असा मेळ घालणे अशक्य नाही; पण सर्वांना संधी देण्याचा समाजवाद कार्यक्रमाचं वाटोळं केल्याशिवाय राहणार नाही. 'उगवतीचे रंग' या कविसमेलनात तर कवीचे द्विशतक ओलांडले गेले. 'कोणीही यावे अन् वाचोनी जावे' हा समाजवाद स्त्रीकारला तर पुढच्या वर्षी, नवरात्रात अखंड दिवा जाळावा तसे साहित्यसंमेलनाचे तीन—चार दिवस काव्य अखंड मिणमिणत राहील हे नक्की! जे कविसमेलनाचे तेच इतर कार्यक्रमांचे. परिसवादात एक अध्यक्ष आणि तीन—चार वक्ते ही मर्यादा पाळायला हवी; पण येथे दर परिसंवादागणिक दहा—बारा वक्ते होते. परिसंवाद व कथाकथनात 'समाजवादी' दृष्टी होतीच होती! त्यामुळे जो आनंदीआनंद व्हायचा तो झाला. 'टिळक आणि आगरकर' हे नाटक तेथील श्रोत्यांना न आवडणं स्वाभाविक होतं. मी नाटकाला गेलो नव्हतो; पण नाटक पहाणाऱ्या एका बाईंनी गमतीशीर किस्सा सांगितला. नाटक संपल्यावर काही बायका म्हणत होत्या की, 'काय बेकार नाटक हाय! यात मिळू फुले

बी नाय की अमिताभ बी नाय !' संमेलनाचा श्रोतृवर्ग लक्षात घेत. एखादे निखळ विनोदी नाटक ठेवले असते तर बरे झाले असते. 'अभिरूप न्यायालय' हा कार्यक्रम मात्र त्यामानाने रंगला. कारण त्याचे हलकेफुलके स्वरूप. श्रोत्यांचे मनोरंजन करणारा असा एखादा कार्यक्रम साहित्यसंमेलनात जरूर असावा. या न्यायालयात अनंत भाव्यांची साक्ष चालू असताना श्रोत्यांमध्ये अगदी अनंत भाव्यांसारखाच एक माणूस दिसला. त्यावर कोणी तरी म्हणालं, 'अरे, भावे डबल-रोल मस्त करतात हं !' दिसण्यातल्या साम्यावरून प्रमोद कोपर्डे या कवीचीही अशीच मजा झाली. तो आवारात भटकत असताना हॉटेलमधला एक पोऱ्या धावत आला अन् त्याला म्हणाला, 'आमच्या साहेबानी विचारलय की, तुम्ही सुरेश कलमाडी का ?' प्रमोद आता दाढी उतरवणार आहे म्हणे !

अंबाजोगाईच्या साहित्यसंमेलनाचा एकूण अनुभव लक्षात घेता साहित्यसंमेलनाची आवश्यकताच काय, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. साहित्यसंमेलनं बंद करा असं अनेक लोक बोलतही असतात. मला मात्र ते योग्य वाटत नाही. ही संमेलने दरवर्षी भरायलाच हवीत. मात्र त्याच्याकडून कोणत्या अपेक्षा ठेवायच्या हे ओळखले पाहिजे. साहित्यसंमेलनातून कायमस्वरूपाचं काही भरीव असं हाती लागेल असा खोटा आशावाद कोणी बाळगू नये. कारण संमेलन ही अखेर एक जत्रा असते. या जत्रेत साहित्याशी संबंधित लोक एकत्रित येऊन चार दिवस मजेत घालवतात. समानधर्मी लोकांशी नव्या ओळखी होतात. जुन्या ओळखी दृढ होतात. ज्या भागात संमेलन भरतं त्या भागातल्या साहित्यविश्वात नवचैतन्य निर्माण होतं. संमेलनमंडपातल्या कार्यक्रमाचं यश म्हणजेच साहित्यसंमेलनाचं यश मानणं योग्य नाही. हे कार्यक्रम म्हणजे एक निमित्त असतं. ते अधिकाधिक चागलं होण्यासाठी काही बदल जरूर करावेत; पण या कार्यक्रमांव्यतिरिक्त अनेक अनौपचारिक कविसंमेलनं आणि साहित्यिक गप्पा रंगलेल्या असतात. खरं संमेलन तेथेच भरलेलं असतं. कोणाच्या खोलीवर, कुठल्या तरी कट्ट्यावर अन् चक्क हॉटेलमध्येही हे संमेलन चालू असतं अंबाजोगाईलाही हे चित्र दिसत होतं. अनेक ग्रुप्स जमले. त्यांची संमेलनं भरली. गप्पा रंगल्या. तरुण साहित्यिकांचा अड्डा जमला की, एक रसिक हॉटेलवाला कॅसेटवरच्या गुलाम-अलीशी त्यांची भेट घडवत होता. पुण्यात मराठी शिकणाऱ्या पंधरा-वीस परप्रांतीय विद्यार्थ्यांचा एक ग्रुपही मोठ्या हौसेनं संमेलनात सामील झाला होता. त्यांच्याशी बोललो. त्यात तक्रारीचा सूर जराही ऐकू आला नाही. मराठीतला तिखटपणा अजून तरी त्यांच्यात उतरलेला नाही ! कधी न भेटणारे लेखक संमेलनामुळे रसिकाना सहजगत्या दिसू शकले, भेटू शकले. लेखकांच्या सह्या घ्यायला 'फॅन्स'ची झुंबड उडायची. (लेखकही मनातून खूश व्हायचे.) पुण्या-मुंबईत लोकांना साहित्यिक दुर्मिळ नाहीत; पण बाहेर एवढ्या संख्येने ते एकत्रित आलेले पाहणे ही वाचकांना पर्वणीच असते. त्याचं त्यांना मोलही असतं. पुस्तकांची व अन्यही प्रदर्शनं संमेलनात मांडलेली होती. तेथेही वाचक गर्दी करायचे...हा उत्साह, हा आनंद, ओळखी अन् गप्पा हेच संमेलनाचं मोठं फलित. हा जत्रेचा मूड ज्याला मानवत नाही त्याने साहित्यसंमेलनाला न जाणं चांगलं. त्याने आपलं एखाद्या साहित्यिक सेमिनारमधलं 'भरीव फलित' आपल्या गाठोडीत बांधावं अन् घरीच पुस्तकात डोकं खुपसून बसावं; पण जत्रा एंजॉय करू शकणाऱ्या साहित्यप्रेमींनी जरूर संमेलनाला जावं अन् मजा लुटावी. हे जत्रेचं भान असलेल्यांना अगदी अंबाजोगाईच्या संमेलनातही खूप काही मिळून गेलं. अर्थात् ही सारी पोलिसांची कृपा बरं का ! त्यांनी जर कर्तारसिंग थत्ते याना अटक केली नसती तर छडीऐवजी बाँब घेऊन आलेल्या थत्त्यानी सर्व क्षुद्र साहित्यिकांना कायमचा धडा शिकवला असता ! सय्यद पाशाची बंदूक अन् जनरल कर्तारसिंगाचा बाँब याच्या विद्रोहाचा स्फोट झाला नाही ही अंबाजोगाईच्या योगेश्वरीचीच कृपा ! □

---


## मतशक्तीचे हादरे

पृष्ठ ८ वरून

स्कर्ते आहेत तर दुसऱ्या प्रवाहावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पगडा आहे. भाजप केवळ एकट्याच्या बळावर प्रभावी पर्यायी शक्ती बनू शकणार नाही असे वाजपेयीना वाटते, तर इतर पक्षांशी युती न करता आपले बळ वाढवावे, तो इतरांचे पाठिंब्याशिवाय पर्यायी पक्ष बनेल असे रा. स्व. संघ गटाला वाटते. भाजपवर या गटाचा प्रभाव आहे पण दिल्ली निवडणुकांनी त्याच्या भूमिकेस हादरा दिला आहे. पराभवानंतर वाजपेयींनी त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून अध्यक्षपदाचा राजिनामा दिला व चागला पायंडा पाडला. कार्यकारिणीने तो परत घ्यायला सांगितले आहे; पण तेवढे पुरेसे नाही. वाजपेयींचा उदारमतवादी प्रवाह भाजपमध्ये अधिक वाढला पाहिजे हा या निवडणुकीचा भाजपला धडा आहे.

कर्नाटकात जनता सरकार अधिकारावर आल्याने विरोधी पक्षांच्या एकीकरणाच्या प्रक्रियेला पुन: वेग आला. जनता आणि लोकदल ठाकूर गट यांचे अखिल भारतीय पातळीवर एकीकरण झाले. ओरिसामध्ये तर जनता लोकदल (ठाकूर गट) आणि कॉंग्रेस (एस) या तीन पक्षाचे एकीकरण झाले; पण एकीकरणाच्या बाबतीत घाई न करता पूर्वीच्या जनता प्रयोगातील चुका टाळायला हव्यात व्यापक जनहिताच्या प्रश्नावर सर्वच विरोधी पक्षानी सहकार्य केले पाहिजे त्यातूनच इंदिरा कॉंग्रेसला प्रभावी पर्यायी शक्ती देशात निर्माण होईल. मतदार पर्यायी शक्तीच्या शोधात आहेत. पूर्वीच्या चुका टाळून ती निर्माण करण्याची जबाबदारी आता विरोधी पक्षाच्या नेत्यांवर आहे. हाच या चार निवडणुकांचा मुख्य निष्कर्ष आहे.

आंध्र-कर्नाटकच्या पराभवाने इंदिरा गांधीच्या नेतृत्वाच्या मर्यादा पुन: एकदा दाखविल्या आहेत; पण सरकार व कॉंग्रेस संघटना यात त्यानी जे मामुली बदल केले त्यावरून आमूलाग्र पुनर्घटना करण्याची त्यांची तयारी दिसत नाही. राजीवला त्यांनी पक्षाच्या सरचिटणीसपदी नेमले, त्यातून त्याला आपला राजकीय वारस करण्याची आकांक्षा त्यांनी सोडलेली नाही हे दिसून येते. इंदिरा गांधी आपली एकाधिकारशाही कार्यपद्धती बदलायला तयार नाहीत. तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच अविभाज्य भाग आहे. त्यामुळे दिल्लीच्या विजयाने आंध्र-कर्नाटकच्या पराभवाच्या धक्क्यातून इंदिरा कॉंग्रेस थोडी सावरली असे वाटले तरी ते खरे नाही. विरोधी पक्षांच्या चुकामुळे इंदिरा गांधीना पुन: सत्तेवर येण्याची संधी मिळाली. या चुका त्यानी सुधारल्या तर देशात अजूनही प्रभावी पर्यायी शक्ती उभी राहू शकेल. □



## ठोकळेबाज मंडळी हिरोच्या कामाला बरी असतात. त्यामुळेच खलनायकाच्या भूमिकेबद्दल मला नेहमीच आकर्षण वाटलं.

—चित्तरंजन

**दादा, नुकतीच तुम्हाला साठ वर्षं पूर्ण झाली, याबद्दल तुमचं अभिनंदन करण्यासाठी तुमच्या मित्रपरिवारानं एक मोठा कार्यक्रम घडवून आणला. आतापर्यंतच्या गतआयुष्याबद्दल कोणत्या भावना तुमच्या मनात आहेत? अजून काही मिळवायचं राहिलं असं वाटतं का?**

मी आज पूर्ण समाधानी आहे. माझ्या व्यक्तिगत आणि कलाजीवनात मी खूप काही मिळवलंय. उत्तम मित्र, चांगले सहकारी, उत्तम संस्था, नावलौकिक, पैसा, समाजाकडून मान्यता... माणसाला अजून काय पाहिजे? आपलं आयुष्य इतकं छोटं, त्यात माणूस काय काय करणार? पण मी आहे त्यात भरपूर मिळवलंय.

**तुम्ही नाटक—सिनेमा या दोन्ही माध्यमात चांगला कलाकार म्हणून यशस्वी झालात, तुमच्या यशात नशिबाचा भाग किती?**

खूप मोठा! मी ललितकलादर्शमध्ये बारा वर्षं काम केलं. नाट्यसंपदेत वीस वर्षं काम केलं. चंद्रलेखाकडून गारंबीचा बापू, भावबंधन केलं. अलकनंदाकडून काही नाटकं केली आणि गद्यातल्या ज्या भूमिका उत्कृष्ट समजल्या जातात त्या सर्व माझ्या वाटचाला आल्या. फक्त हॅम्लेट सोडून! आता या भूमिका माझ्याचकडे कशा आल्या? त्यावेळी रंगभूमीवर काही माझ्यापेक्षा गुणी, मातब्बर कलाकार होते. म्हणून म्हटलं, नशिबाचा भाग मोठाच आहे. नागेश जोशीसारखा चरित्र अभिनेता, ज्याचं काम करताना मला भीती वाटावी, अशा अनेक गुणी कलाकारांना हा मान मिळायला हवा होता; पण काही व्यसनाधीन झाले, काही लवकर गेले...

**दादा, तुमचं शिक्षण किती झालंय?**

शिक्षण? छे! इंग्रजी दोन यत्ता! आता कण्हायचंच असेल तर तेवढी एकच गोष्ट आहे की, मला शिक्षण नाही घेता आलं; पण ही उकरून काढण्याची गोष्ट झाली. काही गोष्टी आयुष्यात राहून जातात तसं माझ्या शिक्षणाचं आहे. जसं मला क्रिकेट आवडतं; पण येत नाही तसंच. हां, आता मोठेमोठे इंग्रजी शब्द वापरून मला उगाच संभ्रम निर्माण करता येत नाही आणि शिकून माणसं आज फक्त साक्षर होतात, शिक्षित होतातच असं नाही.

**चिंतामणराव कोल्हटकर तुमचे वडील. अभिनयाचा वारसा त्यांच्याकडूनच तुमच्याकडे आला की...**

असं आहे, खाटकाच्या घरात पोरगं असेल तर बकरं कसं कापायचं ते आपोआप येतं. मी दिलेलं उदाहरण फार क्रूड आहे; पण ज्या तऱ्हेचं वातावरण तुमच्या आजूबाजूला असतं त्यातून काही गोष्टी आपोआप मिळत जातात. माझ्या वडिलांची नाटकाची कंपनी होती, दीनानाथ त्यांच्याबरोबर होते. मोठमोठी नाटकं त्यांनी केली. या लोकांच्या नकला, अनुकरण करण्यात बालपण गेलं.

**वडिलांनी तुम्हाला काय दिलं?**

ते सांगता येईल का? मी पन्नास गुरु केलेला माणूस आहे. लक्ष्मण वैद्यांच्या स्टेजवरच्या गतिशील हालचाली, वसंत शिंदेचा विनोद, केशवराव दात्यांचं expression, वडिलांची गद्य संवादफेक, तर नानासाहेब फाटकांचं उभं रहाणं. अनेक गोष्टी मी उचलण्याचा प्रयत्न करत होतो. खलनायकी कामांवर बाबुराव पेंढारकरांचा जबरदस्त प्रभाव असताना मी माझा खलनायक उभा केला. मला वाटतं डोळे उघडे ठेवून बघायला हवं, अमुक एकाचा गंडा बांधणं चुकीचं आहे.

**चिंतामणरावांचा घन:श्याम आणि तुमचा घन:श्याम काय फरक आहे?**

माझ्या वडलांनी घन:श्याम तरुणपणी कसा केला ते मला बघायला मिळालं नाही. मी पाहिलं तेव्हा ते role सजवत असत. खरं तर घन:श्याम कारकून आहे, तो सामान्यच दिसला पाहिजे. चिंतामणरावांच्या उग्र प्रकृतीमुळे घन:श्याम गरीब, सामान्य कधीच वाटला नाही; पण त्यांची संवादफेक विलोभनीय होती. घन:श्याम माझ्याकडे आला तेव्हा मी तो खलनायक बदलून टाकला.

**चित्रपट, नाटक अशा दोन्ही क्षेत्रात**

**तुम्ही खलनायक म्हणूनच प्रभावी ठरलात, तुम्ही केलेल्या हिरोच्या भूमिका फारशा लक्षातही रहात नाहीत, हे कसं काय ?**

खलनायकाइतकं बुद्धिमान कॅरॅक्टर दुसरं नाही. ठोकळेबाज मंडळी हिरोच्या कामाला बरी असतात. त्यामुळेच खलनायकाच्या भूमिकेबद्दल मला नेहमीच आकर्षण वाटलं. माझा प्रत्येक खलनायक वेगळा करण्यासाठी मी त्या प्रवृत्तीचा खूप अभ्यास केला. गोड जिभेचा, गोड गोड बोलून घरात शिरणारा, घर उध्वस्त करणारा, त्याच्या बोलण्यात कुठेही harsh सूर नको !

**तुमच्या अभिनयात लक्षात रहातात ते तुमचे looks हे संस्कार तुमच्यावर कोणी केले ?**

भालजींनी ! कॅमेऱ्याशी नटानं कसं खेळायचं ते पेंढारकरांनी शिकवलं. माझ्या चित्रपट–कारकीर्दीचं श्रेय बाबानाच आहे. भालजी अभिनय प्रत्यक्ष करून दाखत असत. अभिनयाचं असं आहे, डोळे आधी बोलायला लागतात आणि शब्द त्याच्या सहाय्याला येतात; पण त्याचा उगम आतून व्हायला हवा. 'चुडा तुझा सावित्रीचा' सिनेमातला एक शॉट सागतो. जेवणाची पंगत बसली आहे, मुलगी वाढायला आली आहे आणि तिचा पदर थोडा ढळला आहे. या वेळी फक्त माझ्या डोळ्यांवर कॅमेरा आहे आणि माझी नजर वरून–खाली वळलेली फक्त दाखवली आहे. आता यासाठी थोड Vision पाहिजे, एकदा ती नजर आली की, कलाकार अभिनय रंगवू शकतो. अशाच एका गावरान सावकाराच्या निर्लज्ज भूमिकेत माझ्या पायापासून कॅमेरा वर येतो. जेव्हा मी लोकांना प्रत्यक्ष दिसतो तेव्हा मी अशी पिंक टाकली आहे की, ती प्रेक्षकाच्या अंगावरच टाकल्याचा भास होतो. सावकाराची वृत्ती निश्चित होते.

**आता थोडं तुमच्या नाटकांसंबंधी. सुदैवानं तुम्ही गडकऱ्यांसारख्या शब्दप्रभूंची नाटकं केलीत. या नाटकाची भाषा शब्दबंबाळ असली तरी इतकी प्रभावी आहे की तिथे कलाकार दुय्यम आहे असं वाटतं...शब्दांची गुंगी अशी चढते की अभिनय लक्षात येत नाही.**

लिखाणाच्या प्रेमात पडावं अशीच नाटकं गडकरी–खाडिलकर–देवलांनी लिहिली; पण ती भाषा सहज बोलता येत नाही. त्याचा एक खास लहेजा आहे. हे भरजरी वस्त्र पेलायला, त्याचा मान ठेवायला कलाकार लागतो नाही तर ते वस्त्र रस्तावरून फरपटत नेल्यासारखं वाटेल.

**पण ही शब्दप्रधान नाटकं आजच्या सामाजिक नाटकांच्या तुलनेत–जिथे शब्दापेक्षा अभिनयाची ताकद पाहिली जाते–करायला सोपी होती असं नाही का वाटत ?**

असं नाही. अभिनय त्या शब्दांना नव्हता आणि या शब्दांना आहे असं नाही. मी तर म्हणतो; मुळात अभिनयच सोपा आहे. अभिनयगुण असतील तर काहीही जमेल. मी इतक्या चित्रपटांतून कामं केली तिथे कुठे तुम्ही म्हणता ते गडकरी होते ? एकदा सात सूर कळले की कोणतं गाणं गायचं ते आपोआप कळतं.

**दादा आज व्यावसायिक रंगभूमीवर आपल्याला धंदेवाईक 'फॉर्म्युले' दिसतात. एक ताई–भाऊ फॉर्म्युला आणि दुसरा मादीभोगसम्राट फॉर्म्युला. सखाराम बाइंडरनंतर अशा नाटकांचं बारेमाप पीक आलं. आता हे दोन्ही फॉर्म्युले सारखेच धंदेवाईक आहेत आणि आम्ही नाटकातून मूल्यं वगैरे देतो असा कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकवाल्यांचा ढोंगी दावा असतो म्हटलं तर ?**

मला हे पटत नाही. माझ्या घरात अजून ताई–भाऊ आहेत, दारापाठीमागे अजून तुळशीवृंदावन आहे. ही नाती अजून तशीच आहेत. माझा इग्लंडमधला पुतण्या इकडे येऊन लघुरुद्र करतो, त्याला ते काय असत ते माहीतसुद्धा नाही; पण त्याला ते करावंसं वाटत.

**पण नाटकातली ही ताई–भाऊ नाती या हीट–हॉट नाटकांइतकीच धंदेवाईक आहेत अशी तुलना केली तर काय वाटते ?**

मला वाईट वाटत नाही. ते व्यावसायिकतेचं गणित आहे आणि formula तयार करणाऱ्या शास्त्रज्ञाला त्याचे मार्क द्याल की नाही ?

**तुम्ही जे सारखं म्हणता की, समाजाचे आदर्श नाटकांतून यावेत तुमची स्वत:ची छोटी कंपनी आहे. बेडेकरांनी टिळक–आगरकरांना हिरो बनवून जे धाडस दाखवलं तसं तुम्ही आजपर्यंत केलं नाही. आदर्शाचं प्रतीक असलेला हिरो बघणारा प्रेक्षक आज आहे का ?**

करमणुकीसाठी फक्त नाटक पाहायचं हा दृष्टिकोन मधल्या काळात होता. आज तो तसा नसावा आज 'टिळक–आगरकर' बघायला गर्दी होते हेच खूप आशादायक आहे आणि असा प्रेक्षकवर्ग निर्माण करण्याची जबाबदारी आमचीच आहे आपल्याकडे असे प्रतिभावंत आहेत; पण त्याना त्याची जाण नाही.

**मराठी रंगभूमी समृद्ध होण्यासाठी नवं तंत्र, नवे विचारप्रवाह, नव्या शैली आपल्याकडे यायला हव्यात. त्यासाठी देशी–परदेशी रंगभूमी जवळून बघायला पाहिजे, आपल्याकडच्या किती नट-दिग्दर्शकांना-नाटककारांना अशी संधी मिळते ?**

मी विचारतो, किती परदेशी मंडळींनी मराठी थिएटर पाहिलं आहे ? आता विजयाबाईंसारख्या दिग्दर्शक परदेशी रंगभूमीचा अभ्यास करून नवीन विचार करू पहातात, ते चागलंच आहे, पण त्याशिवाय काही अडलं आहे असं मला वाटत नाही.

**आज बऱ्याच वेळा अधांतरी नाटकं पहायला लागतात. नाटकाचं प्रयोजन नेमकं काय असावं ?**

नाटक हे सुसंस्कृत माणसाचं स्वप्न आहे असं माझं मत आहे. हे स्वप्न ज्याला जसं दिसतं तसं त्यानं नाटक काढावं आणि पहावं आणि आपल्या स्वप्नाची अभिरुची ठरवावी. जीवनात जी माणसं अतृप्त आहेत ती माणसं अशी गल्लाभरू नाटकं पहातात असं माझं स्पष्ट मत आहे.

**कलाकाराचं कलाजीवन आणि त्याचं खाजगी आयुष्य यांची चुकीची गल्लत करून आपण त्याची नैतिकता (morale) ठरवतो असं मला वाटतं – चांगल्या कलाकाराचे निकष खाजगी आयुष्याचे संदर्भ सोडून लावावेत असं तुम्हाला वाटत नाही का ?**

लोक कलाकारावर प्रेम करतात. आमचं खाजगी आयुष्य व्यसनी, बदफैली असेल तर त्याना वाईट वाटत असतं; पण त्यात त्या कलाकाराची बदनामी करण्याचा हेतू नसतो. कारण कलाकार त्या भूमिकेला योग्य न्याय देत नाही म्हणून त्याचा खरा राग असतो.

कलाकार दुसऱ्या ग्रहावरचे नसतात. सर्वसामान्य सभ्य माणसाचे नियम त्यानं पाळायलाच हवेत. समाजाचं आम्ही देणं लागतो, हे प्रत्येकजणानं मान्य करायलाच हवं. व्यक्तिगत आयुष्य स्वच्छ ठेवून ज्याचं त्यानं हे देणं चुकतं करायलाच पाहिजे.

**मगाशी बोलताना तुम्ही म्हणालात मला वेदना फार लवकर कळली. त्याचा परिणाम काही जीवनविषयक दृष्टिकोन ठरवण्याकडे झाला का ?**

मला वाटतं पैसा, नावलौकिक, लाइम लाइट येत असतो, जात असतो. ज्या चिंतामणरावांना मी सोन्याची बटणं, हिऱ्याची अंगठी घालताना पाहिलं, त्यांनाच सरत्या काळात बाजारातून ज्वारीचं पोतं पाठीवरून उचलताना पाहिलं ! आधीच्या ऐश्वर्याचा, मानमरातबाचा उपयोग ५ रुपयांच्या उधारीसाठी होत नाही हेही पाहिलं. त्यामुळं एक लक्षात राहिलं की, माणूसपण सगळ्यात महत्त्वाचं. त्यासाठी तडजोडी नाहीत!

**साठीनंतर आता काय काय करायचं राहिलंय ?**

मला आधी माझा देश बघायचाय. परदेश सोडा. माझ्या शब्दात जर काही सामर्थ्य आलं असेल तर एखाद्या खेडेगावात मला महिन्यातून १०–१५ दिवस द्यायचेत. व्यवसायात रमण्याचा प्रकार आता माझा कमी झालाय. आता कुठे तरी समाजाचं ऋण फेडायचं आहे. खूप काही डोळ्यांसमोर आहे. आता हळूहळू त्या मार्गाला लागणार आहे. मला अजून खूप घडवायचं आहे.

**तुमच्या सत्कार–कार्यक्रमात लोकांनी तुमच्यावर विशेषणांचा पाऊस पाडला. तेव्हा खरंच काय वाटलं ?**

मी खरं सांगू ? मला लोकांनी फार चिटकवलं. मी शिव्या खाणारा माणूस, हे हारांचं ओझं मला नको वाटलं. माझ्या व्यवसायानं मात्र मला खूप दिलं. सावरकरांसारखी माणसं मी त्यामुळं पाहिली. या व्यवसायात मी माझं वेगळेपण ठेवलंय, ही माझ्यातल्या माणसाची जमेची बाजू. तुम्ही कुठे भारावून जाता याला माझ्या दृष्टीनं महत्त्व आहे. अजून तरी वयाचा मोंडपणा आलेला नाही. खूप पहावंस, करावंस वाटतं.

**आता शेवटचा प्रश्न, या अनेक विशेषणांतलं नेमकं कुठल खरं वाटलं, आवडलं ?**

कोणतंच नाही. लोकांनी फक्त मला हा चित्तरंजन कोल्हटकर आहे येवढंच म्हणावं. बाकी काही म्हणावं असं वाटत नाही. कलाकार संपतो; पण माणूस संपत नाही !

मुलाखत–मेधा राजहंस

## रंगभूमी

# सदानंद दळवी, तुमचीच ‘ लाज ’ वाटते

परवाच सदानंद दळवी--लिखित आणि दिग्दर्शित, कॉलेजजीवनावर आधारित एक भन्नाट सूडनाटच अशी जाहिरात केलेल्या ‘ लाज ’ या नाटकाचा प्रयोग पाहिला आणि मग बाकी कुणाची नाही पण सदानंद दळवीचीच लाज वाटायला लागली.

स्त्रीअत्याचाराच्या कहाण्या तुम्हाला-आम्हाला नवीन नाहीत. रोज वर्तमानपत्रातून त्या वाचून सवयीच्या झाल्या. जयवंत दळवींच्या ‘पुरुष ’ या नाटकातसुद्धा एका ढोंगी राजकारणी पुढाऱ्याकडून बलात्कारित झालेल्या तरुणीची कथा रंगविली आहे तर सदानंद दळवींनी आपल्या नाटकात कॉलेजातील एका प्राध्यापिकेची लाज लुटण्याचा, देणगीदार, विद्यार्थी आणि प्राचार्य कसा प्रयत्न करतात ते दाखवलंय. पुरुष हे नाटक कथेच्या, कलावंताच्या सुंदर अभिनयाच्या आणि एकंदर निर्मितीच्या एका वेगळ्या उंचीवर सतत राहत असल्याने प्रेक्षकांना त्यातील नायिकेविषयी अनुकंपा वाटत राहते; पण तसा प्रकार इथं होत नाही

प्रत्यक्ष प्रयोग पहात असताना संताप अनिवार होत होता. निषेधादाखल पायातली वहाण काढून स्टेजवर फेकावी अथवा प्रेक्षकांच्या रांगांमधून उठून जाऊन समस्त रंगमंचावर काम करणाऱ्या नटांना झोडपावं असाही विचार डोक्यात येत होता; पण पोटार्थी, चेहेऱ्याला रंग चोपडणाऱ्या कलावंताचा त्यात दोष नाही. हे आम्हीच आम्हाला पटवू लागलो.

जे. के. कॉलेज त्यातील विद्यार्थीवर्ग, प्राचार्य, प्राध्यापक, कॉलेजच्या तरुण पोरींना आपल्या बापाची मालमत्ता समजणाऱ्या, एन्जॉयमेंटसाठी वापरणाऱ्या ‘उस्ताद उस्ताद म्हणणाऱ्या दोन चार पंटरबरोबर कॉलेजच्या आवारात दारू पिणाऱ्या चेअरमनचा मस्तवाल पोरगा जितू आणि कॉलेजमध्ये नवीन आलेल्या तरुण प्राध्यापिका अनुया सामंत याच्यातील संघर्षाची ही पॅचवर्क कथा आहे.

जितू हा गुंड मवाली आहे. चेतन नावाच्या मुलाने परीक्षेला कॉपी पुरविली नाही म्हणून तो त्याला मारहाण करतो. प्राध्यापिका इतर दोन-तिघांच्या मदतीने त्याची बाजू घेतात. इथून संघर्षाला सुरुवात होते. मग ‘ हा जितू म्हणतात मला, ’ असे शंभर वेळा म्हणतही जितू रंगमंचावर तीन तास वावरतो. पेपरात मार्क वाढविण्यासाठी चाकू घेऊन प्राध्यापिकेच्या घरात घुसतो. दारं– खिडक्या लावून घेतो. प्राध्यापिका अनुया सामंतला कॉलेजमधून हुसकावून काढण्यासाठी त्याच्या बदनामीची पोस्टर्स कॉलेजात सगळीकडे लावतो. त्याच्या घरात आपल्या पंटरबरोबर दारू पिऊन डिस्कोडान्स करतो. इत्यादी इत्यादी. बाईच्या बाजूने विशाल व त्याचे दोघे-तिघे मित्र असतात. जितू दानव तर हा देवमाणूस. संपूर्ण दोन अंक नुसताच जितूच्या दादागिरीला प्रत्युत्तर म्हणून ‘बघून घेईन. तुझा सूड घेईन. मी जितूला जिवंत सोडणार नाही. ’ अशा शपथा खात, फिल्मी स्टाइलने, लाल लाइटात ब्रूसलीच्या ॲक्शन ढापून दोन–तीन मारामाऱ्या करतो आणि जितूचे शंभर अपराध भरल्यानं तर त्याच्या पोटात सुरा खुपसून मोकळा होतो.

देवीदास हा या कॉलेजचा खूप मोठ्या रकमेचा देणगीदार आहे. प्रा. अनुया सामंत हिच्या पुष्ट शरीराची अभिलाषा बाळगून ‘ माझीही सोय होईल. तुझाही उपवास सुटेल, ’ इतक्या निर्लज्ज भाषेत त्याचा मोबदला म्हणून प्राचार्यपदाची ऑफर देतो. अनुया सामंत ही ऑफर स्वीकारत नाही. मग अनुया सामंतचा पूर्वीचा प्रियकर अजित सरनाईक प्राचार्य बनून ह्या सूडनाटचात

दुसरा खलनायक बनून अवतरतो जितूच्या हातून सगळी सूत्रे हलवितो. गंमत म्हणजे नाटकाच्या अखेरीस, बाईची बदनामी झाल्यानंतर देवीदासमध्ये चक्क परिवर्तन होते. जिच्या शरिराची अभिलाषा हा देवीदास बाळगतो, त्या अनुया सामंतला पोरगी म्हणून मोकळा होतो. बाईच्या बदनामीची चौकशी करण्याकरिता, चेअरमन, देवीदास आणि प्राचार्य अजित सरनाईक याचे चौकशी-कमिशन कॉलेजच्या ऑफिसमध्ये न बसता तिच्याच घरात बसतं. इथं रखमाबाई– एका कुंटनखान्याची मालकीण, अनुया सामतला तिच्या धद्यातील पार्टनर ठरवून तिच्या चारित्र्यावर शिक्कामोर्तब करते. आधी दोन अंक ही रखमाबाई, वागीच्या, पडवळीच्या, भोपळीच्या, काकडीच्या अशा भाज्यांची नावे घेत अश्लील हावभाव करत (हॉट नाटकाची गरज भागवत) वावरते. जितूची गँग तिला वापरलेल्या पोरी पुरवीत असते. ही कॉलेजच्या आवारात कधीही येते. मोकळेपणाने वावरते. 'तरुणाना नादी लावले, त्यांची आयुष्ये उध्वस्त केली' इत्यादी आरोप अनुयाबाईवर ठेवून त्याना कॉलेज सोडायला भाग पाडते ' सभ्य माणसांना भांडता येत नाही. माझा आवाज तुमच्यापर्यंत पोचत नाही. तुम्ही सोसायला भाग पाडलं म्हणून सोसते.' अस म्हणत आपल्या अब्रूचे, लाजेचे धिडवडे निमूटपणे बघणारी ही अनुयाबाई, शेवटी एक नाटक करते. आपल्या वाढदिवशी प्राचार्य ऊर्फ तिच्या पूर्वाश्रमीच्या प्रियकराला घरी बोलावते. शरीरसुखाची इच्छा व्यक्त करते. पोलीस येतात. 'कायापालट' झालेला देणगीदारही नेमका ठरल्या वेळेप्रमाणे येतो आणि प्राचार्य सरनाइकाना पकडून घेऊन जातात. शेवटी माईकवर कोर्टातील , न्यायाधिशाचं जज्जमेंट–

संपूर्ण नाटक दोन भागात घडत. एका बाजूला कॉलेजचं आवार, दुसऱ्या बाजूला प्राध्यापिकाबाईंचं घर. कॉलेजच्या आवाराचा वापर मारामारी, जितूचे पोरीशी चाळे करणे, रखमाबाईने पोरीना विकत घेणे इत्यादीसाठी, तर घराचा वापर चौकशी-कमिशन, कॉलेजचा शिपाई तुकाराम–बनी, विशाल, जितू, देणगीदार यांच्याकरिता गेस्ट-हाउससारखा. या प्राध्यापिकाबाईंच्या घरात कोणीही, केव्हाही घुसतं, दारू पिऊन धांगड-धिंगा करतं– बाईंचा डायलॉग आला की, त्या आतील खोलीतून बाहेर येतात.

या कॉलेजमध्ये दुसरा कुठलाही प्राध्यापक नाही, हेही या जे. के. कॉलेजचं विशेष. एवढ्या सगळ्या घटना घडल्यानंतर ते येत नाहीत म्हणजे कॉलेजमध्ये ते नाहीतच असाच त्याचा अर्थ होतो.

सदानंद दळवी, तुमचं हे मुलखावेगळं कॉलेज, त्यातील नाट्य बघून आम्हाला बाकी कुणाची नाही, तुमचीच 'लाज,' वाटायला लागली !

—चारुदत्त बागूल

## सशस्त्र क्रांतीचा प्रेषित – वासुदेव बळवंत फडके : पृष्ठ ३ वरून

होत्या. चित्पावनांनीही अन्याय तसे सहन केले; पण ते कुठे तरी आपले निषेध नोदवीत गेले. चित्पावनांवर लक्ष ठेवले पाहिजे, चित्पावन चळवळे आहेत, असा गुप्त शेरा मुंबई प्रांताच्या प्रत्येक गव्हर्नरने मारून ठेवलेला आहे. ह्या बंडखोर चित्पावनांचा फडके हा मुकुटमणी शोभतो ! मात्र त्याच्या दुर्दैवाने, त्याला त्याच्या जमाती-कडून कसलीच साथ मिळाली नाही. आपला वाझोटा राग ही जमात मनातच वागवीत राहिली. सुशिक्षित आपल्या मदतीला यावयास तयार नाहीत, हे पाहून वासुदेव बळवंत अशिक्षिताकडे वळला आणि तेथे त्याला अनुकूल प्रतिसाद मिळाला.

वासुदेव बळवत सरकारी नोकरीचा राजिनामा देऊन राष्ट्र-कार्यार्थ बाहेर पडले. त्यांना वाटत होते की, लोकांच्या मनात ब्रिटिश सत्तेविरुद्ध इतका असंतोष खदखदतो आहे की, आपण हाक देताच माणसांच्या झुंडीच्या झुंडी आपल्याला मदत करण्यासाठी धावून येतील. [अवघ्या पंचवीस माणसांच्या मदतीने मी ब्रिटिश राजवट उलथून टाकू शकेन, असे त्यांनी आपल्या छोटयाशा आत्मवृत्तामध्ये लिहिलेले आहे. त्यांच्या दृष्टीने भारत हा शिगोशीग भरलेल्या दारूच्या कोठारासारखा होता. हा दाटलेला असतोष, ही ज्वालाग्राही दारू एका ठिणगीची वाट पहाते आहे असे त्याना वाटत होते; पण फडक्याच्या दुर्दैवाने ह्या दारूवर पाणी पडून ती सर्व सामुग्री वाया गेली.

१८७६ च्या तीव्र दुष्काळात लोकांच्या संतप्त भावनाना चिथा-वीत, शिलगावीत वासुदेव महाराष्ट्रभर हिंडले. चौकाचौकात थाळी बडवून लोक जमा करीत ते हिंडत. आपले रागडे ओबडधोबड विचार ते समोरच्या लोकांना ऐकवत. लोकांना त्याचे विचार पटत; पण फडक्याच्या चळवळीत सामील होण्यासाठी घरादारावर तुळशी-पत्र ठेवून निघावे लागत होते. लोक, बायकामुले, ससार, नोकरी ह्या कोषातून बाहेर पडावयास तयार नव्हते १८५७ च्या जखमा अजून ताज्या होत्या. लोक नवी जोखीम घेण्यास तयार नव्हते. शहरातील सुशिक्षित मडळी आपल्याला सहकार्य करण्यास तयार नाहीत, हे पाहून त्याचे अत:करण विदीर्ण झाले. ते नाइलाजाने रामोशी, भिल्ल, कोळी आणि रोहिले ह्याच्याकडे वळले. फडक्यांच्या चळवळीत त्याचे सुशिक्षित बांधव, त्यांची अल्पसंख्य पण बुद्धिवान जमात सामील झाली नाही; पण अशिक्षित, अडाणी लोक त्यांच्या पाठीशी उभे राहिले, हे त्या काळच्या सामाजिक अवनतीचे लक्षण मानावयाचे काय ? की बुद्धिवंत भेकड असतात, ह्याचा आणखी एक पुरावा म्हणून ह्या घटनेकडे बोट दाखवावयाचे ? काहीही असो, पण सुशिक्षिताची कातडीबचाऊ वृत्ती ह्या स्वातंत्र्यलढ्याला नेहमीच मारक ठरली !

### तेजस्वी संचार

रोहिले, रामोशी, कोळी आणि भिल्ल ह्या अडाणी मंडळीच्या मदतीने उभारलेला लढा लौकरच संपुष्टात आला. ही अशिक्षित मंडळी देशप्रेमाऐवजी आर्थिक लाभाच्या हेतूने संघटनेत सामील झाली आहेत, हे फडक्यांना उशीरा कळले. भ्रमनिरास होऊन निजामाच्या प्रदेशात सैरावैरा भटकणाऱ्या बडाच्या या म्होरक्याला मेजर डॅनियलने गाणगापूर येथे पकडले व बंदोबस्तात पुण्यात

आणले. फडक्यांच्याविरुद्ध राजद्रोहाचा गुन्हा सिद्ध होऊन त्यांना जन्मठेपीची शिक्षा झाली व लडनलाच, तुरुगात हलाखीचे जीवन जगत असताना ह्या तेजस्वी क्रातिकारकाचा १७ फेब्रुवारी १८८३ रोजी मृत्यू झाला. इ. स. १८७९ पासून ते १८८३ पर्यंत विलक्षण तेजाने तळपणाऱ्या वासुदेव बळवंताचा शेवट अतिशय करुण झाला !

पण त्यांचे बलिदान व्यर्थ गेले नाही. त्यांच्या उठावापासून स्फूर्ती घेऊन महाराष्ट्रात व महाराष्ट्राच्या बाहेरही अनेक उठाव झाले. ह्या उठावाची केंद्रे सर्व हिंदुस्थानात पसरली होती. उठाववाल्यानी वासुदेव बळवंत आमचा नेता आहे, असे जाहीरपणे सागितले होते. कॉंग्रेसचा संस्थापक ए. ओ. ह्यूम ह्याचे चरित्र वेडरबर्नने लिहिलेले आहे. कांग्रेसच्या स्थापनेस ह्यूम का प्रवृत्त झाला, ह्याची कारणमीमांसा सांगताना वेडरबर्नसाहेबांनी एका गोष्टीचा खास उल्लेख केला आहे. ह्यूम हे निवृत्त आय. सी. एस. अधिकारी. आपल्या नोकरीच्या काळात ह्या साहेबानी भारतातील छोटया-मोठया बडाचे तीस हजार अहवाल वाचले होते. भारतात इंग्रजविरोधी असंतोष किती व्यापक प्रमाणावर आहे, ह्याचे 'विश्वरूपदर्शन' (?) घडल्यानंतर ह्यूमनी कॉंग्रेसनिर्मितीच्या हालचाली सुरू केल्या. ह्या असंतोषाच्या वावटळीत ब्रिटिश राजवट टिकणार नाही, हे ओळखण्याइतका ह्यूमसाहेब चतुर होता. त्याने ह्या असंतोषाला वाट काढून देण्यासाठी जे कारस्थान रचले, त्याचे नाव इडियन नॅशनल कॉंग्रेस ! जिची स्थापना वासुदेवाच्या मृत्यूनंतर अवघ्या दोन वर्षांनी झाली. पुढे ह्याच काग्रेसने सशस्त्र क्रातिकारक चळवळीतील हवा काढून घेण्याचे राष्ट्रीय (?) कार्य बजावले ! भारताच्या ऐतिहासिक परंपरा, वैभवशाली संस्कृती व भारतीय धर्म ह्या पायावर उभी राहिलेली सशस्त्र क्रातीची चळवळ मोडून काढण्याचे काम गाधी–नेहरूंच्या सेक्युलर (?) कॉंग्रेनने केले, हे वासुदेव बळवंताच्या शंभराव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने भारतीयाना जरी कळले, तरी त्याच्या हौतात्म्याचे सार्थक होईल !

### विषम सामना

वासुदेव बळवंताच्या संपूर्ण चळवळीला काही निसर्गदत्त मर्यादा होत्या. साता समुद्रांवर पसरलेले ब्रिटिश साम्राज्य विरुद्ध वासुदेव बळवंत फडके नामक शस्त्र निधीविहीन एक माणूस हा झगडा मुळातच विषम होता. ह्या संघर्षात वासुदेव विजयी होण्याची मुळीच आशा नव्हती. १८५७ च्या नेत्यांना जनतेचे थोडेबहुत तरी सहकार्य लाभले; पण बिचाऱ्या वासुदेवला ही लढाई जवळजवळ एकाकी लढावी लागली. सशस्त्र क्रातीसारखी चळवळ यशस्वी होण्यासाठी लोकांची साथ लागते. लोकमान्य टिळक, लाला लजपतरायांसारख्या नेत्याचा सशस्त्र चळवळीकडे ओढा होता. सनदशीर राजकारणात ह्या दोन थोर नेत्याचे मन कधीच रमले नाही. एकीकडे क्रातिकारक युवकाना 'युक्तीच्या' चार गोष्टी सांगत ह्या दोन ज्येष्ठ नेत्यानी अहिंसक राजकारण केले आहे. सशस्त्र क्रांतीसाठी भारतातील परिस्थिती अनुकूल नाही, लोक अजूनही अपरिपक्व आहेत, हे माहीत असल्यामुळे टिळकादि नेते इच्छा असूनही सशस्त्र क्रातीकडे वळले नाहीत. वासुदेव बळवंतालाही ही वस्तुस्थिती माहीत असली पाहिजे; पण हृदयी असोनी क्रातिकार्याची प्रेरणा इतकी प्रबळ होती की, तो लोकाची मदत नाही, ह्या कारणास्तव मागे फिरावयास तयार नव्हता. परिस्थिती जशी नेईल तसा तो फरफटत गेला.

समोर अपयश स्पष्ट दिसत असूनही इंग्रजांपुढे तो डगमगला नाही. त्याला पकडण्यासाठी परकीय सरकारने चार हजाराचे बक्षीस लावले होते. वासुदेव बळवंताने त्या सरकारच्या प्रमुखाचे मुंबई प्राताचा गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल ह्याचे मुडके आणून देणाऱ्यास सहा हजाराचे बक्षीस जाहीर करून मुबई प्रातात प्रचंड खळवळ माजविली होती. आपल्या शत्रूला आव्हान देण्याची त्याची ही पद्धती विस्मयजनक म्हटली पाहिजे. आपल्या तुटपुज्या सामुग्रीनिशी त्याने इंग्रजांशी शेवटपर्यंत लढत दिली. त्याची साधने, लढण्याची पद्धती, शस्त्रे ही सर्व मध्ययुगीन होती. त्याची गाठ एका अद्ययावत, अशा प्रबळ लष्करी शक्तीशी होती. आपण हरत जाणारे युद्ध खेळत आहोत, ह्याची त्याला जाणीव होती. कदाचित त्याला देशभक्तीसाठी असलेल्या सर्वोच्च पारितोषिकाची–वीरमरणाची लालसा असावी. पतंगाला दिव्याच्या ज्योतीची दाहकता का माहीत नसते ? उत्कट देशप्रेमामुळे ह्या व्यावहारिक अडचणीची त्यांना क्षिती नसते. डोळ्यांसमोर स्वातंत्र्याचे उत्तुग ध्येय ठेवलेले, रोमरोमात देशभक्ती साठवून निघालेले हे वेडेपीर परिणामांची कधीच काळजी करीत नाहीत!

वासुदेव बळवंताच्या सशस्त्र चळवळीचे अपयश हे त्याचे वैयक्तिक अपयश नाही तर त्याने उभारलेल्या सशस्त्र लढ्याचे ते अपयश आहे. ह्या अपयशाला भारतीय समाज जबाबदार होता. वासुदेव बळवंताच्या पाठीमागे आपण गेलो नाही ह्याचा पश्चात्ताप ज्या दिवशी भारतीय समाजाला होईल, तो दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरानी लिहून ठेवला जाईल ! □

## ॲटनबरांनी आम्हाला अगदी डुलकी घेताना पकडले आहे...

रिचर्ड ॲटनबरांचा 'गाधी' अमिताभ बच्चनची लोकप्रियता खेचू शकेल काय ? प्रश्न हास्यास्पद असला तरी विचारणे भाग आहे.
स्वातंत्र्योत्तर काळात जरा उशीराच जन्मलेल्या आमच्या पिढीने पाहिले आहेत–जातीय दंगे आणि हिंसाचार, सर्वत्र बोकाळलेला भ्रष्टाचार, मूल्याचा ऱ्हास.

अमिताभ बच्चनच्या या अवाढव्य देशात आजच्या घडीला आम्हाला दिसत आहे–हिंसा, क्रौर्य, विकृती, हेवेदावे, मत्सर यांनी ठासून भरलेले धकाधकीचे जीवन.

या जीवनातील निष्फळ साहसांना, स्पर्धेला अथवा त्यात मिळणाऱ्या क्षणभंगुर यशाला सलाम करण्याची ताकद आम्ही गमावली आहे...
ती ताकद दिसते आहे आम्हाला अमिताभमध्ये–केवळ......
स्वप्नरजनासाठी का असेना–पडद्यावरच्या त्या उसळत्या दर्शनाने आम्ही प्रभावित होत आहोत.

आणि याच वेळी जीवनसंग्रामात माणसाची कुळी लावणाऱ्याने जगावे कसे आणि मरावे कसे याची मोलाची शिकवण देणारा 'गांधी' पडद्यावर आला आहे. ॲटनबरानी आम्हाला अगदी डुलकी घेताना पकडले आहे.

केवळ भाषणापुरता, लौकिकापुरता लोकोत्तर नसलेला तर साध्या साध्या दैनंदिन श्वासोच्छ्वासात लोकोत्तर असणारा हाडामासाचा माणूस या भूमीत अवघ्या तीस-पस्तीस वर्षांपूर्वी वावरला यावर अविश्वास दाखविण्यास आमच्या पिढीला पुरेशी जागा असताना–ॲटनबरानी हा विश्वास ठेवण्यास आम्हाला भाग पाडले आहे.

**पुढील अंकी–सतीश**


MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW—28




# निरंतर आगेकूच

९ व्या अशियाई क्रीडा महोत्सवाचे संयोजक म्हणून आपण जे यश मिळविले त्याबद्दल साऱ्या जगातर्फे भारतावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ठराविक मुदतीत क्रीडा मैदाने उभारण्यात आली. देशात तसेंच देशाबाहेर लक्षावधि घरांतून लोकांना, रंगीत् दूरचित्रवाणीवर क्रीडा स्पर्धा आणि सामने पाहणे शक्य झाले. गणकयंत्रे, विद्युतकण विस्तार केंद्रे, मॅक्रो-व्हेव आणि उपग्रह शृंखला यांचा प्रचंड विस्तार करून त्यांचा विविध सेवांसाठी सुरळीत आणि कार्यक्षमतेने उपयोग करण्यात आला.





**संघटित, परिश्रम करून काय शक्य आहे, याचे हे प्रत्यक्ष उदाहरणच आहे.**

याच प्रेरणेने जर आम्ही परिश्रम केले तर राष्ट्रीय विकासाच्या अनेक क्षेत्रांतहि,असेच भरघोस यश मिळविणे शक्य आहे.

## खांद्याला खांदा लावून करू काम
## आपुल्या राष्ट्राला करू बलवान

davp 82/568